सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, ०४ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २८१ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## गिरणी कामगारांसाठी १ लाख घर बांधण्यात येणार

मुंबई : 'सर्वांसाठी घरे' ही महत्वाकांक्षी योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी राज्याच्या नवीन गृहनिर्माण धोरणामध्ये परवडणाऱ्या, टिकाऊ व पर्यावरणपूरक घरांवर भर द्यावा. याबाबत सविस्तर धोरण महिन्याभरात तयार करून नागरिकांना म्हाडा तसेच गृहनिर्माण विभागाच्या योजनांचा सहज सुलभपणे लाभ घेता यावा. त्यासाठी ऑनलाईन प्लॅटफॉर्मचा वापर करावा. मुंबईतील रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांना गती देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे दिले. राज्य शासनाच्या माध्यमातून गिरणी कामगारांसाठी सुमारे एक लाख घरे बांधण्यात येणार आहेत. मुंबईच्या विकासासाठी लवकरच क्लस्टरची योजना सुरू करण्यात येणार असून या योजनेच्या माध्यमातून मुंबईत लक्षावधी घरे उपलब्ध होतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे व्यक्त केला. सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली गृहनिर्माण विभागाची आढावा बैठक घेण्यात आली. सुमारे तीन तास चाललेल्या या बैठकीत उपमुख्यमंत्र्यांनी विविध योजनांचा आणि प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेतला.

# मंत्री मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी राष्ट्रवादीचे मराठवाड्यातील आमदारही आग्रही?

### अजित पवारांकडे केली मागणी

जमीर काझी

मुंबई : मस्त जोक चे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडलेले मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी आता विरोधक घटक पक्षातील आमदाराबरोबरच राष्ट्रवादीच्या आमदारांनी ही कंबर कसली आहे देशमुख हत्येची चौकशी पूर्ण होईपर्यंत मुंडे यांचा राजीनामा घ्यावा, तो न घेतल्यास मराठा समाजाचे पक्षाबाबत गैरसमज निर्माण होईल, त्यामुळे तातडीने निर्णय घेण्यात यावा,अशी मागणी मराठवाड्यातील त्यांच्या आमदारांनी पक्षाचे सर्वे सर्वा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.त्याबाबत त्यांनी विचार करण्याची आश्वासन संबंधितांना देण्यात आल्याचेही विश्वसनीय सूत्रांकडून सांगण्यात आले.

### मराठा समाजाच्या रोषाची भीती

**संतोष देशमुख यांच्या हत्येचा मुख्य सूत्रधार वाल्मिक कराडमुळे पक्षाची बदनामी होत आहे .जोपर्यंत देशमुख हत्येचा तपास पूर्ण होत नाही. तोपर्यंत त्याचे राजकीय गॉडफादर असलेले मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा न घेतल्यास आगामी काळात मराठा समाज पक्षापासून दुरावू शकतो .स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत त्यांच्या रोषामुळे त्याची जबर किंमत मोजावी लागेल .तसेच मराठवाड्यात मुंडे यांची एकाधिकारशाही वाढली आहे. ती मोडून काढावी. असे मागणी त्यांनी केली असल्याचे पक्षातील एका वरिष्ठ नेत्याने सांगितले.**

विधानसभा निवडणुकीत प्रचंड बहुमताने महायुती सरकार सत्तेवर आल्याने विरोधकांचे अवसान गळाले होते. मात्र ९ डिसेंबरला केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली. त्यामुळे विरोधकांना आयते कोलित मिळाले. हिवाळी अधिवेशनात हा विषय गाजत राहिल्यानंतर मंत्री धनंजय मुंडे यांचा उजवा हात समजला जाणाऱ्या वाल्मीक कराड यांच्या अटकेसाठी बीड बरोबरच राज्यातील अन्य जिल्ह्यात ऊनही सर्वपक्षीय व सकल मराठा समाजाकडून आंदोलन करण्यात आले त्यामुळे २२ दिवसापासून फरारी असलेला कराडने मंगळवारी सीआयडी पोलिसांसमोर शरणागती पत्करली. त्यानंतरही हे प्रकरण अद्याप राज्यभर चर्चेत असून धनंजय मुंडेंच्या मंत्री पदाच्या राजीनाम्याची मागणी विरोधकाबरोबरच महायुतीतील घटक पक्ष असलेल्या भाजपाच्या आमदाराकडून सातत्याने केली जात आहे. त्यामध्ये आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या मराठवाड्यातील आमदारांनीही हिच भूमिका पक्षश्रेष्ठीसमोर मांडली आहे. आत्तापर्यंत केवळ पक्षाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी उघडपणे मुंडे यांच्या राजीनामांची मागणी केली होती .मात्र मराठवाड्यातील पक्षाचे अन्य चार आमदार ही त्याबाबत अजित पवार यांच्याकडे आग्रह धरला आहे.

देशमुख यांच्या हत्येमुळे या प्रकरणाला जातीय वळण मिळाले आहे त्यामुळे जर मुंडे यांचा राजीनामा न घेतल्यास मराठा समाज पक्षापासून दुरावे व त्याचा फटका स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत बसू शकेल ,अशी चिंता या आमदारांनी अजित पवार यांच्याकडे व्यक्त केली असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे पवार यांचे अत्यंत विश्वासू असलेल्या मुंडे बाबत ते काय निर्णय घेतात याकडे सर्व राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिलेले आहे.

# थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात पुन्हा अव्वल - मुख्यमंत्री

मुंबई : थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात पुन्हा अव्वल ठरला आहे. राज्यातील विदेशी गुंतवणुकीच्या वार्षिक सरासरीच्या ९५ टक्के गुंतवणूक अवघ्या सहा महिन्यांमध्ये झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्र हा देशात अग्रेसर असून आता तो थांबणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी येथे व्यक्त केला. महाराष्ट्रातील गुंतवणुकीबाबत त्यांनी ट्विटच्या माध्यम्यातून माहिती दिली आहे.

फडणवीसांनी दिलेल्या आकडेवारीनुसार, सहा महिन्यांतील परदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र एक नंबरला असून कर्नाटक दुसऱ्या, गुजरात तिसऱ्या, दिल्ली चौथ्या आणि तामिळनाडू पाचव्या क्रमांकावर आहे. राज्यातील विदेशी गुंतवणुकीची आकडेवारी पाहिल्यास २०२०-२१ : १,१९,७३४ कोटी, २०२१-२२ : १,१४,९६४ कोटी, २०२२-२३ : १,१८,४२२ कोटी, २०२३-२४ : १,२५,१०१ कोटी आणि २०२४-२५ (एप्रिल ते सप्टेंबर या सहा महिन्यात) : १,१३,२३६ कोटी.

देशातील परकीय गुंतवणुकीची २०२४-२५ या आर्थिक वर्षातील सप्टेंबरपर्यंतच्या दुसऱ्या तिमाहीची आकडेवारी जाहीर झाली आहे. त्यानुसार अवघ्या सहा महिन्यात १ लाख १३ हजार २३६ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. गेल्या ४ वर्षांमध्ये सरासरी एक लाख १९ हजार ५५६ कोटी रुपये वार्षिक गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. याचाच अर्थ संपूर्ण वर्षभराच्या ९४.७१ टक्के गुंतवणूक ही फक्त ६ महिन्यात आली आहे, असे फडणवीस यांनी नमूद केले. औद्योगिक आघाडीवरील राज्याची घोडदौड पुढेही कायम राहील, अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली.

राज्यातील उद्योगधंदे परराज्यात जात असल्यावरून महाराष्ट्र सरकारवर सातत्याने टीका होत आहे. त्याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले आहे. सहा महिन्यांतील परदेशी गुंतवणूक वार्षिक सरासरीच्या ९५ टक्के जमा झाली आहे. अवघ्या सहा महिन्यात १ लाख १३ हजार २३६ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीसांनी दिली.

ट्विटमध्ये फडणवीस यांनी म्हटलं की, महाराष्ट्र आता थांबणार नाही! वार्षिक सरासरीच्या ९५ टक्के एफडीआय अवघ्या ६ महिन्यांत, असं म्हणत देवेंद्र फडणवीस म्हणाले, पुन्हा अतिशय आनंदाने सांगतो की, आपला महाराष्ट्र सातत्याने परकीय गुंतवणूक (एफडीआय) आकर्षित करण्यात अग्रेसर आहे. आता २०२४-२५ या आर्थिक वर्षातील सप्टेंबरला संपलेल्या दुसर्या तिमाहीची आकडेवारी आली आहे. त्यात अवघ्या सहा महिन्यात १ लाख १३ हजार २३६ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे. गेल्या ४ वर्षांतील सरासरी पाहिली तर १,१९,५५६ कोटी रुपये वार्षिक गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. याचाच अर्थ संपूर्ण वर्षभराच्या ९४.७१ टक्के गुंतवणूक ही फक्त ६ महिन्यात आली आहे. मी महाराष्ट्राचे मन:पूर्वक अभिनंदन करतो माझे सहकारी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि संपूर्ण मंत्रिमंडळाच्या नेतृत्त्वात आपल्या महाराष्ट्राची ही घौडदौड अशीच कायम राहील, अशी ग्वाही देतो.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे १८ व १९ जानेवारीला संभाजीनगरात दोन दिवसीय शिबीर

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई दि. ३ जानेवारी - राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे १८ व १९ जानेवारीला अडीचशे निमंत्रितांसाठी शिबीर छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. त्यामध्ये आजी-माजी आमदार खासदार व निवडणूक लढविलेले उमेदवार, प्रमुख पदाधिकाऱ्यांचा यांचा समावेश असणार आहे.

या शिबिरात पाच वर्षाचा रोडमॅप प्रदेशाध्यक्ष म्हणून तयार करणार असल्याचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी सांगितले . ते म्हणाले,' सभासद नोंदणी मोहीम सुरू केली जाणार आहे. त्यानंतर संघटनात्मक कामाला गती द्यायची आहे. पक्षाचे काम फक्त राष्ट्रीय स्थितीपर्यंत मर्यादित न रहाता समाजाच्या विविध क्षेत्रांशी निगडित असलेल्या बाबींवर लक्ष केंद्रित करत पक्षाची वाटचाल पुढच्या कालावधीत अधिक मजबूतीने कशी करता येईल यादृष्टीने विचार करणार आहेत.आज राज्याच्या सेलप्रमुखांची बैठकीला राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार उपस्थित होत्या. या बैठकीत आम्ही घेतलेल्या भूमिकेपासून ज्या पदाधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपवली होती त्याचे मुल्यमापन केले. विधानसभा निवडणुकीत केलेल्या कामाचा अहवालही घेतला. आगामी कालावधीत अधिक जबाबदारीने संघटनेची पाळेमुळे खोलवर रुजवण्याबाबत सूचना दिल्या आहेत , असे सांगून ते म्हणाले,'

विधानसभेत आम्हाला ४१ जागांवर यश मिळाले. पण पक्षाचा विस्तार राज्यभर करायचा आहे. काही जिल्हयात आमचा आमदार नाही. काही जिल्हयात एक - एक आमदार आहे. त्यामुळे येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकर होतील,

या बैठकीत पक्षातील जे सहकारी आहेत त्यांच्याकडून सूचना व त्यांची मते काय आहेत हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे. संघटनेच्या पदावर जी संधी मिळाली आहे त्यात सक्रियपणे काम करण्याची सूचना केली. पक्ष आणि पक्षाची शिस्त यापुढे कसोशीने पाळली गेली पाहिजे अशी भूमिका बैठकीत मांडली. प्रवक्त्यांचीही स्वतंत्र बैठक घेतली. प्रवक्ते बोलतात त्यावेळी ते व्यक्तीगत मत नसते तर ते पक्षाचे मत असते. पक्षाची अधिकृत भूमिका असते. त्यामुळे प्रवक्त्यांची जबाबदारी मोठी असते. त्याबद्दल सूचना करतानाच कुटुंब म्हणून पुढच्या कालावधीत अधिक सक्षमपणे पक्ष संघटना वाढवण्याच्या दृष्टीने यशस्वी होऊ, असा विश्वासही तटकरे यांनी व्यक्त केला.

यावेळी महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर, आ. शिवाजीराव गर्जे, आ. सना मलिक - शेख, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे, प्रदेश प्रवक्ते प्रशांत पवार, प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी आदी उपस्थित होते.

# कायद्याचे रक्षकच सुरक्षित नाहीत तर जनतेला काय सुरक्षा देणार? : खा. वर्षा गायकवाड

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. ३ जानेवारी : मुंबईसह राज्यात गुंडाराज सुरु आहे.नवी मुंबईत भरदिवसा गोळ्या झाडल्या जातात, एका पोलीस कर्मचाऱ्याची हत्या करून चालत्या लोकलसमोर फेकले जाते. कायद्याचे रक्षकच सुरक्षित नसतील तर भाजपा युती सरकार सर्वसामान्य जनतेला काय सुरक्षा देणार? असा संतप्त सवाल मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खा. वर्षा गायकवाड यांनी विचारला आहे.

यासंदर्भात बोलताना त्या म्हणाल्या की, राज्यातील पोलीसांचा गुन्हेगारांवर वचक राहिलेला नाही हे वाढत्या गुन्हेगारीवरून दिसत आहे पण यात पोलीसांचा काही दोष नसून त्यांच्यावर असलेला राजकीय दबाव हा त्यांना गुन्हेगारी रोखण्यात अडथळा ठरत आहे. बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निघृणपणे हत्या करण्यात आली. या घटनेतील आरोपी २०-२२ दिवस पोलिसांनी सापडत नाहीत आणि अचानकपणे शरण जातो, हे महाराष्ट्राच्या कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे काढण्याचा प्रकार आहे. बीड प्रकरणी जी कारवाई सुरु आहे ती फक्त धुळफेक आहे. परभणीत आंबेडकरी अनुयायी सोमनाथ सुर्यवंशी यांचा पोलिसांच्या मारहाणीमुळे मृत्यू झाला असे शवविच्छेदन अहवालही सांगतो, सुर्यवंशी यांची पोलिसांनी हत्याच केली आहे पण मुख्यमंत्री फक्त आरोपीला सोडणार नाही, यापलिकडे मुख्यमंत्री काहीच करु शकत नाहीत.

राज्यात गुन्हेगारी वाढलेली असताना तथाकथित इंटेलिजन्स काय करत आहे? विरोधी पक्षांवर कारवाईचा बडगा उचलणाऱ्या फडणवीसांच्या लाडक्या पोलीस महासंचालक काय करत आहेत? गुन्हेगारांच्या मुसक्या आवळताना पोलीस महासंचालकांना राजकीय आकांची भिती वाटते का? गृहमंत्रीपद व पोलीस महासंचालकपद सांभाळता येत नसेल तर खुर्चीला चिकटून कशाला बसता, खुर्ची खाली करा. देवेंद्र फडणवीसांएवढे निष्क्रिय व अपयशी गृहमंत्री आतापर्यंत झालेले नाहीत, असा आरोप गायकवाड यांनी केला..

# कष्ट कमी करण्यासाठी महिलांनी कृषी तंत्रज्ञान आत्मसात करावे

## महिला शेतकरी मेळाव्यात डॉ. पंडित मुंडे यांचे मार्गदर्शन

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

क्रांतिज्योती सावत्रीबाई फुले यांचे कार्य आणि त्यांचे जीवन आपणा सर्वासाठी दिशादर्शक आणि आदर्श असून, त्यांच्या जीवनातून प्रोत्साहन घेऊन प्रत्येक महिलेने समाजाचे प्रतिनिधित्व करणे आवश्यक आहे. भारतातील शेती ही मुख्यत: महिला शेतकऱ्यांच्या अविरत कष्टावर अवलंबून आहे. महिला शेतकऱ्यांना शेतीमध्ये अनेक काबाड कष्ट करावे लागतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होताना दिसतात. यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि अन्य विद्यापीठांनी महिला शेतकऱ्यांचे काबाड कष्ट कमी करण्यासाठी तंत्रज्ञान विकसित केलेले आहे. त्या सर्व तंत्रज्ञानाची माहिती महिला शेतकऱ्यांनी घेऊन त्यांचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत कृषी विज्ञान केंद्राद्वारे शुक्रवारी, ३ जानेवारी २०२५ रोजी महिला शेतकरी मेळाव्यात अध्यक्षीय मार्गदर्शन करताना कृषी तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित मुंडे यांनी व्यक्त केले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कृषी विज्ञान केंद्रात महिला शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता. प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून मत्स्यव्यवसाय विभागाच्या सहायक आयुक्त मधुरिमा जाधव, उद्योजिका तथा सामाजिक कार्यकर्त्या डॉ. गीता आचार्य यांची उपस्थिती होती. यावेळी केव्हीकेच्या कार्यक्रम समन्वयक डॉ. अनिता जिंतूरकर, विषय विशेषज्ञ इंजि. गीता यादव, डॉ. संजूला भावर, डॉ. बस्वराज पिसुरे, कृषी उद्योजिका कालिंदा जाधव, छायाताई साबदे, निलिमाताई, सावित्रीबाई समाज एकात्म मंडळच्या श्रीमती देशमुख व महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### 'मत्स्य' मध्ये अनेक संधी

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना श्रीमती जाधव म्हणाल्या, समाजातील प्रत्येक क्षेत्रात महिलांनी नेतृत्व करणे गरजेचे आहे. स्वत:ला कमी न समजता आणि केवळ ठराविक चौकटीत न राहता बाहेर येऊन निडरपणे सर्व क्षेत्रात पुढे येऊन कार्य करण्याची गरज आहे. मुलींनी उच्च शिक्षण घेऊन समृद्धी साधावी. मत्स्य व्यवसायात खूप संधी असून, याकडे महिलांनी वळावे. यासाठी मत्स्य व्यवसाय विभाग सदैव सहकार्य करेल.

### महिला प्रमुख कणा

डॉ. आचार्य यांनी महिलांचे मानसिक, शारीरिक व आर्थिक सक्षमीकरणावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या, महिला याच समाजाचा कणा आहेत. त्यामुळी हा कणा सदैव ताठ आणि कार्यरत असणे गरजेचे आहे. समाजातील प्रत्येक महिला ही सक्षम, आणि समृद्ध झाली पाहिजे. यासाठी सर्वांनी मिळून कार्य करण्याची गरज आहे. महिलांचे सबलीकरण करण्यासाठी महिला उद्योजिका घडणे आवश्यक आहे. यासाठी आसपासचे वातावरण, शिक्षण, अनुभव, प्रयोगशीलता आणि बाहेरच्या जगाशी संवाद या पंचसूत्रीची आवश्यकता आहे.

### कतृत्ववान महिलांचा सत्कार

यावेळी केव्हीकेद्वारे प्रशिक्षित महिला उद्योजिका श्रीमती. कालिंदा जाधव, छायाताई साबदे, निलिमाताई यांनी आपल्या व्यवसाय उभारणी व उद्योजिका होण्यापर्यंतचे अनुभव सांगितले. केव्हीकेमार्फत त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. अनिता जिंतूरकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बस्वराज पिसुरे यांनी केव्हीकेद्वारे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाबद्दल माहिती सांगून सूत्रसंचालन केले. डॉ. संजूला भावर यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सतीश कदम, जयदेव सिंगल, जयदीप बनसोडे यांनी परिश्रम घेतले.






सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



बीड : मकरसंक्रांत जवळ आली असून पतंगबाजीला जोर चढत आहे. बीड शहरातील रविवार पेठ भागात विविध आकारातील पतंग खरेदीसाठी दुकानांमध्ये लहान मुलांनी गर्दी केली आहे. (छाया-कृष्णा शिंदे)

# पद्माक्षीद्वारे बीडमध्ये व्यावसायिक व ग्राहक दोघांनाही हक्काची बाजारपेठ उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ जानेवारी**

मागील दोन वर्षापासून बीड व आसपासच्या तालुक्यातील सर्वसामान्य ग्राहकांना सर्व काही एकाच ठिकाणी खरेदी करण्याची सुवर्णसंधी पद्माक्षी व्यावसायिक प्रदर्शनाद्वारे मिळते.

पद्माक्षी हे व्यावसायिक व्यासपीठ पद्मा बियाणी व मीनाक्षी सिकची यांच्याद्वारे छोट्या व्यावसायिकांसाठी उभारलेली बाजारपेठ आहे .मागील दोन वर्षात सात वेगवेगळ्या वेळी आयोजित केलेल्या प्रदर्शनातुन या महिलांनी कपडे, दागिने, वेगवेगळे खाद्यपदार्थ, कलाकुसरीच्या विविध वस्तू इत्यादी व्यावसायिकांसाठी आपल्या प्रदर्शनाद्वारे थेट ग्राहकांच्या भेटीची सुवर्णसंधी उपलब्ध केली आहे . ग्राहकांनीही या प्रदर्शनाला भरभरून प्रतिसाद दिला आहे .नुकत्याच बालाजी मंदिर येथे झालेल्या प्रदर्शनात शंभर पेक्षा जास्त व्यावसायिकांनी सहभाग नोंदवला यामध्ये लहान मुलांसाठी ही विविध आकर्षक खेळ आणि खाऊची दुकाने होती. पद्माक्षी व्यावसायिक व्यासपीठा द्वारे व्यावसायिक आणि ग्राहक या दोघांच्याही गरजांची पूर्तता होत असल्यामुळे वेळोवेळी अशी संधी उपलब्ध करून देण्याची मागणी ग्राहकातून होत आहे.



# सावित्रीबाई फुलेंकडून शिक्षणाची आसक्ती विद्यार्थ्यांनी घेतली पाहिजे - सौ.सुलक्षणा खणके

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ जानेवारी**



स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बालिका दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्त्या सौ. सुलक्षणा खणके यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. ते म्हणाले की, ज्या शाळेत तुम्ही शिकता त्या शाळेचे नाव सावरकर विद्यालय आहे. सावरकरांचे नाव घेतल्या घेतल्या आपल्या अंतर्मनात देशभक्तीचे स्फुल्लींग जागृत होते. सावरकर विद्यालय हे विद्यार्थ्यांवर अतिशय योग्य आणि सर्वसमावेशक संस्कार करणारे संस्कार केंद्र म्हणून प्रख्यात आहे. सावित्रीबाई फुलेंनी स्त्रीशिक्षणाचा जो वसा घेतला तो आज अविरत चालविण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवर आहे आणि तो सार्थपणे चालवला पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी सौ. माधवी डोळे यांनी सावित्रीबाई फुलेंच्या कार्याचा आढावा विद्यार्थ्यांना सांगून महिला अत्याचारासंबंधी विविध कायद्यांचे सविस्तर ज्ञान विद्यार्थ्यांना करवून दिले. विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यात कायद्याच्या चौकटीत राहून समर्पक जीवन जगले पाहीजे असे उद्गार त्यांनी या प्रसंगी काढले.

अध्यक्षीय समारोप करताना मुख्याध्यापक श्री विठ्ठल काळे म्हणाले की, स्त्रीयांना देवता स्वरूप मानण्याची आपली संस्कृती आहे. सर्व क्षेत्रात आज महिला आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत. असे प्रतिपादन काळे यांनी केले.याप्रसंगी सावित्रीबाई फुले व प्रतिमेचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमाचे सुत्र संचलन व आभार प्रदर्शन सौ. निता केंद्रे यांनी केले यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री विठ्ठल काळे, प्रमुख वक्त्या सौ सुलक्षणा खणके, शिक्षक पालक संघाचे प्रतिनिधी माधव राऊत व सौ. माधवी डोळे हे उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना शिबीर महत्वपूर्ण-ॲड.विश्वास जोशी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३ जानेवारी**



राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातून देशभक्ती आणि सेवाभाव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचे काम अविरतपणे कित्येक दिवसापासून चालू आहे.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबीर महत्वाची आहेत असे प्रतिपादन श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह एडवोकेट विश्वास जोशी यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर व श्री सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रासेयो विशेष निवासी शिबिराच्या उदघाटन प्रसंगी साळेगाव कोथाळा येथे बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थाना ग्रामसंस्कृतीची ओळख, श्रमप्रतिष्ठा आणि इतरांचे आपण काही देणे लागतो याचे संस्कार आशा शिबिरातून होतात असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, विद्यार्थी खऱ्या अर्थाने कृतिशील आणि ज्ञानसंपन्न होऊन जीवनात सक्षमपणे उभा राहण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या माणूस म्हणून जडणघडणीसाठी असे शिबीर जीवनात मोलाचे ठरतात. अशा शिबिरामधून सहजीवन, ग्रामीण समस्या , लोकजीवन याचा परिचय होऊन संवेदनशील वृत्ती स्वयंसेवकांमध्ये जागृत होते. याप्रसंगी देवगिरी अर्बन सोसायटीचे चेअरमन दिपकरव कदम,सरपंच प्रशांतजी राठोड,जीवन नखाते यांनी मनोगते व्यक्त केली. महाविद्यालयाच्या वतीने राजेभाऊ कदम, दगडूबप्पा कदम, दीपकराव कदम, प्रशांतजी राठोड,विलास कदम,किशोर कदम,महेश कदम,जीवन नखाते ,बापूराव कदम या ग्रामस्थांना वृक्ष दत्तक भेट देण्यात आले. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. विकास जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर गवते यांनी केले तर आभार डॉ. सुनील पाटील व उपप्राचार्य डॉ. होंन्ना गजानन होन्ना यांनी शांती मंत्राने कार्यक्रमाची सांगता केली. या कार्यक्रमासाठी स्वयंसेवक विद्यार्थी- विद्यार्थिनी तसेच ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# बीडमध्ये २४ ते ३१ जानेवारी दरम्यान श्रीसमर्थ रामदासस्वामी सांप्रदायिक भिक्षाफेरी आणि चरण पादुका पूजन भव्य सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ जानेवारी**



राष्ट्रगुरु श्रीसमर्थ रामदासस्वामी यांच्या विचार व कार्याची महती अवघ्या महाराष्ट्राला परिचित आहे. कर्म, उपासना, ज्ञान आणि मोक्ष या चतुसूत्री वर आधारित कर्मनिष्ठ जीवन प्रणाली या श्री समर्थ विचारांचा प्रचार व प्रसार करण्याच्या मुख्य हेतूने श्रीक्षेत्र सज्जनगडावरून श्रीरामदासस्वामी संस्थान तर्फे भिक्षा दौरा आयोजित केला जातो.

समाजाच्या एकत्रिकरणसाठी उत्सव ,महोत्सव साजरे करताना समाजाच्या प्रत्येक घटकाच्या सहकार्यातून व सहभागातून ही साजरे व्हावे म्हणून श्रीसमर्थानीं भिक्षेचा दंडक घालून दिला, आज३७७ वर्षानंतर सुद्धा ही परंपरा कायम आहे,

या सांप्रदायिक भिक्षा फेरीचे आणि चरणपादुका पूजनाच्या भव्य सोहळ्याचे आयोजन २४ ते ३१ जानेवारी या सप्ताहात भव्य स्वरूपात साजरा करण्याचे आयोजन झाले असून २४ जानेवारी शुक्रवार रोजी श्री समर्थ रामदास स्वामी चरणपादुकांचे भव्य स्वागत बीड शहराच्या वतीने केले जाणार आहे , श्री समर्थांचे अकरावे वंशज,अध्यक्ष व अधिकारी स्वामी श्री रामदास स्वामी संस्थान सज्जनगड श्री भूषण स्वामी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभत आहे.

समर्थचरणपादुकांचा मुक्काम ३१ जानेवारीपर्यंत श्रीमद जनीजनार्दन संस्थान थोरले पाटांगण येथे राहणार आहे, या दौऱ्या दरम्यान काकड आरती, सूर्यनमस्कार, भजन, कीर्तन ,प्रवचन सांप्रदायिक उपासना व शेजारती असे कार्यक्रम होणार आहेत .

दररोज सकाळी ८ ते १२ या वेळेत शहराच्या विविध भागातून भिक्षेचा कार्यक्रम होणार आहे. तसेच श्री समर्थ चरणपादुकांचे सामुदायिक पूजन व वैयक्तिक पादुका पूजन घरोघरी नियोजन होत आहे, तरी या सुवर्णसंधीचा सर्व धर्मप्रेमी,समर्थ भाविक भक्तांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन ह. भ. प. विनायक महाराज पाटांगणकर ,प्रा.डॉ. दीपक देशमुख सर, ह. भ. प. कृष्णामहाराज रामदासी आणि संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# गोकुळ शिशुवाटिकेत ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



स्वरांजली तकिक मुलींनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ जानेवारी**

दीनदयाल शोध संस्थान संचलित गोकुळ शिशुवाटिकेत ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांच्या फोटोला पुष्पअर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी स्वच्छंद गटातील सावी गव्हाणे , गार्गी वखरे प्रल्हाद गट सम्राज्ञी सुपेकर, प्रांजल यादव व ध्रुव गटातील अमूल्या कानडे, केली. त्यानंतर सई सावरे , आर्या नवले, अन्वि टेकाळे , साची पवार यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर भाषणे केली. या कार्यक्रमासाठी लाभलेल्या प्रमुख पाहुण्या सौ दीपमाला जालिंदर माने यांनी मुलांना गोष्टी रूप सावित्रीबाई फुले यावर माहिती दिली. या कार्यक्रमासाठी गोकुळ शिशुवाटिका प्रमुख सौ स्नेहलताई देशपांडे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रांती ताई पोरवाल व आभार स्वातीताई देशपांडे यांनी केले.

# प्रा.किरणकुमार धिमधिमे यांना पीएच.डी प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३ जानेवारी**



केज शहरातील सरस्वती महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख किरणकुमार मोहन धीमधीमे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर विद्यापीठाने समाजशास्त्र विषयात पीएच डी प्रदान केली. या यशाबद्दल माऊली विद्यापीठाचे अध्यक्ष अशोकराव पाटील ,खासदार रजनीताई पाटील, संस्थेचे सचिव आदित्य पाटील प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे,संशोधक मार्गदर्शक डॉ नवनाथ शिंदे, सरस्वती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जी बी पाटील, विजय शिनगारे ,डॉ हनुमंत सौदागर, प्राध्यापक शिक्षणप्रेमी यांनी अभिनंदन केले आहे. त्यांनी डॉ नवनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक स्वराज्य संस्थेत मागासवर्गीय महिलांचा सहभाग आणि सबलीकरण विशेष संदर्भ बीड जिल्हा या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले.

# आता माजलगावच्या हिरो शोरूममध्ये विडा व्ही २ इलेक्ट्रिक बाईक उपलब्ध



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३ जानेवारी**

माजलगाव शहरातील दीपराज एजन्सी या हिरोच्या शो रूम मध्ये विडा व्ही २ या इलेक्ट्रिक बाईकचे लॉंचिंग माहेश्वरी सभा तालुकाध्यक्ष तसेच महाराष्ट्र पत्रकार संघचे तालुकाध्यक्ष उमेश जेथलिया यांच्या हस्ते व पत्रकार दत्ता येवले यांच्या प्रमुख उपस्थितीत ३१ डिसेंबर रोजी करण्यात आले.

यावेळी दीपराज एजन्सीचे मालक सागर मानधने, प्रतिष्ठित व्यापारी बाळू मालपाणी, विकास मालाणी, शिवनारायण सोनी आदी मान्यवर उपस्थित होते. प्रमुख मान्यवराच्या हस्ते व्हिडा व्ही टू चा केक कापून लॉंचिंग करण्यात आले.विडा व्ही टू ही इलेक्ट्रिक बाईक तीन व्हेरियन्ट मध्ये उपलब्ध आहे. फुल चार्जिंग विडा व्ही टू १०० किमी चा एव्हरेज देते. यात बॅटरी चार्जिंगच्या दोन पद्धती असून अतिशय सोप्या आहेत. गाडीतील बॅटरी काढून घरातही चार्जिंग करणे सोपे आहे.९६००० रु पासून या बाईक ची सुरुवात असल्याचे सागर मानधने यांनी सांगितले. या कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी, अक्षय थळकर, हुजेफ खान संतोष नाईकनवरे, रोहित नायबळ, जमील पठाण, सुनील दायमा, पुरुषोत्तम राऊत, विष्णू जाधव, दीपक डावकर, सचिन मोहिते, अभिजित घाडगे यांनी परिश्रम घेतले.

# चि.प्रसेनजित शिंदे ठरला 'मिती' चा बेस्ट चाइल्ड ॲक्टर प्रसिद्ध अभिनेते मनोज जोशी यांच्या हस्ते बक्षिस प्रदान





**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३ जानेवारी**

डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात पार पडलेल्या पुणे येथील मानाच्या अशा 'मिती आंतरराष्ट्रीय लघूचित्रपट महोत्सव-२०२४' मध्ये डियर रिव्हर' (प्रिय नदीस) या लघुपटासाठी चि.प्रसेनजित शिंदे या बाल अभिनेत्याला बेस्ट चाइल्ड क्टरचा बहुमान प्रसिद्ध अभिनेते मनोज जोशी व आखील भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मोठ्या रकमेच्या चेकसह, प्रशस्तीपत्रक व मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

चि.प्रसेनजित शिंदे हा माजलगाव जि.बीड येथील शाळेत इयत्ता दुसरीच्या वर्गात शिकत असुन त्याला फार कमी वयात अभिनयाची गोडी लागल्याचे त्याचे वडील व निर्माते भास्करनाना शिंदे यांनी सांगितले ते पुढे बोलताना म्हणाले की, आपल्या मुलाच्या कलागुणाना वाव मिळावा या हेतुने त्यांनी 'भास्करनाना फिल्म प्रॉडक्शन' या निर्मिती संस्थे मार्फत 'डियर रिव्हर' (प्रिय नदीस) या यशस्वी लघुपटाची निर्मिती केली.या लघुपटाला आतापर्यंत वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात खूप चांगला प्रतिसाद मिळाला असुन या लघूपटाने अनेक पुरस्कारावर आपली छाप सोडली असल्याचे दिग्दर्शक विष्णू उगले यांनी आपले मनोगत व्यक्त केले.तर लेखक आर. प्रकाश यांच्या लेखणीचा स्पर्श असलेल्या 'डियर रिव्हर' (प्रिय नदीस) चे छायांकन व संकलन अमर देवणे यांचे असुन यातील इतर कलावंत पूजा देढे, बद्रीनाथ खंडागळे, भिमराव घोडेराव आहेत. तसेच सुभाष कांबळे, सौरभ धापसे, निकेश भांगे इत्यादीनी तांत्रिक बाजू सांभाळली आहे.चि प्रसेनजीत शिंदे च्या यशा बद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## एचडीएफसी म्युच्युअल फंडतर्फे नव्या २५ शाखांचं उद्घाटन

जालना – एचडीएफसी म्युच्युअल फंड या भारतातील आघाडीच्या म्युच्युअल फंड कंपनीने देशाच्या विविध भागांत मिळून २५ नव्या शाखांचे उद्घाटन केले आहे. हा उपक्रम कंपनीच्या सध्या सुरू असलेल्या व्याप्ती वाढवण्याच्या आणि म्युच्युअल फंडातील गुंतवणूक सोपी करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग आहे. या नव्या शाखा म्हणजे बिझनेस सेंटर्स भरतपूर, भुसावळ, वाराचा, बोपाळ, वाकड, चित्तोडगढ, जालना, अझमगढ, पुर्णिया, सीतापूर, बस्ती, अराह, बदलापूर, काशीपूर, फिरोझपूर, बरसात, ब्रम्हपोर (मुर्शीदाबाद), बोलापूर, कोल्लम, खमाम, होसूर, हसन, नागेरकॉइल, विझानागरम आणि तंजावर येथे सुरू करण्यात येणार आहेत. नव्या शाखांमुळे एचडीएफसी एएमसी भारतातील सर्वाधिक प्रमाणात सहज उपलब्ध असलेल्या वेल्थ क्रिएटर्सपैकी एक असून त्यातून कंपनीचे – भारतातील प्रत्येकासाठी संपत्ती निर्मिती करण्याचे उद्दिष्ट अधोरेखित झाले आहे. या विस्तारामुळे एचडीएफसी म्युच्युअल फंडाचे नेटवर्क देशभरात २५० शाखांपर्यंत पसरलेले असून त्यामुळे शहरी व निम- शहरी भागातील नागरिकांना आर्थिक सेवा जवळ उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे. लहान शहरे व उदयोन्मुख आर्थिक केंद्रांत शाखा सुरू करत कंपनीने आर्थिक साक्षरता वाढवण्याचे आणि दुर्लक्षित बाजारपेठांमध्ये सेवा उपलब्ध करून देण्याचे ध्येय ठेवले आहे. हा उपक्रम सेबीच्या भारतात आर्थिक सर्वसमावेशकता वाढवण्याच्या ध्येयाशी सुसंगत आहे.

## महाराष्ट्रात ट्विन-सिलिंडर टेकसह स्तर उंचावला

मुंबई : टाटा मोटर्स या भारतातील आघाडीच्या ऑटोमोटिव्ह उत्पादक कंपनीने सीएनजी वेईकल श्रेणीमध्ये मोठे प्रयत्न करणे सुरू ठेवले आहे, जेथे मार्केट लीडर म्हणून स्वत:ला प्रस्थापित केले आहे. प्रबळ उत्पादन पोर्टफोलिओ आणि धोरणात्मक उपक्रमांसह कंपनीने आर्थिक वर्ष २०२४ च्या पहिल्या सहामाहीत एकूण सीएनजी श्रेणीमध्ये २१.१ टक्क्यांचा प्रभावी मार्केट शेअर संपादित केला. महाराष्ट्रात, या कालावधीदरम्यान ब्रँडच्या एकूण कार विक्रीमध्ये ३४ टक्के सीएनजी वेईकल्स होत्या, ज्यामधून प्रबळ प्रादेशिक वाढ दिसून येते.

# शिवसेना भवन येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.३, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना , युवासेनेच्या वतीने अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. शहरातील शिवसेना भवन येथे माजीमंत्री अब्दुल सत्तार यांच्याहस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

त्यासोबतच शहरातील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले चौकात देखील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी युवानेते माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्याहस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले चौकातील नामफलकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी माजी नगराध्यक्षा श्रीमती राजश्री निकम, माजी उपनगराध्यक्ष शकुंतलाबाई बन्सोड, महिला आघाडीच्या मेघा शाह, अरुणा राजपूत, विद्या भोले, केसरबाई धाडगे, अल्काबाई बन्सोड, प्रयागबाई बन्सोड, सुनीताबाई चौथमल, समता परिषदेचे नारायण फाळके, माजी नगराध्यक्ष पांडुरंग दुधे, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक विठ्ठल सपकाळ, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, शेतकरी सोसायटीचे चेअरमन राजू बन्सोड, मंजितराव भाग्यवंत,जगदीश बेदवे, संतोष धाडगे, सचिन गोरे, ज्ञानेश्वर कुदळ, खरेदी विक्री संघाचे संचालक संजय मुरकुटे, शिवा टोम्पे,जगन्नाथ कुदळ, योगेश कुदळ, बाबुराव पा. वाकडे, सुभाष बन्सोड, फहिम पठाण, डॉ. बिरारे, दत्ता वाघ, दिलीप वाघ, भिकन दुधे, संतोष खैरणार, राजेश्वर आरके, सुनील पांडुरंग दुधे, पांडुरंग बन्सोड, पार्श्वनाथ अंभोरे, शेवंतराव भाग्यवंत, मनोहर आरके, रवींद्र आरके, कृष्णा वाघ, सय्यद जब्बार, अजगर झारेकर, पंकज जैस्वाल, राजू जमधडे, गणेश शेलार, ईश्वर कालभिले, संजय कुमावत, रवींद्र काळे, राम तसेवाल आदींची उपस्थिती होती.

## संघ हीच जीवनगाथा



अलक (३)

### कृपा

डॉक्टर हेडगेवार यांचा जन्म इ.स. १८८९ च्या १ एप्रिलला झाला तो दिवस होता चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे गुढीपाडव्याचा. त्याचे नाव केशव ठेवले. त्याच्या वडिलांचे नाव बळीरामपंत हेडगेवार व आईचे नाव पार्वतीबाई होते. त्यांना यमुनाबाईही म्हणत असत. भारताचा गौरवशाली इतिहास; भारतीय अस्मिता; भारताची सांस्कृतिक परंपरा; भारतीय वीरांचा व त्यांच्या यशस्वी पाऊलखुणांचे स्मरण करून देणारा हा दिवस होता. या दिवशीच डॉक्टरांचा जन्म होणे ही त्या जगन्नियंताची कृपाच. त्या काळात पारंपरिक पद्धतीने घरामध्ये भगवा ध्वज उभारला जात होता. रा. स्व. संघ पण भगव्या ध्वजाला गुरु मानतो.

क्रमश:

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथील विद्यार्थ्यांना पोलीस शास्त्रांची माहीती



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३ जानेवारी : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे छत्रपती संभाजीनगर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली २ जानेवारी ते ८ जानेवारी २०२४ पर्यंत रेझिंग डे उपक्रमांतर्गत सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथील विद्यार्थ्यांना पोलीस शस्त्रांची उपयुक्त माहिती,गुड टच,बॅड टच,व इतर संरक्षणात्मक बाबी संदर्भात माहीती दिली.तसेच विद्यार्थ्यानी पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर यांना त्याच्या मनात येणार्या प्रश्न विचारून पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर यानी उत्तरे दिली.तसेच शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक,विद्यार्थी यांच्या विषयी समाधान व्यक्त केले.यावेळी पोलीस कर्मचारी राजू बरडे,सादिक तडवी,अजय कोळी,राजू सोनवणे,गजानन दांडगे,पोलीस पाटील भागचंद चव्हाण,शिक्षणप्रेमी योगेश बोखारे,विष्णू गव्हाणे उपस्थित होते तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,सहशिक्षक गोपाल चौधरी,प्रशिक्षक शिक्षक शुभम देसले यांनी परिश्रम घेतले.

## आर्य चाणक्य विद्यामंदिरात बालिका दिन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा पैठण दि ०३ :- :-भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिरामध्ये भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त इ३री व इ ४थी च्या विद्यार्थिनींनी सावित्रीबाईची वेशभूषा साकारली

या कार्यक्रमा प्रसंगी भारत माता, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

शिक्षणाच्या स्वर्गाचे
जिने उघडले दार
तीच सावित्री आज
जगाची शिलेदार

या ओळीच्या माध्यमातून सावित्रीची महती कार्यक्रमाच्या माध्यमातून मार्गदर्शिका श्रीमती समृद्धी डिघुळे ,कु.अनुजा वडघणे व कु.स्वरा काळे या विद्यार्थिनींनी एकपात्री अभिनयातून मी सावित्री बोलते ही नाटिका सादर केली . कार्तिकी उंडाळे,रश्मिता सोळुंके, श्रुतिका फटांगडे, मनस्वी लोहारे,सई कुंटे यांनी आपल्या भाषणातून सावित्रीबाईंच्या जीवनातील अनेक प्रसंग सांगितले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. हेमंतजी वैद्य (कार्यवाह भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई), प्रमुख पाहुणे हरीशजी कुलकर्णी (हे होते .केंद्रीय कार्यकारिणी सदस्य विजय चाटूपळे, आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर चे अध्यक्ष पद्मकुमार कासलीवाल, कार्यवाह जुगल किशोरजी लोहिया , शा.स.अध्यक्ष माध्यमिक नंदकिशोर मालाणी , शा.स.अध्यक्ष प्राथमिक शिवाजी मारवाडी , उमेशजी जगताप, किशोर भाकरे,अँड राजेंद्र गोर्डे , रेणुकादास गर्गे, अनिल कावसानकर, शरद बिडकर, भास्कर कुलकर्णी, मुख्याध्यापक प्राथ. विभाग , सौ. ज्योती जोशी मुख्याध्यापिका माध्य. विभाग हे मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभहस्ते शिक्षण विवेक मासिकाचे विमोचन करण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक वृंदांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियंका निकाळजे तर आभार अर्चना गिरवलकर यांनी मानले.

## बिडकीन येथे महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन उत्साहात साजरा



बिडकीन दि ३ जानेवारी पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना पोलीस ठाण्यात दैनंदिन कामकाज, शस्त्रास्त्रं बद्दल माहिती, वाहतूक सुरक्षा नियम, मुद्देमाल कक्ष,बिट अंमलदार यांचे कामकाज,पीएस ओ यांचे कामकाज, शालेय व महाविद्यालयीन मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून तसेच बाल लैंगिक अत्याचार विषयी घटनांच्या अनुषंगाने सविस्तर माहिती देण्यात आली. श्री सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथील शालेय विद्यार्थ्यांनी पोलीस स्टेशन बिडकीन ला प्रत्यक्ष भेट देऊन पोलीस ठाण्याच्या कामाविषयी माहिती जाणून घेतली.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देऊन विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधला. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनामध्ये पोलीसां विषयी भिती दूर त्यांना पोलीसांतील सहृदयी माणूस अनुभवायला मिळाला. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून माहिती मिळवली. यावेळी प्रशालेतील शिक्षक अनिल कांबळे, तुषार अहिरे, जयश्री महाजन, विद्यार्थी तसेच पोलीस कर्मचारी यांची उपस्थित होते.

## फर्दापूर शाळेत सावित्रीबाई फुले जयंती साजरी



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि २ येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली.मुख्याध्यापक डी.टी.बलांडे व शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी शाळेतील मुली सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत दिसून आल्या. माणिकराव पालोदकर विद्यालयात मुख्याध्यापक के.आर.पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. तसेच राजकुंवर महाविद्यालयात उपप्राचार्य ए.जे.बेडवाळ यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले.

## बिडकीन भगवती विद्यालय मध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



बिडकीन ३ जानेवारी : पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय,येथे मोठया उत्साहात सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिवस म्हणून साजरी करण्यात आली .प्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले या कार्यक्रमाची सुरवात झाली. या कार्यक्रमासाठी प्रशालेचे जेष्ठ शिक्षक रायभान रक्तटे अध्यक्षस्थानी होते तसेच मुख्याध्यापक एकनाथ राशींनकर प्रमुख पाहुणे होते या निमित्ताने विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला. मुख्याध्यापक एकनाथ राशींनकर यांनी विस्तारित सर्वांना मार्गदर्शन केले या प्रसंगी प्रशालेत निबंध, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. या वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक राजकन्या मंडाळ, द्वितीय क्रमांक जिकरा शेख तृतीय क्रमांक प्रतीक्षा जाधव व उत्तेजनार्थ रुकय्या शेख यांनी पटकवला कार्क्रमाचे सूत्रसंचालन रामनाथ धनवे सर यांनी केले तर आभार खुशाल चव्हाण यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीधर जऱ्हाड , सुनील पवार, आप्पा किसवे, श्रीम विश्रांती सलगरे, बंडू दुबे, सुभाष राठोड, आशुतोष झारगड यांनी सहकार्य केले.

## कै.बाबुरावजी काळे स्कूल येथे बालिका दिन साजरा, व सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३ जानेवारी

कै.बाबुरावजी काळे मराठी स्कुल सोयगाव मध्ये बालिका दिन साजरा करण्यात आला.तसेच शुक्रवार दि.३ जानेवारी रोजी शाळेच्या प्रांगणात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.या कार्यक्रमात शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्था प्रतिनिधी प्रा.कमलेश काळे,ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ.दादासाहेब पवार,शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस,उपमुख्याध्यापक सागर घाटे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले.


या कार्यक्रमात एकुण २६ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन आपली मनोगते व्यक्त केली तसेच विद्यार्थ्यांना प्राध्यापक डॉ. दादासाहेब पवार यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी शाळेच्या शिक्षिका मनिषा पाटील,शितल पवार,शितल गावंडे,अंजली कथलकर,शितल काटोले,विद्या पाटील, जयश्री श्रीवास्तव,नम्रता पाटील,योगेश काळे,हरिष कोळी, रोहिणी पाटील,प्रेरणा मोरे,अरुणा भोई,मंगेश निकम,उमेश जाधव,संजय डापके,ज्ञानेश्वर पंडित,आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन निकिता देशमुख यांनी केले तर आभार मनिषा पाटील यांनी केले.

## फारोळा ग्रामपंचायत कार्यालयात सावित्रीबाई जोतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी



तभा वृत्तसेवा बिडकीन दि ३ जानेवारी पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत फारोळा येथे सरपंच सलीम महंमद पठाण यांच्या हस्ते सावित्रीबाई जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून,विनम्र अभिवादन करण्यात आले, प्रसंगी ग्रामसेविका आशाताईं तुपे,उपसरपंच शितल चाव्हरे,कमल गोरे,पल्लवी गोरे,सरला पोपळघट,विष्णू पोपळघट,तमिजाबी पठाण,इलियास पठाण, अंगणवाडी सेविका रेखा इंदापूरे, कोमल निकम,अशोक गोरे,अहेमद पठाण,रविंद्र गोरे,संदिप चाव्हरे,तेजस जाधव,गणेश गायकवाड,संजय धुमाळ,रविंद्र पवार,मंगेश धुमाळ अदि गावकरी आदींची उपस्थित होते.

## क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले जयंती साजरी



वाळूज महानगर ( प्रतिनिधी) : जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव कोल्हाटी येथे सावित्रीमाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक डॉ. हरिश्चंद्र रामटेके हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी तथा तंटामुक्ती अभियानाचे अध्यक्ष कृष्णाभाऊ साळे यांची उपस्थिती होती.

स्त्री शिक्षणाच्या मेरुमणी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन डॉ. हरिश्चंद्र रामटेके, कृष्णा भाऊ साळे आणि सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांनी केले.

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून शाळेतील शिक्षिका व विद्यार्थिनी सावित्रीबाईंच्या वेशभूषेमध्ये येऊन सावित्रीबाईंना अभिवादन केले. यावेळी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक डॉ. हरिशचंद्र रामटेके यांच्या संकल्पनेतून आणि विद्या सोनोने व अनिल जाधव यांच्या परिश्रमाने प्रोजेक्टरवर ' मी सावित्री बोलते ' हा लघुचित्रपट सर्व विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या सोनोने यांनी केले तर आभार प्रदर्शन अनिता राठोड यांनी केले. जयंती उत्सव कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रिता मार्कंडे, लईक शेख, जागृती धाडबळे, दिपाली काळबांडे, मंगला गाडेकर, हेमलता जाधव, सुवर्णा शिंदे, योगिता देवकाते, सोनाली निकम यांनी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये सावित्रीबाई जोतिबा फुले यांची जयंती उत्सहात साजरा



तभा वृत्तसेवा बिडकीन दि ३ जानेवारी पैठण तालुक्यातील बिडकीन येथिल ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल व ब्लु माउंटेन प्री स्कुल मध्ये भारताच्या स्त्री शिक्षणाची गंगोत्री म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतातील पहिल्या मुख्यध्यापिका सावित्रीबाई जोतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरा करण्यात आली. या कार्यक्रमा मध्ये शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला सर, शाळेतील शिक्षक, शिक्षीका, विद्यार्थी यांची उपस्थीती होती. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला शाळेचे अध्यक्ष सति श तोतला यांच्या हस्ते पुष्पहार व पुजन करुन विनम्र अभिवादन करण्यात आले ,कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

शाळेतील शिक्षिका भारती जाधव यांनी विद्यार्थ्यांना आपल्या भाषणाद्वारे मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडण्यासाठी शाळेतील शिक्षिका वर्षा चव्हाण, भारती जाधव, काजल देशमुख, अंकीता चव्हाण, सोनाली खोंड, अनिता धर्मे, यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगितेने करण्यात आली.

## श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसी येथे सावित्रीमाई फुले जयंती साजरी



वाळूज महानगर (प्रतिनिधी) : बजाजनगर येथील श्रीनाथ कॉलेज ऑफ फार्मसी येथे सावित्रीबाई फुले जयतीच्या कार्यक्रमाचे समारोप भारतीय ग्रामीण पुनर्रचना संस्थेचे सचिव एकनाथ जाधव व सौ. हर्षला जाधव, सहसचिव अमन जाधव सर यांनी केले. कार्यक्रर्माचे समारोपण झाल्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष शेळके सर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कारकिर्दीची माहिती उलगडून सांगितले. यावेळी प्रशासकीय अधिकारी भागचंद जाधव, शिक्षक व शिक्षेकत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## जि.प.प्रा.शा.रामजीनगर येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३ जानेवारी : उपक्रमशील शाळा जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे भारतातील पहिल्या महिला शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.तसेच बालिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी डिंपल ठोंबरे,मनीषा दांडगे,राधिका काकफाळे,तनुश्री इंगळे,किरण जेठे,अनन्या पगारे,मानसी कळवत्रे,इशिका आगे,मोहिनी जाधव,पायल कऱ्हाळे,शितल इंगळे या विद्यार्थीनी नी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची सुंदर अशी वेशभुषा परीधान केली तर डिंपल ठोंबरे,किरण जेठे,तनुश्री इंगळे,रितेश सुरडकर,फरहान शेख,जय इंगळे, वैभव इंगळे,आदेश जेठे या विद्यार्थी यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याबाबतची माहीती भाषणामधून विद्यार्थ्याना दिली.यावेळी समाजसेवक राजू कुडके, शालेय शिक्षण समिती सदस्य तथा शिक्षण प्रेमी योगेश बोखारे,शिवाजी गोढरे,कोमल आगे,मनिषा जेठे,संध्या पगारे,वैशाली इंगळे,शाळेचे मुख्याध्यापक किरण पाटील,सहशिक्षक गोपाल चौधरी,प्रशिक्षित शिक्षक शुभम देसले,पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

## महिला व मुली खंबीर व धाडसी निर्माण झाल्या पाहिजे - आरती जाधव



सिल्लोड प्रतिनिधी : आजपीएमश्री जि .प.के.प्रा. आदर्श शाळा केऱ्हाळा येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे जयंती बालिका दिन मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संभाजीनगर जिल्ह्याच्या दामिनी पथक प्रमुख आरती जाधव, सचिन क्षीरसागर, लहू घोडे,कडुबा भाग्यवंत, संजय दारुंटे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हकीम पठाण, मुख्याध्यापक रामचंद्र मोरे,समाजसेवक मधुकर देहाडे यांचे हस्ते प्रतिमा पूजन पालक व ग्रामस्थ विद्यार्थी शिक्षक यांचे उपस्थित करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.*

*यावेळी संभाजीनगर जिल्ह्याच्या दामिनी पथक प्रमुख आरती जाधव म्हणाल्या कि मुली व महिला सक्षम झाल्या तर देशाच्या प्रगतीचा दर वाढेल, महिला सर्व समाजाला पुढे नेतात त्यांना फक्त संधी उपलब्ध करून दिली तर त्या संधीचे सोनं करतील.*

*या प्रसंगी पोलीस सप्ताहानिमित्त उपनिरीक्षक लहू घोडे यांनी पोलीस व कायदे या बाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधला, व उत्तरे दिलेल्या मुलींना बक्षिसे दिली. नंतर विद्यार्थी यांची वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्ग ६ वी च्या विद्यार्थिनी संस्कृती घोडे व माधुरी पांढरे यांनी केले तर आभार विभा मेश्राम यांनी मानले.*

*तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक रामचंद्र मोरे, भगवान राजपूत, शेख चांद, राजेंद्र बोडखे, माणिकराव काकडे,रमेश पवार, संभाजी पाटील, मोहम्मद झहिरोद्दीन,मोहम्मद एजाजोदोदिन, शेख नासिर, जुबेर अहमद,सुरेंद्र बबीरवाल,श्रीमती महानंदा राजपूत, रत्नकला इंगळे,रत्नमाला वाघ,अश्विनी जंजाळ,ज्योती समिंद्रे, कविता तेली, अर्चना लोंढे, शारदा गुठे, यशोदा दुबेले, पूनम सोनवणे,विभा मेश्राम, सदफ देशमुख, बुशरा सुलताना, अनुराधा चव्हाण, शाहीन परवीन, अब्दुल वाहिद,शितल महाले, कमल पांढरे,गणेश शिंदे,संतोष एंडोले यांनी हा सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

## अग्रलेख...

# व्हावे मोकळे आकाश...

रस्ते हे केवळ दोन गावांना, शहरांना, जिल्ह्यांना किंवा राज्यांना जोडणारे साधन नसते. जिथे रस्ते होतात तेथे विकास होतो आणि जेथे रस्ते थांबतात तेथे विकास थांबतो. जी गावे, शहरे रस्त्यांनी परस्परांशी जोडली जातात, त्या गावे वा शहरांची एकमेकांसोबत सांस्कृतिक देवाणघेवाण होत असते. त्यामुळे जेथे रस्ते होतात, तेथे संपन्नता येते. अमेरिका हे संपन्न राष्ट्र आहे म्हणून तेथील रस्ते चांगले आहेत, असे नाही, तर अमेरिकेतील रस्ते चांगले आहेत, म्हणून अमेरिका संपन्न आहे, असा दावा अमेरिकेच्या एका राष्ट्राध्यक्षाने फार पूर्वी केला होता. रस्ते हे सर्वांगीण विकासाचे मूळ आहे. अनेक भागांपर्यंत विकासाचे वारे पोहोचावेत यासाठी केंद्र सरकारने जे काही प्रयत्न सुरू केले आहेत, त्यात रस्तेबांधणी हा मुद्दा अग्रक्रमाचा राहिला आहे. महाराष्ट्रातील अविकसित भाग रस्त्यांनी जोडण्याची महत्त्वाकांक्षा सध्याच्या महायुती सरकारने अग्रक्रमाने ऐरणीवर आणली आहे. अशा विकासाच्या वाटेवर अडथळेही अधिक असतात. त्यात माओवादी विचारसरणीच्या नावाखाली भरकटलेला एक वर्ग देशाच्या काही भागांत ठाण मांडून बसलेला दिसतो. महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्ह्यात माओवाद्यांच्या वाढत्या कारवायांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्राने केंद्र सरकारच्या साह्याने कंबर कसली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आता हा जिल्हा अपेक्षेने पाहात आहे आणि त्यांच्या अपेक्षापूर्तीचे पुढचे पाऊल नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशी पडल्याच्या समाधानाने गडचिरोलीच्या दुर्गम भागातील अविकसित समाज सुरक्षिततेच्या जाणिवेने आश्वस्त होऊ लागला आहे. नव्या वर्षात महाराष्ट्राच्या दृष्टीने ही सर्वाधिक समाधानाची बाब म्हणावी लागेल आणि सत्तेवर येताच फडणवीस सरकारच्या कारकीर्दीतील पहिल्या सकारात्मक यशाबद्दल त्यांचे अभिनंदनही करावे लागेल. कारण, वर्षांनुवर्षांपासून माओवाद्यांच्या दहशतीच्या सावटाखाली वावरणारा हा जिल्हा आता खऱ्या अर्थाने सुरक्षिततेच्या जाणिवांनी समृद्ध होणार आहे. सरकारच्या सकारात्मकतेबरोबरच, या भागातील नक्षली कारवाया मोडून काढून माओवादाचा बीमोड करण्याकरिता जिवाची बाजी लावणाऱ्या सुरक्षा यंत्रणादेखील अभिनंदनास पात्र आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी नववर्षाच्या पहिल्या दिवशी या सुरक्षा यंत्रणांच्या कामाचा गौरव केला ते उचितच झाले. जेव्हा कोणत्याही व्यवस्थांना सरकारी पाठबळ प्राप्त होते, तेव्हा त्यांच्या कामाचा हुरूप वाढतो आणि त्याचे थेट फायदे समाजाला मिळतात. नक्षलवादी कारवायांचा बीमोड हे केवळ सरकारी धोरणाचे ध्येय नव्हते, तर या कारवायांमुळे त्रस्त समाजास सुरक्षिततेच्या जाणिवांनी आश्वस्त करण्याचे आव्हान होते. गडचिरोली जिल्ह्यात सी-६० कमांडोंच्या पथकाने हे आव्हान पेलले आणि आता यशाचा उंबरठा ओलांडून महाराष्ट्राच्या नक्षलमुक्तीचा संकल्प यशाच्या दिशेने पुढे सरकू लागला आहे.

विकासाच्या वाटा मोकळ्या झाल्या की सुरक्षित जगण्याची अपेक्षा उंचावू लागते आणि भयाची भावना कमी होऊ लागते, हे गडचिरोली जिल्ह्यातील नववर्षाच्या पहिल्या दिवशी दिसून आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या जिल्ह्यातील अनेक प्रकल्पांची मुहूर्तमेढ रोवण्यात आली आणि या जिल्ह्याची जुनी ओळख पुसण्याची प्रतिज्ञा करून फडणवीस यांनी येथील जनतेच्या मनात तो विश्वास रुजविला. आता गडचिरोली हा महाराष्ट्रातील शेवटचा जिल्हा नव्हे, तर पहिला जिल्हा म्हणून ओळखला जाईल, ही त्यांची ग्वाही केवळ भाषणातील टाळ्या मिळविण्याचे वाक्य नव्हते. निसर्ग आणि खनिज संपत्तीने संपन्न असलेल्या या जिल्ह्याची विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली आहेच, पण विकासाच्या वाटेवरील अडसर ठरणाऱ्या माओवादाच्या भयाचे सावटही आता दूर होणार आहे. माओवादी कारवायांमध्ये सक्रिय असलेल्या ११ नक्षल्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर आत्मसमर्पण करून समाजाच्या मुख्य प्रवाहासोबत येण्याची तयारी दाखविली. विकास आणि संविधान हेच उन्नतीचे खरे मार्ग असून, हिंसाचार किंवा दहशतीच्या मार्गाने कोणताही समाज समाधानी व सुखी होत नाही. गडचिरोली जिल्ह्यात नक्षल्यांच्या कारवायांमुळे हेच चित्र वर्षानुवर्षे दिसत होते. बुधवारी आत्मसमर्पण करून शस्त्रे खाली ठेवलेल्या ११ नक्षल्यांपैकी विमला चंद्र सिदाम उर्फ तारक्का हिच्यावर वेगवेगळ्या प्रकरणांतील १७० हून अधिक गुन्ह्यांची नोंद होती. माओवाद्यांच्या पहिल्या फळीतील भूपती या नेत्याची पत्नी आणि पश्चिम बंगालमध्ये पोलिसी कारवाईत मारला गेलेल्या किसनजीची भावजय असल्यामुळे माओवाद्यांची म्होरकेगिरी करणाऱ्या तारक्काने गडचिरोली जिल्ह्यात माओवादी चळवळ रुजविण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याचे सांगण्यात येते. गेल्या सुमारे चार दशकांपासून ती नक्षली कारवायांमध्ये सक्रिय होती. शरण आलेल्या ११ नक्षल्यांच्या शिरावर एक कोटींहून अधिक रकमेचे इनाम जाहीर करण्यात आले होते. या टोळक्यांच्या कारवायांनी सामान्यांच्या जगण्यासमोर केवढी दहशत उभी करून ठेवली होती, याचा अंदाज येण्यासाठी ही माहिती पुरेशी आहे. गेल्या काही वर्षांत हे चित्र बदलताना दिसत आहे. गेल्याच महिन्यात या जिल्ह्यातील दोन कट्टर माओवाद्यांनी पोलिस आणि सीआरपीएफच्या साक्षीने शरणागती पत्करून शस्त्रे खाली ठेवली. तब्बल तीन दशकांपासून जिल्ह्यात हिंसक कारवाया आणि दहशत माजविणाऱ्या एका पर्वाच्या अंताचा आरंभ झाल्याचे संकेत तेव्हाच स्पष्ट झाले होते. या दोघांपैकी रामसु दुर्गा याच्यावर नऊ लाखांचे इनाम जाहीर करण्यात आले होते. शरणागती पत्करल्यानंतर या इनामाच्या रकमेपैकी निम्मी रक्कम त्यांच्या भवितव्यासाठी आणि सन्मानजनक पुनर्वसनासाठी त्याला देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले होते. गरिबी, बेरोजगारी समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अलग पडल्यामुळे निर्माण होणारी न्यूनगंडाची भावना आदी बाबी हेच भरकटण्याचे मूळ कारण असते. अशा भरकटलेल्या व कट्टरवादाच्या शिकवणीमुळे विवेक हरवलेल्यांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणावयाचे असेल, तर त्यांच्या भविष्याची वाटचाल निर्भर करावयास हवी. शरणागती पत्करून समाजासोबत सन्मानाने राहू इच्छिणाऱ्या नक्षलवाद्यांना या निर्णयामुळे भविष्यातील सुरक्षित जगण्याची हमी मिळत असून एका परिवर्तनाच्या पर्वाची ही सुरुवात अन्य समाजघटकांच्या सुरक्षिततेसाठीही शाश्वत विश्वासाची ठरणार आहे.

गडचिरोली जिल्हा नक्षलमुक्त करण्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांचे प्रयत्न महाराष्ट्राने याआधीच्या त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या कारकीर्दीतही अनुभवले आहेत. गेल्या दहा वर्षांपासून देशातील नक्षलवाद समूळ उखडून काढण्याकरिता केंद्र सरकारनेही बाह्या सरसावल्या आहेत. येत्या दोन ते तीन वर्षांत देशातील माओवादाची पाळेमुळे पूर्णपणे उखडून टाकलेली असतील, अशी ग्वाही सुमारे सहा महिन्यांपूर्वीच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिली होती. आत्मसमर्पण हाच सुरक्षित जगण्याचा एकमेव मार्ग असल्याने माओवाद्यांनी शस्त्रे खाली ठेवून शरण यावे व समाजाच्या मुख्य प्रवाहासोबत समाधानाने जगावे, असे आवाहनही त्यांनी केले होते. देशांतर्गत दहशतवादाबाबत शून्य सहनशीलता हे मोदी सरकारचे धोरण कठोरपणे राबविले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. एका बाजूला हिंसाचारमुक्त, सुरक्षित समाज व दुसरीकडे विकासाच्या वेगवेगळ्या प्रकल्पांद्वारे समाधानी आयुष्याची उभारणी करण्याचे प्रयत्न यांची सांगड घालून परिवर्तनाचा नवा पायंडा पाडण्यात महाराष्ट्राच्या महायुती सरकारने केंद्राच्या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. गडचिरोली जिल्ह्याच्या परिवर्तनाचे प्रयत्न गेल्या दहा वर्षांपासून सुरू होते आणि केंद्र व राज्य सरकारांच्या कणखर भूमिकेमुळे गेल्या चार-पाच वर्षांतील माओवादी कारवायांचे प्रमाणही लक्षणीयरीत्या घटले होते. गडचिरोली जिल्ह्यातून एकही व्यक्ती माओवाद्यांच्या संघटनेत सहभागी झाली नाही, एवढी एक बाब तेथील जनतेस सरकारविषयी वाटण्याच्या विश्वासाचा बोलका पुरावा म्हणता येईल. आता या जिल्ह्यात भौतिक विकासाचे प्रकल्प सुरू होत आहेत. या विकासाच्या वाटेवरून विश्वासाची बीजे रुजतील आणि भयमुक्तीचे नवे पर्व सुरू होईल. गडचिरोलीच्या विकासाची कटिबद्धता व्यक्त करणाऱ्या फडणवीस यांनी या जिल्ह्याचे पालकत्व शिरावर घेतले, तर या विश्वासास वजनही प्राप्त होईल.

## दखल

**डॉ. चंद्रशेखर टिळक**

# प्रतिबिंब दाखवणारे वर्ष

कोणत्याही दिवसाची आर्थिक घडी नीट असली तर रात्री शांत झोप लागते, हा आपला अनुभव आहे. या अर्थाने बघता येणारे २०२५ हे वर्ष सुखाचे आणि समाधानाचे जावे, असे वाटत असेल तर चोख आर्थिक नियोजनाला पर्याय नाही. २०२४ च्या पृष्ठभूमीवर सुरू होणारे हे वर्ष 'मागील पानावरून पुढे सुरू...' अशा स्वरूपाचे असणार नाही. म्हणूनच लागोपाठच्या या दोन वर्षांमधील महत्त्वाचे फरक लक्षात घेणे गरजेचे आहे. यातील पहिली बाब म्हणजे २०२४ केवळ आर्थिकदृष्ट्याच नव्हे तर सामाजिक आणि राजकीयदृष्ट्यादेखील भारतासह अनेक देशांसाठी आव्हानात्मक होते. रशिया-युक्रेन युद्ध अद्याप संपलेले नाही; खेरीज आजही ते कोणत्याही एका टप्प्यावर आलेले नाही. आजमितीला जगाच्या पटलावर जवळपास सात ठिकाणी युद्धसदृश परिस्थिती आहे. स्वाभाविकच युद्धकाळ सुरू असल्याचा परिणाम जागतिक दळणवळण यंत्रणेवर होत असतो, जो आताही जाणवू शकतो. विशेषत: अशा काळामध्ये मालाची वाहतूक कठीण होते. वाचकांना स्मरत असेल की, तालिबानने अफगाणिस्तानचा ताबा घेतला तेव्हा तेलाच्या खरेदीपेक्षा त्याच्या वाहतुकीचा खर्च जास्त होत होता. त्यामुळेच तेलाचे भाव खालच्या पातळीवर येऊनही भारतासारख्या देशाला देशांतर्गत बाजारपेठेमध्ये हे दर चढेच ठेवावे लागले होते. आता तशी परिस्थिती नसली, तरी या स्वरूपाचे सावट २०२५ च्या सुरुवातीच्या काळावर आहे, हे नाकारून चालणार नाही. २०२४ मध्ये जगातील ५० ते ५२ टक्के जनतेने मतदान केले हेही आपण लक्षात घ्यावे लागेल. या पृष्ठभूमीवर नव्या वर्षात या सगळ्या देशांमध्ये नवी राजवट सुरू होत आहे. जागतिक अर्थव्यवस्थेतील प्रथम स्थान राखणाऱ्या अमेरिकेचे उदाहरण द्यायचे झाले तर निवडणुकीपूर्वी ट्रम्प महोदयांनी केलेली निम्मी विधानेही अस्तित्वात आली तर जागतिक अर्थकारणाची दशा बदलणार नसली तरी दिशा खात्रीने बदलताना दिसू शकते. आता जागतिक अर्थव्यवस्था, व्यापार यातील भारताचा वाटा वाढलेला नसला, तरी त्यातील भारताचे स्थान नक्कीच वाढले आहे. देशाच्या भौगोलिक आकाराइतकेच आर्थिक आकारमानही महत्त्वाचे असते. या पृष्ठभूमीवर युद्ध, नवीन हालचाली आणि राजवटी यांचा नूतन वर्षामध्ये विचार करावा लागेल. देशाचा विचार करायचा तर २०२४ मध्ये आपल्याकडेही लोकसभा आणि काही राज्यांच्या विधानसभा निवडणुका झाल्या. या काळात लागलेल्या आचारसंहितेचा विचार अवश्य करावा लागेल. कारण २०२४ मधील जवळपास निम्मा काळ या ना त्या टप्प्यावरील आचारसंहितेमध्ये गेला. निवडणुकीची आचारसंहिता सुरू असताना धोरणात्मक निर्णय न घेण्याची आपल्या देशाची परंपरा आहे. येत्या काळात आपल्याला याचीच भरपाई करावी लागणार आहे. याचे मोठे प्रतिबिंब १ फेब्रुवारी २०२५ च्या अर्थसंकल्पामध्ये दिसू शकते. हीदेखील या वर्षीच्या अर्थव्यवस्थेतील फार मोठी बाब असेल.

आता आपल्या देशातील कराचे संकलन चांगल्या प्रकारे स्थिरावले आहे. जीएसटीचा विचार करता २०२४ या वर्षामध्ये एका महिन्याचा अपवाद वगळता आधीच्या महिन्यापेक्षा संकलन जास्त किंवा आधीच्या महिन्याच्या जवळपास राहिले आहे. ते कधीही आधीच्या महिन्यापेक्षा कमी दिसलेले नाही. ही जमेची बाजू म्हणता येईल. सध्या अर्थव्यवस्थेच्या वाढीची बरीच चर्चा आहे. काही जण ती कमी असल्याची टीकाही करीत आहेत. मात्र अन्य देशांची अर्थव्यवस्था तीन टक्क्यांच्याही आसपास वेगाने वाढत नसताना आपली अर्थव्यवस्था त्यापेक्षा बऱ्याच जास्त वेगाने वाढणे ही खचितच सकारात्मक बाब म्हणावी लागेल. या परिस्थितीचे परिणामही २०२५ मध्ये बघायला मिळणार आहेत. आता सुरू असणाऱ्या आर्थिक वर्षाचे केवळ तीन महिने शिल्लक आहेत. अर्थातच ते तीन महिने २०२५ मध्ये येतात. आजमितीची स्थिती सांगते की, २०२४-२५ च्या आर्थिक वर्षामध्ये वैयक्तिक आयकरापासून मिळणारे उत्पन्न कार्पोरेट टॅक्स म्हणजेच संस्थात्मक करांपेक्षा अधिक असेल. अजून तीन महिने जायचे असल्याने ही बाब खात्रीने सिद्ध करता येणार नाही, मात्र असे झाले तर कदाचित १ फेब्रुवारीनंतरच्या काळामध्ये एरवी घेतले नसते असे काही धोरणात्मक निर्णय घेतले जाण्याची दाट शक्यता आहे. आता राजकीय वातावरणामध्ये 'एक देश एक निवडणूक' हा चर्चेचा विषय राहिलेला नाही. पुढच्या सहा महिन्यांमध्ये त्याविषयी काही ठोस निर्णय घेतलेला दिसेल, अशी स्थिती आहे. अगदी त्याचप्रमाणे हा बदलही लवकरच दिसून येईल.

येत्या काळात कदाचित जुनी आयकर प्रणाली पूर्णपणे संपून आपल्याला नवीन करप्रणालीनुसारच आयकर भरावा लागेल आणि तसे पाऊल उचलले गेले तर मात्र आपल्या देशातले गुंतवणूक क्षेत्र पूर्णपणे बदलू शकते. कारण आज ४०-५० वर्षांपुढील मंडळींची २०-२५ वर्षे नोकरी झाली आहे. आपण वर्षानुवर्षे आयकरात सवलत देणारी ८० सी ची योजना राबवत आलो आहोत. मात्र त्यातील अनेक गुंतवणुकींना 'लॉक इन' काळ असतो. कधी तीन वर्षे तर कधी पाच वर्षे असा हा कालावधी असतो. म्हणजेच या प्रणाली अंतर्गत गुंतवणूक करणाऱ्यांचा लॉक इन कालावधी अद्यापही संपलेला नाही. आज परिस्थिती अशी आहे की, आपल्या देशात लॉंग टर्म कॅपिटन गेन टॅक्सही आहे आणि शॉर्ट टन कॅपिटल गेन टॅक्सही आहे. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये या दोन्हीच्या करदरामध्ये वाढ करण्यात आली होती. आता एप्रिल २०२५ पासून सुरू होणाऱ्या आर्थिक वर्षामध्ये अशा पद्धतीने आर्थिक करात सवलत मिळण्याची करप्रणालीच राहिली नाही तर त्याकडे वळणाऱ्या गुंतवणुकीचा ओघ खात्रीने कमी होईल. याचा परिणाम जानेवारीपासूनच जाणवेल. कारण आपण जानेवारी महिन्यापासून पिढीजात मनोवृत्तीने आणि सवयीने करविषयक गुंतवणूक करत आलो आहोत. आपण ती एप्रिलपासून सुरू होणाऱ्या आर्थिक वर्षामध्ये करत नाही. म्हणूनच आता या बदलाची चाहूल लागली तर पैसे गुंतवणारा मोठा वर्ग आधीच्या वाटेने जाणार नाही, असे वाटते. अशा परिस्थितीमध्ये गुंतवणुकीच्या अन्य साधनांना चालना मिळणे स्वाभाविक आहे.

आपल्या देशात दोन वयोगटातील ग्राहक आहेत. एक वयोगट सेवानिवृत्तांचा आहे, जो सेकंड होमचा विचार करायचा. पण काळाच्या ओघात त्याचे प्रमाण कमी होत आहे. म्हणजेच आपल्या देशात आठवड्याअखेरीस होणाऱ्या भटकंतीचे प्रमाण वाढले असले तरी त्यासाठी वेगळे घर घेऊ पाहणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे हाऊसिंग क्षेत्राला या वयोगटातून येणारी मागणी कमी झाली आहे. हाऊसिंगची मागणी करणारा दुसरा वयोगट तिशीच्या मागील वा पुढील होता. मात्र आताच्या जमान्यात हा वर्गही विकएंड होमकडे पाठ फिरवताना दिसत आहे. सुट्टीमध्ये बाहेर जात असले तरी वायफाय असणे, चांगले मोबाईल नेटवर्क, राहण्या-खाण्याच्या उत्तम सोयी या त्यांच्या प्रमुख गरजा झाल्या आहेत. त्यामुळेच कुठेही जाताना वा घरे घेताना हा विचार ते प्राधान्याने करतात. विकएंड होमचा ग्राहकवर्ग घटण्याला हा विचारही कारणीभूत ठरत आहे. त्यातही आता महाराष्ट्रासारख्या महत्त्वाच्या राज्यात १७ वर्षांनी पुनर्विकासाची परवानगी मिळू लागली आहे. त्यामुळे राज्यातील कोणतेही महत्त्वाचे शहर घेतले तरी लोक राहते घर विकण्यास तयार दिसत नाहीत. मात्र याचा दुसरा परिणाम अचानक वाढलेल्या पुरवठ्यामध्ये दिसत आहे. जुन्या इमारतींचा पुनर्विकास झपाट्याने होत असल्यामुळे नवी घरकुले विक्रीसाठी उपलब्ध होत असली तरी खरेदीचा वेग मात्र तेवढा दिसत नाही.

रिअल इस्टेट ही राजकीय क्षेत्राशी संबंधित असणारे क्षेत्र आहे. मात्र दोनही महत्त्वाच्या निवडणुका होऊन गेल्यामुळे आता ते स्थिरावले आहे. त्यामुळेच यामधील काळात घडामोडी वेगवान करण्यासाठी सरकारलाच याकडे लक्ष द्यावे लागेल. कारण ते राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणग्यांच्या दृष्टीनेही महत्त्वाचे असते आणि या क्षेत्रात निर्माण होणारा प्रत्यक्ष रोजगारही सरकारच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. तो हंगामी वा कायमस्वरूपी अशा कोणत्याही स्वरूपाचा असला तरी रोजगार निर्माण होतो आणि मुख्य म्हणजे तो दिसतो, हे महत्त्वाचे आहे. या सगळ्याचा विचार करता पुढचे चार-पाच महिने तरी हाऊसिंग सेक्टरमध्ये पैसे गुंतवण्यास योग्य परिस्थिती दिसणार नाही. हे लक्षात घेऊन २०२५ चे आर्थिक नियोजन करायला हवे.

(लेखक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आहेत)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# गावाचा विचार; जय गुरुदेव

राज्यात विधानसभेच्या निवडणुका झाल्या. भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महायुतीला भरभरून दान मिळालं. सरकार स्थापन करण्यासाठी होत असलेल्या विलंबाविषयी अनेक तर्कवितर्क लावले जात होते आणि आजही मंत्रिमंडळ स्थापन करायला उशीर का लागला, याची कल्पना आहे का, असा प्रश्न सत्ताधारीच नव्हे, तर विरोधी पक्षातीलही राजकीय तज्ज्ञ विचारतात. पण, हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर युवकांचे नेतृत्व करणाऱ्या फडणवीस यांनी पेटारा फोडला. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावणाऱ्या होत्या. राज्यात यावेळी महायुती सरकारमध्ये ५० ते ६० युवा आमदार निवडून आले आहेत. त्यापैकी जवळपास ११ तरुणांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले. (सर्वात तरुण आमदार वरोरा मतदार संघातील करण देवतळे आहेत.) या मंत्रिमंडळात जवळपास सर्वच मंत्री उच्चशिक्षित आणि कल्पक आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना विश्वासात घेऊन मंत्रिमंडळ तयार केले. त्यानंतर पुन्हा काही दिवसांनी खाते वाटप करण्यात आले. असे म्हणतात, आरंभ शूर शेवटपर्यंत टिकत नाही. त्यामुळे कदाचित मुख्यमंत्री फडणवीस अतिशय शांतपणे निर्णय घेत पाच वर्षांच्या कार्यकाळाचे गणित मांडत असतील. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी फडणवीस यांनी देशात नक्षलवादी जिल्हा म्हणून कुप्रसिद्ध असलेल्या गडचिरोली जिल्ह्याला महाराष्ट्रातील पहिला जिल्हा म्हणून ओळख होईल, असा विश्वास दिला. फडणवीसांच्या मंत्रिमंडळात असलेले मंत्रीही काही कमी नाहीत. त्यांच्याकडे अनेक कल्पना आहेत. वर्धेला अनेक वर्षांनंतर आणि भाजपाने पहिले मंत्रिपद दिले. आज ते मूळचेच भाजपाचे असल्यासारखे वाटू लागले आहेत. रविवारी त्यांनी दोन महत्त्वाचे विषय मांडले. त्यातला एक विषय त्यांच्याच मंत्रालयासंदर्भात होता. त्यामुळे आपले खाते राज्यात अव्वल कसे असेल यासाठी त्यांनी केलेले नियोजन असेल, असे एकदा आपण म्हणू या! परंतु, दुसरा विषय त्यांनी मांडला तो राज्याचा, आपल्या नेतृत्वाचा आणि आपण ज्या विचाराच्या



पक्षात काम करतो आहे याचे उदाहरणच म्हणावे लागेल. राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी जी कल्पना मांडली ती पक्षशिस्त आणि आपल्याला मिळालेल्या पदाच्या मर्यादांची जाणीव ठेवली. देशात आपआपल्या समाजासाठी काम करणाऱ्या अनेक संघटना आहेत. परंतु, जातिपाती या चौकटीच्या बाहेर जात सकल समाजाचा विचार करणाऱ्या दोन संघटना आहेत. त्यात पहिली म्हणजे 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' आणि दुसरी 'गुरुदेव सेवा मंडळ.' दोन्ही संघटनांमध्ये स्वयंसेवक व गुरुदेव सेवक नि:स्वार्थपणे कामं करताना दिसतात. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी दिलेल्या संदेशाचे काटेकोर पालन ही मंडळी डोक्यावर भगवी टोपी घालून करताना दिसून येतात. याच गुरुदेव सेवा मंडळाच्या सेवकांमार्फत राष्ट्रसंतांच्या विचारावर महाराष्ट्रात ग्राम विकासाला चालना देण्याची कल्पना राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मांडली. गुरुदेव सेवा मंडळ अतिशय प्रामाणिकपणे काम करते. राष्ट्रसंतांना अभिप्रेत समृद्ध म्हणजे स्वावलंबी गावासाठी राज्य सरकारच्या ग्रामीण विकासाच्या योजना 'जय गुरुदेव'च्या माध्यमातून राबवावी. कारण गुरुदेवभक्त अतिशय प्रामाणिक व चिकाटीने काम करतात, ही ना. भोयर यांची कल्पना प्रत्यक्ष उतरल्यास तुकडोजी महाराजांच्या 'ग्राम स्वराज्य' या संकल्पनेला पुन्हा एकदा चालना मिळायला सुरुवात होईल. ग्राम विकास हे आपले मंत्रालय नाही, ही जाणीव ठेवत आपल्या राज्यात आपल्या गुरुदेव भक्तांचा या निमित्ताने सन्मान होईल आणि एक मोठी चळवळ या राज्यात उभी होईल. ना. भोयर यांनी गेल्या पाच वर्षांत वर्धा विधानसभा मतदार संघात राष्ट्रनेता (पंतप्रधान नरेंद्र मोदी) ते राष्ट्रपिता (महात्मा गांधी) असा सेवा पंधरवडा राबवत शासकीय योजनांचा जागच्या जागी निपटारा करण्याची मोहीम राबविली. हे अभियान आता राज्यात राबविले जाणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या भजनांमधून देशभक्ती गावागावांत पोहोचविली. खेडी बकाल होऊ नये यासाठी शेतकरी गावातच समृद्ध व्हावा, गावाची समृद्धी गावाने राखावी, सरकारने मदत करावी या अर्थाने प्रबोधन केले आहे. गावात शांतता नांदण्यासाठी गावातील तंटे गावातच मिटावे तसेच खतही तुमचे तसेच बियाणेही तुमचे आदी अनेक ग्राम विकासासाठी योजना दिल्या. मात्र, 'ग्राम स्वराज्य' हा शब्दच काही वर्षांत हद्दपार झाल्याचे दिसून येते. मंत्रिमंडळ कुटुंब असल्याचे समजून गुरुदेव सेवा मंडळाच्या सेवकांच्या माध्यमातून राज्य सरकारने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची संकल्पना राबविली तर सरकार वेगळी उंची गाठल्याशिवाय राहणार नाही. गावाच्या आशीर्वादाने समृद्ध सरकार झाल्याशिवाय राहणार नाही.

जय गुरुदेव...! जय श्रीराम...!!

९८८१९०३७६५


## प्रासंगिक

**मोरेश्वर बडगे**

# 'वाल्मीक कराड' का जन्माला येतात?

महिन्यापूर्वी वाल्मीक कराड हे नाव बीड जिल्ह्यापलीकडे फारसे कोणाला माहीत नव्हते. आज या नावाची राज्यभर जोरदार चर्चा आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबरला निर्घृण हत्या करण्यात आली आणि वाल्मीक कराड हे नाव, त्याची 'बीडगिरी' अचानक चर्चेत आली. आपल्याकडे हत्या होतात आणि पोलिसांच्या दप्तरी बंद होतात. हाकबोंब नसते. ही हत्याही तशीच लिहिण्याचा पोलिसांचा हिशोब असावा. मात्र, विधिलिखित काही वेगळे होते. सरपंचाच्या हत्येनंतर बीडमधील राजकीय वातावरण ढवळून निघाले. पोलिसांनी एकूण सात पैकी चार आरोपींना पकडले. मात्र, या हत्येचा सूत्रधार वाल्मीक कराड आहे, त्याच्या सांगण्यावरून हत्या झाली, असा सरपंचाच्या कुटुंबीयांचा आरोप आहे. पवनचक्की कंपनीकडे कोट्यवधी रुपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी कराडच्या विरोधात गुन्हा दाखल आहे. त्याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल करा या मागणीसाठी बीड खदखदत होते. हत्येनंतर तब्बल १७ दिवसांनी हत्येचा तपास सीआयडीकडे सोपवला गेला. सीआयडीपुढे हजर होण्याऐवजी कराड फरार झाला. पोलिसांना तो सापडत नाही बीडचे म्हणून राजकारण तापले. मोठा मोर्चा निघाला. तब्बल २२ दिवसांनी कराड स्वतःहून शरण आला. शरण येण्यापूर्वी त्याने एक व्हिडीओ केला. 'आपल्याविरुद्ध खंडणीची खोटी तक्रार दाखल झाली आहे. राजकीय द्वेषापोटी माझे नाव गोवण्यात आले आहे,' असे त्याचे म्हणणे आहे. आता प्रश्न असा आहे की, संबंध नाही तर तो २२ दिवस लपून का होता? कोर्टाने त्याला पोलिस कोठडीत पाठवले आहे. त्याची चौकशी होईल. 'कोणालाही सोडणार नाही' असे मुख्यमंत्री आणि राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. त्यामुळे या प्रकरणात पुढे काय होते याकडे साऱ्यांचे लक्ष आहे.

कारण हे प्रकरण साधे नाही. कराड हा अजितदादांच्या राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे अन्न आणि पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांचा खास विश्वासू कार्यकर्ता म्हणून ओळखला जातो. एवढा आरडाओरडा झाल्यानंतर खरे तर अजितदादांनी जोरदारपणे पुढे यायला हवे होते. तसे झाले नाही. धनंजय मुंडेंनी रोखठोक भूमिका घेतली हे खरे; मात्र सरपंचाच्या हत्येचा खरा सूत्रधार कोण? हे अजूनही गूढ आहे. वाल्मीक कराड हा कार्यकर्ता आहे. तर मग एका कार्यकर्त्यावरून एवढा गहजब का, असा प्रश्न लोकांना पडणे साहजिक आहे. पण हा कार्यकर्ता साधा नव्हता. मग कोण होता आणि कोण झाला हा वाल्मीक कराड? एखाद्या सिनेमात शोभेल अशी ही स्टोरी आहे.



कराड हा मूळचा गरीब कुटुंबातला. हलाखीची परिस्थिती. पोटापाण्याच्या शोधात परळीला आला. भाजपाचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्याकडे वाल्मीक घरगडी होता. घरची लहानसहान कामे तो करायचा. खटपटी होता. व्हीसीआर भाड्याने आणून गावच्या जत्रेत सिनेमा दाखवायचा. गोपीनाथ मुंडे आणि पंडित अण्णा मुंडे हे दोघे बंधू. दोघे वेगळे झाले तेव्हा कराडने पंडित अण्णा यांचे पुत्र धनंजय मुंडे यांच्याशी जवळीक साधली. परळीला औष्णिक ऊर्जा प्रकल्प आहे. तिकडचे लहानसहान ठेके तो घेऊ लागला. हळूहळू त्याने स्वतःचा ग्रुप तयार झाला. दहशतीच्या जोरावर आपले साम्राज्य उभे केले. परळी प्रकल्पातून निघणाऱ्या राखेचा अवैध उपसा, वाळूची तस्करी अशा अनेक धंद्यामध्ये तो उतरल्याचे बोलले जाते. वाल्याचा वाल्मीकि झाला, हे आपल्याला माहीत आहे. पण इथे वाल्याचा वाल्मीक आणि पुढे वाल्मीकअण्णा झाला. राजकारण करायचे तर पैसा लागतो. राजकारण करायचे तर कार्यकर्ते लागतात. त्यांची सोय करावी लागते. कार्यकर्ता आणि पुढे आमदार व्हायचे मार्ग पैशातून शोधण्याचा प्रयत्न होतो. गेली १५ वर्षे कराड हा धनंजय मुंडे यांचे 'राजकीय व्यवस्थापन' सांभाळत आला आहे. मुंडेंचा कार्यकर्ता म्हणून जिल्ह्यात त्याचा दबदबा असायचा. त्याच्या साध्या फोनवर लोकांना कामं मिळायला लागली. लोक जे बोलतात ते भयंकर आहे. 'वाल्मीकअण्णाला फोन करायला सांगू का?' असे म्हणताच त्याच्या माणसांची कामं पटापट व्हायला लागली. त्यातूनच मग खंडणी मागणे सुरू झाले. वाल्मीकअण्णा 'प्रतिपालकमंत्री' बनला. जिल्ह्यात कुठले अधिकारी आणायचे ते तो ठरवू लागला. गेली अनेक वर्षे तेच ते अधिकारी. तेही बहुसंख्य एकाच जातीचे. कुंपणाने शेत खाल्ले. 'कराडशिवाय धनुभाऊंचं पान हालत नाही' असे एकदा पंकजा मुंडे म्हणाल्या होत्या. या एका वाक्यात वाल्मीकचा सारा बायोडाटा येतो.

सरपंचाच्या हत्येनंतर उजेडात आलेली बीडची गुंडगिरी, दहशत, खंडणीखोरी आणि याला असलेला राजाश्रय अंगावर काटे आणणारा आहे. गेल्या १० महिन्यांत बीड जिल्ह्यात ३६ हत्या झाल्या, १६८ खुनाचे प्रयत्न झाले आणि १५६ महिलांवर अत्याचाराचे प्रकार झाले. जिल्ह्यात १३०० शस्त्र परवाने वाटले गेले आहेत. सत्ता आणि श्रीमंती मिरवण्यासाठी कंबरेला पिस्तूल लटकवून फिरणं ही इथली फॅशन बनली आहे. या जिल्ह्यात गेल्या दीड वर्षात ३०० पवनचक्क्या कशा उभ्या झाल्या, याचे उत्तर कोणाकडे असेल? प्रत्येक राजकारण्याला एखादा बाहुबली मदतीला लागतो, हे कटू सत्य आहे. प्रत्येक जिल्ह्यात एखादा 'कराड' असतो. नेते एकमेकांना सांभाळून घेतात. लोकही अशा नेत्यांना निवडून देतात. त्यातून मग एखाद्या जिल्ह्याचा 'मिर्झापूर' होतो. आज सारे आमदार कराडच्या विरोधात उभे आहेत; पण कराड गेली २५ वर्षे लपून थोडीच होता. मग चुकीचे धंदे झाले असतील तर ते कसे खपवून घेतले गेले? विरोधकांचे टार्गेट काय? कराड की मुंडे? कराडच्या आडून विरोधकांना इथे धनंजय मुंडे यांना संपवायचे आहे का? देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे पालकमंत्रिपद स्वीकारावे, अशी मागणी त्यातूनच पुढे आली आहे. म्हणजे सारी जबाबदारी फडणवीस यांच्या गळ्यात टाकून हे नेते धिंगाणा घालायला मोकळे! बीडच्या मामल्यात विषय सरळ आहे. फडणवीस यांना न्याय करायचा आहे आणि विरोधकांना राजकारण करायचे आहे. फडणवीस हे कर्तव्यकठोर मुख्यमंत्री आहेत. राजकारणाचा चिखल झाला असतानाही जनता त्यांच्याकडे आशेने आणि विश्वासाने पाहते. त्यामुळे नवा कराड, नवनवे कराड तयार होणार नाहीत, हे पाहण्याची जबाबदारी फडणवीसांवर वाढली आहे. सारी यंत्रणा सडली आहे. काही मोजके कर्मचारी, अधिकारी उरले आहेत. त्यांच्या जोरावर प्रशासनाचा खांब तग धरून आहे. स्वच्छ, पारदर्शक प्रशासन केवळ घोषणा देऊन मिळत नसते. त्यासाठी प्रत्येकाला स्वच्छ व्हावे लागेल.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### मंदिरे आध्यात्मिक आणि संघटनशक्तीचा स्रोत

शिर्डी येथे तृतीय महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदेचे अधिवेशन पार पडले. मंदिरे ही सनातन उर्जेची स्रोत कशी होऊ शकतात याचे समर्पक विवेचन या अधिवेशनात केले आहे. मंदिरात धर्मशिक्षण वर्ग घेणे, हिंदुहितासाठी योग्य असणारे निर्णय मंदिरात एकत्र जमून घेणे, त्यासाठी मंदिरात एकदा महाआरतीचे नियोजन करणे, मंदिर सरकारीकरण थांबवण्यासाठी सरकारवर दबाव आणणे, हिंदू धर्मीयांचे अनेक सण मंदिरात सामूहिकरीत्या साजरे करणे; जेणेकरून हिंदूंमध्ये एकजूट निर्माण होईल. आज आपण बघतो की, इतर धर्मीयांना त्यांच्या धर्माचे शिक्षण दिले जाते; परंतु हिंदू धर्मीयांना मात्र त्यांच्या धर्माचे योग्य आणि शास्त्रशुद्ध शिक्षण कुठेच दिले जात नाही. मग धर्मांतर आणि जिहादसारख्या घटना घडत असतात. असे शिक्षण मंदिरातूनच का देण्यात येऊ नये? हेच सूत्र या अधिवेशनात मांडण्यात आले. त्याचबरोबर प्रत्येक मंदिरात जर गोशाळा उघडल्या तर गोमातेचे संरक्षण आणि संवर्धन अशा दोन्ही गोष्टी साध्य होतील; सोबतच प्रचुर प्रमाणात गाईपासून मिळणाऱ्या उत्पादनांमुळे एक सुदृढ आणि बलशाली भारत तयार होईल. यातून रोजगार निर्मिती होईल ती वेगळीच. शिवाय सर्वच विषयांवर या अधिवेशनात चर्चा करण्यात आली. आठवड्यातून एकदा प्रत्येक मंदिरात महाआरतीचा निर्णय घेण्यात आला. असे करून आपणही या कार्यात खारीचा वाटा उचलू शकतो.

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

### एकात्मिक राष्ट्रवाद हीच संघाची भूमिका

मंदिर-मशीद वाद आता नको ही भूमिका सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी जाहीर करताच सोशल मीडिया आणि काही धर्मसंघटनांनी विरोधाभासी विचार मांडलेले आहेत. देशातील आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे विश्वात गृहयुद्धाची बीजे पेरून नरसंहार सुरू आहे; ते थांबलेच पाहिजे ही त्यामागील त्यांची भावना समजून घेण्यास एकात्मिक राष्ट्रवाद समजून घेणे गरजेचे आहे. या देशातील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक स्थित्यंतरे आणि राजकीय बदलांची परिणामकारकता यांच्या अनुषंगाने जे दूरदर्शित्व असायला पाहिजे; त्याकरिताच सरसंघचालक यांनी हे आव्हान केलेले आहे. कारण देशाची एकात्मता, अखंडता आणि शांतता महत्त्वाची आहे.

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

## वाचक पत्रे

### एन्फ्लूएन्झाला गांभीर्याने घ्यावे

ठाणे, रायगड आणि मुंबईमध्ये सध्या एन्फ्लूएन्झाच्या तापाने धुमाकूळ घातला असून या तापाचे रुग्ण वाढत चालल्याने आरोग्य विभागाची डोकेदुखी वाढली आहे. एन्फ्लूएन्झा तापाने आजवर महाराष्ट्रात ७२ बळी घेतले. त्यात मुंबईतील पाच रुग्णांचा समावेश आहे. एन्फ्लूएन्झा तापाचे मुंबईत ७८५ तर ठाण्यात २८० रुग्ण आढळले आहे. मुंबई-ठाण्यातच या आजाराचे रुग्ण सापडत होते; आता रायगडमध्येही रुग्ण सापडल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. अर्थात प्रशासनाने हा आजार आणखी वाढू नये यासाठी तयारी केली आहे. राज्यातील जिल्हा उपरुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयात विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आले आहे. या आजाराची लक्षणे कोरोनासारखीच आहेत. ताप, खोकला, घसादुखी, अंगदुखी, डोकेदुखी, जुलाब, उलट्या आदी. कोरोना इतका घातक नसला तरी चिंता वाढवणारा आहे. त्यामुळेच नागरिकांनी थंडी, खोकला, ताप अंगावर काढू नये. त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. एन्फ्लूएन्झा तापाकडे दुर्लक्ष करणे घातक ठरू शकते.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### उन्मादाचा पहिला बळी

२३ डिसेंबर २०२४ च्या अंकात वेध 'उन्मादाचा पहिला बळी' या शीर्षकाचा अनिरुद्ध पांडे यांचा लेख वाचला. पू. स्वामी श्रद्धानंद मुस्लिमांच्या धार्मिक उन्मादाचे बळी होतेच; पण त्यांच्या खुन्याची गांधींनी केलेली पाठराखणही संतापजनकच होती. यानिमित्त काँग्रेसचा इतिहास डोळ्यांसमोर आला. १८८५ मध्ये अलेक्स डग्लस ह्युम यांनी काँग्रेस स्थापन केली. पुढे त्यातील एक सदस्य दादाभाई नौरोजी यांनी भारतावरील ब्रिटिश शासकांच्या अन्यायाविरुद्ध वाचा फोडली. लोकमान्य टिळक यांनी स्वातंत्र्याचा शंख फुंकला. काँग्रेसमधील जहाल गटाचे नेतृत्व केले. त्यांचा मृत्यू स्वातंत्र्य लढ्यावर वज्राघातच म्हणावा लागेल. त्यानंतर गांधीच्या अतिरेकी मुस्लिम लांगूलचालनास सुरुवात झाली. त्याचे स्वामी श्रद्धानंद यांचा खून व खुन्याचे समर्थन हे उदाहरण आहे. तेव्हापासून काँग्रेसचे अतिरेकी मुस्लिम लांगूलचालन चालू झाले, हिंदूंवर अत्याचार व लाखो हिंदूंच्या हत्या झाल्या. अखेर देशाचे विभाजन झाले. अजूनही काँग्रेस व त्यामधून निर्माण झालेले पक्ष हेच चालू ठेवत आहेत. यासाठीच भाजपा व हिंदुहितैषी पक्ष व हिंदुत्ववादी संघटनांनी सक्रिय राहणे ही काळाची गरज आहे.

**डॉ. आनंद फडके**/९४२२१०८३८२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### शेतकऱ्यांनो, कापूस टाळा - सोनपेठ कृषि अधिकाऱ्यांचे आवाहन

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** सोनपेठ तालुक्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे बहुतांश कापसाचे उत्पादन हाती आले आहे. तरीही ओलिताची सोय असणारे शेतकरी अजूनही कापूस पिकास ओलित व रासायनिक खते देऊन कापूस पिकाचा नवीन बहर घेण्याची तयारी करत आहेत. परंतु, गुलाबी बोंडअळीस खाद्य मिळाल्यास वर्षभर आपले जीवनचक्र सुरू ठेवते, त्याामुळे गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता असते, नंतर त्याावर नियंत्रण करणे कठीण होऊन बसते. त्याामुळे शेतकऱ्यांनी कापूस फरदड घेण्यास टाळावे, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी प्रियंका कावरे यांनी केले आहे.

चालूवर्षी शेतकऱ्यांनी कापूस पिकाची फरदड घेण्याचा हव्यास न टाळल्यास आगामी खरीप हंगामातील कापूस पिकास गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तालुक्यातील सर्व कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी कापूस पिकाचा कालावधी पूर्ण झाला असल्याने पीक शेतातून काढून टाकावे. पिकाचे अवशेष नष्ट करावे व शेतातून उपटून काढण्यापूर्वी गुरे व इतर जनावरे कापूस पिकात चराईसाठी सोडावे. ते गुलाबी बोंडअळीच्या बोंडात असलेल्या अवस्था खाऊन नष्ट करतील. गुलाबी बोंडअळीची कोषावस्था ही जमिनीत राहत असल्याने जमिनीची खोल नांगरट करावी. या खोल नांगरटमुळे बोंडअळीचे कोष वर येतील, वर आलेल्या काही कोषांना पक्षी खातील व उर्वरित कोष उन्हामुळे नष्ट होतील, अशाप्रकारे बोंडअळीचा प्रादुर्भाव आपण सर्वांनी मिळून नियंत्रण करावा, आज रोजी ज्याच्या शेतात पऱ्हाटीची फरदड घेतली जात असेल, त्याांनी ती फरदड न घेता इतर कुठलेही पीक घ्यावे व या गुलाबी बोंडअळीचा नायनाट करावा, असेही आवाहन तालुका कृषी अधिकारी कावरे यांनी केले आहे.

उन्हाळी ओलिताची सोय असल्यास उन्हाळी मूग सारखे कमी कालावधीचे पीक घेतल्यास पिकाची फेरपालट होईल. याकरिता सोनपेठ तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी आपल्या शेतात उभे कापसाचे पीक असल्यास लवकरात लवकर ते काढून नष्ट करावे. जेणेकरून गुलाबी बोंडअळी या किडीचा बंदोबस्त करणे सोयीचे होईल, असेही कावरे यांनी म्हटले आहे.

### मंजूर निधी परत जाता कामा नये- गावडे

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत मंजूर नियतव्ययानुसार विविध विकास कामे विहित वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. कालावधी कमी असल्यामुळे ज्या विभागांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही अद्याप झालेली नाही, त्याांनी तात्काळ कार्यवाही पूर्ण करुन विकास कामे सुरु करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज शुक्रवार ३ जानेवारी रोजी जिल्हा वार्षिक योजनेबाबत आढावा बैठक पार पडली. त्याावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, जिल्हा नियोजन अधिकारी किशोरसिंग परदेशी, समाजकल्याण विभागाच्या सहायक आयुक्त गीता गुट्टे आदींसह विभागप्रमुख उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले की, चालू वर्षातील जिल्हा वार्षिक योजनेचा निधी हा विकास कामांवर खर्च करण्यासाठी कमी कालावधी उरला आहे. मंजूर नियतव्ययानुसार विविध विकास कामे विहित वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. कामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार व्हावीत. तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही तात्काळ पूर्ण करुन विकास कामे सुरु करावीत. मंजूर संपूर्ण निधीचा विनीयोग करावा. निधी परत जाता कामा नये, याची खबरदारी घ्यावी. सर्व विभागांनी आयपास प्रणालीचा वापर करूनच कार्यवाही पूर्ण करावी, असे निर्देश त्याांनी दिले. बैठकीत सन २०२३-२४ आणि २०२४-२५ या वर्षातील कामांचाही आढावा घेण्यात आला. प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी सूचित केले.

### परभणीत आज सर्वपक्षीय मुक मोर्चा

**परभणी,/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील मस्सजोग या गावचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्याा करणाऱ्या सर्व आरोपींना तातडीने अटक करून त्याांना फाशीची शिक्षा व्हावी या मागणीसाठी शनिवारी (दि.४) परभणीमध्ये सर्वपक्षीय, सर्वजातीय, सर्वधर्मीय मोर्चा काढण्यात येणार आहे.

सकाळी ११ वाजता जिंतूर रस्त्याावरील नूतन महाविद्यालयापासून हा मोर्चा निघणार असून महाराणा प्रताप चौक -शनी मंदिर - नानल पेठ कॉर्नर- छत्रपती शिवाजी चौक- गांधी पार्क- नारायण चाळमार्गे महात्मा फुले पुतळा तेथून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरात या मोर्चाचा समारोप होणार आहे. या मोर्चात स्व.संतोष देशमुख यांचे कुटुंबीय तसेच मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील, आमदार सुरेश धस, खासदार बजरंग सोनवणे, अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आमदार संदीप क्षीरसागर, ज्योतीताई मेटे व स्थानिक लोकप्रतिनिधी, खासदार, आमदार उपस्थित राहणार आहेत.

स्व.संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी गुरुवारी सर्वपक्षीय, सर्व समाज आणि संघटनांची एकत्र बैठक घेण्यात आली. या बैठकीच्या सुरुवातीला सर्वांनी स्व.देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बीड जिल्ह्यातील आपल्या बांधवाला न्याय देण्यासाठी तसेच जिल्ह्यातील संघटित गुन्हेगारी, दहशत व जातीयवाद मोडीत काढण्यासाठी या मोर्चाचे या बैठकीद्वारे नियोजन करण्यात आले आहे. दरम्यान, मुक मोर्चात परभणी जिल्ह्यातील, तालुक्यातील सर्व जाती-धर्मातील बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन सर्व पक्ष संघटना, मित्र मंडळ, सकल मराठा समाज यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### लंगोटे करणार रस्ते कामासाठी उपोषण

**परभणी,/प्रतिनिधी :** जिंतूर रस्त्याावरील वीज वितरण कंपनी ते स्त्री रुग्णालय तेथून पुढे वैकुंठधाम स्मशानभूमी पर्यंतच्या रस्त्याचे काम महापालिका प्रशासनाने तात्काळ सुरु करावे, अन्यथा आपण १ जानेवारीपासून बेमुदत उपोषणास बसू, असा इशारा माजी नगरसेवक विकास प्रभाकरराव लंगोटे यांनी दिला आहे.

तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# प्रशासनाने लोकाभिमुख कारभार करून सुलभता आणावी - आ.डॉ.गुट्टे



**गंगाखेड,/प्रतिनिधी:-** आपल्या विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य जनता व गरजू घटकांचे प्रलंबित प्रश्न, समस्या व अडचणी दूर करून पारदर्शक कारभार करणे आवश्यक आहे. तसेच विकासाच्या दृष्टीने आपला मतदारसंघ राज्यात अग्रेसर करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची गरज आहे. प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी म्हणून आपली ती नैतिक जबाबदारी सुध्दा आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनाने लोकाभिमुख कारभार करून सुलभता आणावी, असे प्रतिपादन आ.डॉ.रताकर गुट्टे यांनी केले.

शहरातील संत जनाबाई महाविद्यालय सभागृहात आयोजित प्रशासकीय आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी गंगाखेड, पालम आणि पूर्णा तालुक्यातील प्रशासकीय समस्या व प्रश्नांसह वस्तुस्थितीचा आढावा आ.डॉ.गुट्टे यांनी घेतला. या बैठकीस मतदारसंघातील सर्व विभागांचे प्रमुख उपस्थितीत असल्यामुळे सखोल चर्चा झाली. तसेच भविष्यातील धोरण सुद्धा ठरविण्यात आले.

पुढे बोलताना आ.डॉ.गुट्टे म्हणाले की, क्षेत्रफळाच्या दृष्टीने आणि लोकसंख्येच्या आधारे आपला मतदारसंघ मोठा आहे. त्याामध्ये तीन तालुके आणि तब्बल २८४ गावांचा समावेश आहे. तरीही विकासाच्या दृष्टीने समतोल राखला गेला पाहिजे, याकडे माझे विशेष लक्ष असते. मागील टर्ममध्ये प्रशासनाचे सहकार्य असल्यामुळे अतिशय समाधानकारक काम करता आले. त्यााची नोंद सर्वसामान्य जनतेने सुध्दा घेतली आहे. परिणामी, माझ्या विजयासह राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाले आहे. त्याामुळे पुन्हा एकदा नव्या जोमाने कामाला सुरुवात करून जनसेवा करायची आहे. त्याासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय असायलाच हवा, हे लक्षात ठेवून कारभार गतिमान करा. आपल्या मतदारसंघात चांगले व पारदर्शक काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पाठीशी कायम उभा असेन. परंतु, लोकांना त्रास देणाऱ्या किंवा त्याांची अडवणूक करणाऱ्या कोणत्यााही अधिकाऱ्याला सोडणार नाही. मग तो अधिकारी कितीही मोठा असेल तरी हरकत नाही. कारण, लोकांची कामे मार्गी लावणे, त्याांना सोयी-सुविधा पुरवणे ही प्रशासनासह माझीही जबाबदारी आहे. त्याामुळे लोकांमध्ये मिसळून काम करा. त्याांचे प्रश्न समजून घ्या. त्याांना दर्जेदार व पारदर्शक सेवा द्या. शासनाच्या योजनांची व निर्णयांची माहिती सुद्धा संबंधित लोकांपर्यंत पोहोचवा, असेही आवाहन आ.डॉ.गुट्टे यांनी केले. समाजातील गरजू लाभार्थ्यांना दिलासा मिळावा तसेच विविध घटकांचे जीवनमान उंचावावे, यासाठी शासन धोरणात्मक योजना व निर्णय घेत असते. त्याामुळे शासनाच्या सर्व योजना व निर्णय लोकांपर्यंत पोहोचवण्यात कसलीही हयगय करून चालणार नाही. तसेच जनतेला गावोगावी रस्ते, पाणी, आरोग्य, शिक्षण, वीज यासह इतरही पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती पाऊले उचला. ग्रामीण भागात ग्रामपंचायत कृषी, आरोग्य, महसूल व इतर आन्य सर्व विभागांनी एकत्र येवून लोककल्याणासाठी सेवेसाठी तत्पर असायला हवे, यासाठी आपापल्या पातळीवर प्रयत करूयात, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी आवर्जून सांगितले. यावेळी उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, तहसीलदार उषाकिरण शृंगारे, तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे, तहसीलदार माधव बोथीकर यांच्यासह तिन्ही तालुक्यातील प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पहिलीच बैठक, सूचनांचा झाला भडीमार! प्रदीर्घ वेळेनंतर संपन्न झालेल्या या पहिल्याच आढावा बैठकीत आ.डॉ.गुट्टे यांनी सूचनांचा अक्षरशः भडीमार केला. आपापली कामे प्रामाणिकपणे व पारदर्शकपणे करा. आपण जनतेच्या सेवेसाठी आहोत, याची कायम जाणीव ठेवा. लोकहिताची भूमिका घेऊन लोकाभिमुख प्रशासन चालवा. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखा. अवैध धंदे आणि तत्सम गुन्हे होणार नाहीत, याची विशेष काळजी घ्या, अशा सूचना देत गतिमान प्रशासान चालवा, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी म्हटले.

## क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

**जिंतूर,/प्रतिनिधी-** अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद व माळी समाज यांच्यावतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४ जयंती निमित्त क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले चौक जिंतूर येथे अभिवादन करण्यात आले.



कार्यक्रमाचे उद्घाटक जिंतूरचे ज्येष्ठ पत्रकार राजाभाऊ नगरकर यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून संभाजी ब्रिगेडचे बालाजी शिंदे अंकल उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानदेव काळे यांनी केले.

व सावित्रीबाई यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाला माजी नगरसेवक गंगाधर गोरे, समता परिषदेचे दत्ताभाऊ काळे, शिवसेनेचे शहरप्रमुख अरविंद कटारे, नगरपरिषद चे कर्मचारी चाऊस, सावता परिषदेचे गुलाब नाहतकर, नाभिक समाजाचे हनुमान कंठाळे, शिवाजी बोचरे, आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय राऊत, गणेश काळे, पप्पू काळे, माऊली कटारे, लक्ष्मण काळे, मनोहर काळे, प्रल्हाद राऊत, राजेश कटारे, भारत कंठाळे सर्व फुले प्रेमी आदींनी परिश्रम घेतले. महापुरुषांच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

## भूषण मोरे यांना कै. यशवंत पाथ्ये स्मृती पुरस्कार जाहीर



**परभणी,/प्रतिनिधी-** सन २०२५ चा मराठी वृत्तपत्र लेखक संघ महाराष्ट्र राज्य मुंबईतर्फे दिला जाणारा कै.यशवंत पाथ्ये स्मृती पुरस्कार भूषण मोरे यांना पत्रकारिता क्षेत्रात भरीव आदर्श कार्यासाठी जाहीर करण्यात आला आहे.

मराठी वृत्तपत्र लेखक संघ महाराष्ट्र राज्य मुंबईच्या २४ व्या वर्धापनात दिनानिमित्त पुरस्कार वितरणाचा हा कार्यक्रम ठेवण्यात आलेला आहे.भूषण मोरे हे मागील २४ वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रांमध्ये कार्य करत असून या माध्यमातून ते जनतेची सेवा करतात सध्या ते परभणी जिल्हा मराठी पत्रकार परिषदेचे समन्वयक आहेत.सदरची निवड झाल्याचे पत्र मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे संस्थापक अध्यक्ष एकनाथ बिरवटकर यांनी पाठविले असून पुरस्कार वितरण हे दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी दर्पण दिनी सायंकाळी ४ वा. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय डॉ. सुरेंद्र गावस्कर सभागृह दादर मुंबई येथे होणार आहे.या निवडीने भूषण मोरे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## शेतकऱ्यांनी शाश्वत विकासासाठी शेतीला जोडधंद्याची सांगड घालावी- रश्मी खांडेकर




**पूर्णा,/प्रतिनिधी-** शेतकऱ्यांनी शाश्वत विकासासाठी शेतीला जोडधंद्याची सांगड घालावी, यासाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा ,तसेच आपले कृषी उत्पादन आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचण्यासाठी साखळी निर्माण करावी असे जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर यांनी तालुक्यातील देऊळगाव दुधाटे येथे कृषी विभाग जिल्हा परिषद आणि शेतकरी मेळावा आणि परिसंवाद आयोजित कार्यक्रमात गुरुवारी बोलताना सांगितले.

यावेळी व्यासपीठावर तहसीलदार माधवराव बोथिकर, शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे,संजय ससाणे, कृषी भूषण कांतरावकाका देशमुख , कृषी विकास अधिकारी दीपक सामाले उपस्थित होते

पुढे बोलताना सांगितले की दिवसेंदिवस वातावरणातील होणारे बदल आणि त्याचा पिकांवर होणारा परिणाम यामुळे उत्पादनात होणारी घट टाळण्यासाठी संरक्षित शेती फायदेशीर ठरत असून शासनाच्या शेडनेट व ग्रीन हाऊस योजनांचा वापर करून संरक्षित शेती तंत्रज्ञानाचा उपयोग करावा असे ही रश्मी खांडेकर यांनी सांगितले.

शेतकरी खूप काबाड कष्ट करत आहेत मात्र व्यवस्थित नियोजन करत नाहीत त्याामुळे शेती परवडत नाही असे म्हणतात त्याामुळे शेतीचे योग्य नियोजन केल्यास शेती फायदेशीर ठरते,शेतीला जेवढा जास्त वेळ द्याल तेव्हढे उत्पन्न वाढते,आपल्या फायद्यासाठी नाही तर जमिनीचे कर्बाचे प्रमाण वाढविण्यासाठी सेंद्रिय शेती करावी असे कृषिभूषण कांतरावकाका यांनी सांगितले.

डॉ. निलेश देखमुख यांनी पशू संवर्धन आणि व्यापस्थपन, दीपक सामाले यांनी शासनाच्या विविध योजना, संजय ससाणे यांनी शिक्षण विषयांवर मार्गदर्शन केले.

हवामान अभ्यासक पंजाब डक यांनी शेतकऱ्यांना सोप्या भाषेत हवामान अंदाज विषयी मोलाचे मार्गदर्शन केले

तहसीलदार माधवराव बोथीकर यांनी शासनाच्या अनुदानावर अवलंबून न राहता शेतकरी स्वयंपूर्ण झाला पाहिजे असे मत व्यक्त केले व पूर्णा तालुक्याला दुष्काळी अनुदान तसेच पिक विमा मिळवून देण्यात प्रशासनाचे सहकार्य करण्याचे वचन दिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पंचायत समिती पूर्णा चे कृषी अधिकारी गजानन देशमुख, दहिवडे तसेच विस्तार अधिकारी इखे, तोटावाड यांनी मेहनत घेतली यावेळी जिल्हा परिषद ,पंचायत समिती आणि कृषी विभागाचे अधिकारी,कर्मचारी तसेच परिसरातील मोठ्याप्रमाणात शेतकरी उपस्थित

### सावित्रीबाई फुले यांचे कार्य महिला मुक्ती चळवळीसाठी प्रेरणादायी- सौ.भावनाताई नखाते

**पाथरी,/प्रतिनिधी :** महिलांसाठी शिक्षणाची दारे उघडणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवन चरित्र महिला मुक्ती चळवळीसाठी अत्यांत उपयुक्त आणि प्रेरणादायी असे आहे, शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रियाना सामाजिक सन्मान प्राप्त झाला आहे असे वक्तव्य परभणी जिल्हा महिला राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या जिल्हाध्यक्षा तथा वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिव सौ. भावनाताई नखाते यांनी केले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त दिनांक ३ जानेवारी २०२५ शुक्रवार रोजी शांताबाई नखाते विद्यालय पाथरी येथे सावित्रीबाई फुले जयंती व आदर्श शिक्षक सन्मान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी त्याा अध्यक्षीय स्थानावरून बोलत होत्याा. कार्यक्रमास पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,माळीवाडा येथे कार्यरत असणारे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक पंकज बिरादार यांचा शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सपतीक सत्कार करण्यात आला.

# नर्सी नामदेव तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी

## आ. तान्हाजीराव मुटकुळे यांची माहीती, सप्ताहाची आज सांगता



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जानेवारी**

श्री संत शिरोमणि नामदेव महाराज यांची जन्मभूमी असलेल्या नर्सी नामदेव या तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी सध्या १५ कोटींच्या निधीतून विविध विकास कामे तसेच केंद्रीय परिवलन मंत्री नितीन गडकरी यांनी ७०० मीटरच्या रस्त्यासाठी १० कोटींचा निधी दिला असून तेही काम पूर्णत्वाकडे जात आहे.
येत्या काळात नर्सी नामदेव तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी येणार असून दि १२ जानेवारीला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नर्सी नामदेव तीर्थक्षेत्राला भेट देणार असल्याची माहीती भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिली.
संत नामदेव यांची जन्मभूमी असलेल्या नर्सी नामदेव येथे मागील सात दिवसांपासून रामकथा, ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. दि ३ जानेवारी रोजी सप्ताहाची सांगता झाली. यावेळी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आ. मुटकुळे, जिल्हाधिकारी गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी किर्तनाचा लाभ घेतला. त्यानंतर नर्सी नामदेव येथील विकास कामांची पाहणी केली. यावेळी बोलतांना आ. मुटकुळे म्हणाले की, नर्सी नामदेव येथे आषाढी एकादशी, परतवारीला ७ ते ८ लाख लोक दर्शनासाठी येतात. मागील सात वर्षापासून तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी पाठपुरावा केल्यानंतर १५ कोटी रूपयांच्या निधीतून सभागृह, वाहनतळ, सोळा खोल्या, नदीघाटांची कामे प्रगतीपथावर आहेत. १० कोटींच्या निधीतून रस्त्याचे काम पूर्णत्वाकडे आहे. आमचे सरकार या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी पूर्णपणे मदत करणार आहे.
यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी देखील विकास कामांची पाहणी केली तसेच यंत्रणांना विकास कामे दर्जेदार आणि मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच विकास कामांच्या दुसऱ्या टप्प्यातील आराखडा शासनाला सादर करण्याचे आश्वासन दिले. त्यामध्ये दर्शनबारी, मंदिर परिसरात भाविकांसाठी सुविधा, डायनिंग हॉल, स्वच्छतागृहे तसेच इतर विकास कामांचा समावेश असलेला आराखडा मंजूरीसाठी व निधीसाठी शासनाकडे सादर केला जाणार तसेच जिल्हा नियोजन समितीमधून या ठिकाणी निधी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.
यावेळी मंदिर समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# बालविवाह निर्मूलनासाठी ग्रामस्तरावर चळवळ उभी करावी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जानेवारी**

बालविवाहाला आळा घालण्यासाठी सर्व विभागाच्या माध्यमातून बालविवाह निर्मुलन चळवळ उभी करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी आयोजित आढावा बैठकीत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.
येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आज जिल्हा बाल संरक्षण कक्षाचा त्रैमासिक कामकाज आढावा, प्रायोजकत्व व प्रतिपालकत्व मंजुरी समिती, बालविवाह निर्मूलन, बाल कल्याण समिती, जिल्हा कृती दल बैठक (कोव्हिड-१९), मादक द्रव्यांचे सेवन प्रतिबंधक समिती, चाईल्ड हेल्पलाईन व वन स्टॉप सेंटर इत्यादी बाबींची काम काज आढावा बैठक जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.
यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) गणेश वाघ, जिल्हा समाज कल्याण अधिकारी आर. एच. एडके, जिल्हा कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त राजपाल कोल्हे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रशांत डिग्रसकर, नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी आशिष पंत, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक अधिकारी विलास जगताप, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर. आर. मगर, पोलीस अधीक्षक यांचे प्रतिनिधी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पचायत यांचे प्रतिनिधी व्ही. एस. भोजे, समाज कल्याण विभागाचे आ. ना. वागतकर, जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनिधी डॉ. प्रकाश जाधव, जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रतिनिधी डॉ.बालाजी भाकरे, शिक्षण विस्तार अधिकारी डी. जी. कऱ्हाळे, पोलीस निरीक्षक दिलीप मोरे, बाल न्याय मंडळ सदस्य सत्यशिला तांगडे, आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाचे के. पी. शिंदे, एनएसएसचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सचिन हाटकर, युनिसेफ डइउ३ चे टिम हेड नंदु जाधव, प्रकल्प समन्वयक मोनाली धुर्वे, जिल्हा संरक्षण अधिकारी माया सुर्यवंशी, विधी सल्लागार विद्या नागशेट्टीवार, परिवीक्षा अधिकारी सुनिल वाठोरे, बाल कल्याण समिती अध्यक्ष सुधाकर इंगोले, बाल कल्याण समिती सदस्य परसराम हेंबाडे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सरस्वती कोरडे, बाल संरक्षण अधिकारी (संस्थात्मक) गणेश मोरे, बाल संरक्षण अधिकारी (संस्थाबाह्य) जरीबखान पठाण, सामाजिक कार्यकर्ता रामप्रसाद मुडे, रेशमा पठाण, समुपदेशक सचिन पठाडे, क्षेत्रीय कार्यकर्ता अनिरुध्द घनसावंत, सखी वन स्टॉप सेंटरचे केंद्र समन्वयक शीला रणवीर, समुपदेशक दिनेश पाटील, चाईल्ड लाईन केंद्र समन्वयक संदीप कोल्हे, सुरज इंगळे, तथागत इंगळे आदी उपस्थित होते.

# करिअर कोचींगच्या शिक्षकांवर अद्यापही कार्यवाही नाही पाच दिवसांपासून न्यायासाठी कुटुंबाचे आमरण उपोषण सुरूच



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जानेवारी**

शहरातील करिअर पॉईंट कोचींग क्लासमधील शिक्षकांच्या त्रासाला कंटाळून बारावीत शिकत असलेल्या विद्यार्थ्याने रेल्वेखाली उडी मारूण आत्महत्या केली. याप्रकरणी दि १५ नोव्हेंबर रोजी शहर पोलिस ठाण्यात संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला परंतु अद्यापही कोणतीही कार्यवाही न झाल्याने पाचव्या दिवशीही कुटुंबाचे आमरण उपोषण सुरूच आहे. सध्या पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप हे हिंगोली जिल्हा दौऱ्यावर आहेत. याप्रकरणात ते काय कार्यवाही करतात याकडे कुटुंबियांचे लक्ष लागले आहे.
करिअर पॉईंट कोचींग क्लासेसमध्ये शिकवणीसाठी असलेल्या किरण शिवाजी लोंढे या विद्यार्थ्याला या क्लासमधील शिक्षक अनिल वानखेडे, सतीश थोरात, ज्ञानेश्वर गिरी यांचे काही मुलींसोबत अनैतिक संबंध असल्याची माहीती होती. त्यामुळे संबंधित शिक्षक त्याचा शारीरिक व मानसिक छळ करीत त्याला धमक्या देत होते. या त्रासाला कंटाळून त्याने दि १३ नोव्हेंबर रोजी रेल्वेखाली उडी मारून आत्महत्या केली. त्यावेळी त्याच्या खिशात आढळलेल्या चिठ्ठीत त्याने सर्व नमुद केले होते. दि १५ नोव्हेंबर रोजी शहर पोलिसात गुन्हा ही दाखल झाला परंतु अद्याप कोचींग क्लासेसमधील शिक्षकांवर कोणतीही कार्यवाही झाली नाही. याविरोधात हे आमरण उपोषण मागील पाच दिवसांपासून सुरू आहे.



**हिंगोली– तालुक्यातील नर्सी नामदेव येथे श्री संत शिरोमणि नामदेव महाराज मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनानिमित्त रामकथा ज्ञानयज्ञ ज्ञानेश्वरी पारायण, किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. आज काल्याचे किर्तनाने या सप्ताहाची सांगता करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने पंचक्रोशीतील भाविकांनी किर्तनाचा आणि महाप्रसादाचा लाभ घेतला. छाया– विजय गुंडेकर**

# वीजेवर धावणाऱ्या पहिल्या जम्मूताबी रेल्वेचे हिंगोलीत जल्लोषात स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जानेवारी**

येथील रेल्वे स्थानकात शुक्रवारी नांदेड ते जम्मूताबी ही वीजेवर चालणारी पहिली रेल्वे धावल्यामुळे सामाजिक कार्यकर्ते आणि प्रवासी संघटनेच्यावतीने रेल्वेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.
दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात विद्युतीकरणाचे काम शंभर टक्के पूर्ण झाले आहे. यानिमित्त दि १२ जून २०२४ मुंबई-हिंगोली-मुंबई दैनिक शताब्दी एक्सप्रेस विद्यूत इंजीनाद्वारे चालविण्यात येत आहे. पूर्णा-हिंगोली-पूर्णा मार्गावर विद्युत इंजिनद्वारे मालगाड्या सुध्दा धावत आहेत. शुक्रवार दि ३ जानेवारी दुपारी १.४० वाजता नांदेड ते जम्मुताबी सुपरफास्ट एक्सप्रेसचे थाटात आगमन झाले. यावेळी नागरिक व प्रवाशांनी वीजेवर चालणाऱ्या या पहिल्या रेल्वेगाडीचे चालक विजयकुमार सिंग, बादल चव्हाण, विठ्ठल धाडवे यांचा पुष्पहार घालून सत्कार केला. यावेळी स्टेशन मास्टर राजकुमार, ज्ञानबा जमदाडे, गणेश साहू, लीलाधर नंदाने, रवी थोरात, नरेश खराटे, सुनील साहू, राजकुमार कऱ्हाळे, सुनील बोचरे, त्रिवेणी इंगळे, चंद्रकांत लोखंडे, सलमा शेख, दामोदर इंगळे, दिपक गवई यांच्यासह प्रवासी तसेच नागरिक उपस्थित होते.
हमसफर एक्सप्रेसद्वारे हिंगोली ते जम्मुताबी पर्यंत २००० किमी अंतरासाठी स्लीपरकोचद्वारे ९०० रूपये प्रवासभाडे आकारण्यात येत आहे. या रेल्वेला नियमित करण्याची तसेच वैष्णोदेवी कटरापर्यंत वाढविण्याची मागणी गणेश साहू यांनी केली आहे.

## संक्षिप्त वृत्त

### सांदीपनीमध्ये सावित्रीबाई फुले जयंती



हिंगोली- सांदिपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा (बु), नांदेड येथे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शाळेत विविध कार्यक्रम संपन्न झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर शाळेतील अनेक मुलामुलींनी सावित्रीबाई फुले यांच्या विषयी आपल्या भाषणाच्या माध्यमातून मनोगत व्यक्त केले. यात कु. आरोही पाटील, देवांश मुंडकर, तनिष गवाले, सोजल ढवळे, कु. सांची शिंदे, कु. मनस्वी अन्नमवार, ईरा देवसटवार (वर्ग १), कु. आरोही नरवाडे, कु. सिद्दिका जाधव, महाकाल जक्कलवार, कु. रिया शिंदे (वर्ग २) यांनी सहभाग घेतला. तसेच शिक्षकवर्गातून सौ. प्रीती स्वामी, सौ. आयोध्या गाढे, अरविंद काळेवार यांनी आपले मनोगत प्रभावीपणे मांडले. या कार्यक्रमाला शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा राठोड, सौ. माहेश्वरी राठोड, शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेखाले, व शाळेतील सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन खंडेराव जोगदंड यांनी केले तसेच अरविंद काळेवार यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### आदर्शमध्ये सावित्रीबाई फुले जयंती, ग्रंथ वाचन

हिंगोली- येथील आदर्श महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जंयती साजरी करण्यात आली. या दिवसाचे औचित्य साधून ग्रंथ प्रदर्शन चे आयोजन करण्यात आले. १ ते १५ जानेवारी २०२५ पंधरवाडा वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यानिमित्ताने आदर्श महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या जंयतीचे औचित्य साधुन ग्रंथ प्रदर्शनचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्र. प्राचार्य डॉ. संजीवकुमार नरवाडे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ग्रंथ प्रदर्शन चे उदघाटन केले. विविध ग्रंथ, चरित्र, पर्यटनवरील पुस्तके यांचे ग्रंथ प्रदर्शन या मध्ये विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकाचे अवलोकन केले. यावेळी प्राध्यापकवर्गाने परिश्रम घेतले.

# नांदुरा येथील महिलांचा पाणीपूरवठा विभागांवर घागर मोर्चा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जानेवारी**

तालुक्यातील नांदुरा येथे जलजीवन मिशन योजनेअंतर्गत होत असलेल्या गैरकारभारामुळे येथील गावकऱ्यांना पाणीपूरवठा होत नसल्याने शुक्रवारी गावांतील महिलांना जिल्हा परिषद कार्यालय गाठून ग्रामीण पाणीपुरवठा विभागावर घागर मोर्चा काढीत अधिकाऱ्यांना जाब विचारला.
नांदुरा येथे जलजीवन मिशन योजनेअंतर्गत काम सुरू आहे. जलजीवन मिशन सिंचन विहीरीची रजिस्ट्री गट नं ५१ ची करण्यात आली मात्र शेतकरी व कंत्राटदार यांनी संगनमत करून गट नं ५२ मध्ये सदर सिंचन विहीरीचे खोदकाम केले. गट नं ५२ मधील विहीरीमध्ये शेतकरी मालक हे मोटार टाकून पाणी शेतीला देत आहेत. त्यामुळे विहीरीत पाणीसाठा शिल्लक राहत नसल्याने गावाला पाणी चार दिवसापासून गावाला पाणीपुरवठा बंद आहे. विशेष म्हणजे शेतकरी व कंत्राटदार यांनी ग्रामपंचायत नांदुरादेवी या नावाने खरेदीखत करण्याऐवजी कडती ग्रामपंचायत नावाने खरेदी खत केले आहे. या प्रकरणाची तत्काळ दखल घेत सखोल चौकशी करून गावाला जलजीवन मिशनयोजनेतून पाणीपूरवठा करावा अशी मागणी केली आहे. यावेळी गावकऱ्यांसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# पालिकेच्या जिल्हास्तरीय क्रिडा व सांस्कृतीक स्पर्धा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ जानेवारी**

हिंगोली नगर पालिकेच्यावतीने शुक्रवारपासून जिल्हास्तरीय क्रिडा व सांस्कृतीक स्पर्धा सुरू झाल्या असून स्पर्धांचे उद्धाटन मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांचेहस्ते करण्यात आले.
यावेळी उपमुख्याधिकारी साबळे, अधीक्षक शाम माळवटकर, अभियंता प्रदीप नाईक, बाळू बांगर, देविसिंग ठाकूर, संदीप घुगे यांची प्रमुख उपस्थिती होती. हिंगोली नगर पालिकेच्यावतीने स्वच्छता अभियानासह विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. कर्मचाऱ्यांना ताणतणावतून मुक्त करण्यासाठी नगर पालिकेच्यावतीने क्रिकेट स्पर्धा, कॅरम स्पर्धा, रांगोळी स्पर्धासह इतर स्पर्धांचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते. यावेळी नगर पालिकेचे कर्मचारी तसेच महिलांनी रांगोळी स्पर्धेत सहभाग नोंदविला.

# वसमत येथील शासकीय महिला रूग्णालयाला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव द्या



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३ जानेवारी**

वसमत येथील महिला रूग्णालयाला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते आनंद खरे यांच्यासह नागरिकांनी केली आहे.
क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंनी आपल संपूर्ण आयुष्य हे महिलांना सुशिक्षित करण्यासाठी अर्पण केले स्त्रियांवरील अन्याय अत्याचारा विरोधात कार्य केले स्त्री भ्रूण हत्या विरोधात आवाज उठवला. बाल हत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. सुरक्षितपणे बाळंतपण व्हावीत यासाठी उपाय योजीले अशा महान क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले त्यांची आज १९४ वी जयंतीनिमित्त देशात सर्वत्र त्यांचा सन्मान होत आहे. त्यानिमित्त वसमत येथील शासकीय महीला रुग्णालय आहे या रुग्णालयाला विद्येची देवता क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देऊन गौरविण्यात यावे. जेणेकरून या रुग्णालयात जन्मलेल्या प्रत्येक बाळाला आदर्श घेता येईल. सदरची मागणी मागील चार वर्षांपासून करत असून याबाबत सरकार व प्रशासन गांभीर्याने घेत नसल्याचे दिसून येत आहे. शासकीय महीला रुग्णालयाला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देऊन सन्मान करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते आनंद खरे यांच्या वतीने करण्यात आली. यावेळी ॲड केतन सारंग, बालाजी मस्के, प्रल्हादराव जोंधळे, नंदकुमार निरपाशे, काशिनाथ भोपे यांच्यासह इतर पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# प्रत्येक अपघात टाळला जाऊ शकतो : अभिजीत राऊत

## राज्य रस्ता सुरक्षा अभियानास नांदेड जिल्हयात सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड़,दि. ०३ जानेवारी**

निष्णात फलंदाज सचिन तेंडुलकर फिरकी गोलंदाजीवरही हेल्मेट घालून का खेळतो ?याचे उत्तर ज्याला कळले त्याला रस्तासुरक्षेचे मर्म कळले. त्यामुळे रस्त्यावर अतिआत्मविश्वास न दाखवणे, नियमांचे काटेकोर पालन करणे, हेल्मेट लावणे, सीट बेल्ट लावणे, मोबाईल न वापरणे,फुटपाथवर पायी चालताना कायम रस्त्याच्या उजव्या बाजूला वाहनांकडे तोंड करून चालणे, महत्त्वाचे ठरते. असे केल्यास प्रत्येक अपघात टाळल्या जाऊ शकतो, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी आज केले.

१ जानेवारी ते ३१ जानेवारी पर्यंत परिवहन विभागामार्फत राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२५ राबविण्यात येणार असून, त्याकरिता 'पर्वा ' अर्थात इंग्रजी मधील केअर ही थीम घोषीत करण्यात आली आहे. सदर अभियानाचे उद्घाटन ०३ जानेवारी रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड येथे अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रथम दिपप्रज्वलन व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन सुरवात करण्यात आली. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून.अबिनाश कुमार, पोलीस अधिक्षक, नांदेड, डॉ. महेश कुमार डोईफोडे, आयुक्त, नांदेड-वाघाळा मनपा, श्रीमती दलजितकौर जज, सचिव नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, .बि. सी.पांढरे, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड इतर शासकीय विभागाचे कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात संदिप निमसे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी (अ.का), नांदेड यांनी रस्ता सुरक्षा अभियाना मागचा उद्देश व विभागाची भूमिका मांडली. विभागातर्फे राबविण्यात येणा-या अंमलबजावणी (एपर्षीाीाशपीं) मुळे व भविष्यातील तंत्रज्ञानाने अपघात कमी करण्याबाबत तसेच सदर अभियान अंतर्गत पूर्ण महिनाभर परिवहन विभाग विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी यांनी उपिस्थतांना वाढते अपघात कमी करण्यासाठी वाहतुकीच्या नियमांचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करण्याबाबत मार्गदर्शन केले.



तसेच पायी चालणाऱ्यांनी कायम रस्त्याच्या उजव्या बाजूने चालावे अर्थात फूटपात वरून वाहनाकडे तोंड करून पायी चालण्याची पद्धत अवलंबावी (थरश्रज़्‌ प ठळसहीं ) या बाबीचे पालन करण्याबाबत मार्गदर्शन केले. ओव्हर कॉन्फीडन्स मध्ये वाहन चालविणे, मोबाईल टॉकीग, तसेच छोटया छोटया चुकामुळे अपघात होत असल्यामुळे त्या चुका होऊ न दिल्यास अपघात थांबतील. वाहनांना, सायकली, बैलगाडींना रिफलेक्टर लावण्यानंतरच वाहने चालविण्याबाबत सुचना दिल्या. तसेच सहा साखर कारखान्यांमध्ये वाहतूक करताना वाहतूकदारांनी रिफ्लेक्टर लावूनच उसाची वाहतूक करण्याचे आवाहन केले. या वर्षाच्या 'पर्वा ' संकल्पनेची थिम असल्याबाबत सांगितले.

रस्ता सुरक्षा समिती सर्व यंत्रणा सदर अभियान जिल्हाभर राबवून अपघात मुक्त नांदेड करण्याचे संकल्पना मांडण्यात आली.श्रीमती दलजितकौर जज, यांनी रस्ता सुरक्षा करिता वाहतुक नियमांचे पालन करणे व दूचाकी चालविताना हेल्मेटचे वापर करण्याबाबतचे मत व्यक्त केले.

सदर कार्यक्रमाच्या प्रसंगी.पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते आपल्या प्रिय व्यक्तीकरिता झरीुरह - लरीश (संदेश फलकाचे) रस्ता सुरक्षा कार्यक्रमाच्या वेळी उदघाटन करण्यात आले.उपस्थितांना वाहतूक चिन्हे, रस्ता सुरक्षा चिन्हे याबाबत अधिकारी यांनी प्रत्यक्ष व भिंती पत्रकाद्वारे रांगोळी द्वारे मार्गदर्शन केले तसेच प्रथमोपचार व अपघातांनंतर घ्यावयाची काळजी बाबत डॉ. कुलकर्णी, डॉ. गुटे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीमती रेणुका राठोड यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्रीमती अनुराधा पतकी यांनी केले. या प्रसंगी प्रादेशिक परिवहन कार्यालय, नांदेड येथे कार्यरत अधिकारी व कर्मचारी, तसेच सुमारे २०० एनसीसी कैडेट, वाहन वितरक प्रतिनिधी फरांदे, श्री. कोठारी, जाधव, . राठी, मोटार वाहन चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष . हुंदल, तसेच ऑटोरिक्षा संघटनेचे अध्यक्ष . नरेंद्र गायकवाड, अहेमद बाबा, स्कुलबस संघटनाचे अध्यक्ष निखिल लातूरकर, . मनाळकर मोटार ड्रायव्हींग स्कूलचे संचालक . जयवंत पवळे, .धुळे, मस्के व जनसमुदाय उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी . समीर शेख, प्रशांत कंकरेज, मोटार वाहन निरिक्षक . अनुश्री केंद्रे, किशोर भोसले, . राघवेंद्र पाटील, गणेश तपकिरे कार्यालयातील सर्व सहा. मोटार वाहन निरिक्षक, कर्मचारी गजानन शिंदे व इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**कोरोना आजारापेक्षा अपघातात मृत्यूमुखी**

श्रीमती दलजितकौर जज यांनी देशातील अपघातात मृत्यु पडलेल्या व्यक्तीची संख्या पाहिली असता ती संख्या ही मागिल काही कालावधीमध्ये कोरोना या महाभयंकर बिमारीपेक्षाही अधिक असल्यामुळे रस्त्यावर वाहन चालवितांना सर्वांनी वाहतूक नियमाचे पालन करुन वाहने चालविण्याबाबत सुचना दिल्या.

**नांदेडमध्ये वर्षभरात ३९४ अपघाती मृत्यू**

जोपर्यंत एखादी घटना आपल्या घरात घडत नाही तोपर्यंत त्याचे गांभीर्य कळत नाही. नांदेड मध्ये गेल्या वर्षभरात झालेल्या अपघाती मृत्यूची संख्या ३९४ आहे. आणखी एक ज्यांचा काही दोष नाही अशा पायी चालणाऱ्या ६४ जणांना वाहनांनी चिरडले आहे. ३६५ दिवसात ३९४ अधिक ६४ एकूण ४५८ लोकांचा जीव बेदर्कारपणे चालणाऱ्या वाहनांनी एकट्या नांदेड जिल्ह्यात घेतला आहे.

# मोफत फिरता दवाखाना शेतकऱ्यांसाठी आरोग्यपर्वणी : आ.भीमराव केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०३ जानेवारी**

महाराष्ट्र शासनाचे कृषी विभाग व राशी सीड्स कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने किनवट माहूर तालुक्यात सुरू करण्यात आलेला फिरता दवाखाना ग्रामीण भागातील शेतकरी व सर्वसामान्य गोरगरीब नागरिकांसाठी आरोग्यपर्वणी ठरणार असून या दवाखान्याच्या माध्यमातून रात्रंदिवस कष्ट करणारा व जगाचा पोशिंदा समजल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे असे मत आमदार भीमराव केराम यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासन कृषी विभाग व राशी सीड्स प्रा लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत फिरता दवाखाना मोबाईल मेडिकल युनिट सुरू करण्यात आला असून किनवट येथील हुतात्मा गोंडराजे



मैदानात दि.३ जानेवारी रोजी आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते नारळ फोडून व हिरवी झेंडी दाखवून या दवाखान्याचे थाटात उद्घाटन करण्यात आले. भाजप नेते अशोक नेम्मानीवार,माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार,दत्ता आडे, अनिरुद्ध केंद्रे तालुका कृषी अधिकारी बालाजी मुंडे,राशी सीड्स कंपनीचे रमेश शिरसाठ, डॉ. प्रशांत बदने कु शिवांजली बंडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. फिरत्या दवाखान्याच्या माध्यमातून गावोगावी जाऊन प्राधान्याने शेतकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी केली जाणार आहे त्याचबरोबर गावातील सर्वसामान्य नागरिकांनाही या दवाखान्याचा मोफत लाभ मिळणार आहे.

या कार्यक्रमास कृषी सेवा केंद्र चालक विनोद वट्टमवार,किशन राकोंडे,सुशील जन्नवार,केदार वट्टमवार, सुशांत जन्नवार यांच्यासह शेतकरी व नागरिक उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीला पळवून नेले; एका विरूध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर,दि. ०३ जानेवारी**

शहरातील आबादी बसस्थानक परिसरातून एका व्यक्तीने लोखंडी साहित्य बनविणाऱ्या महिलेच्या अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याची घटना शनिवार (दि.२८ डिसेंबर ) रोजी घडली. सदर प्रकरणी अल्पवयीन मुलीस पळवून नेणाऱ्या तरुणाविरुध्द अर्धापूर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार अर्धापूर येथील अबादी बसस्थानक परिसरातील एक महीला लोखंडाचे तवे, कु-हाडी, विळे, झारे बनवुन विकुण पोट भरते. पाच मुली व एक मुलगा असुन पती मयत झाल्याने आईवडीलांकडे मुलाबाळासह अर्धापूर येथील अबादी बसस्थानक परिसरात राहताते. फिर्यादी महिलेच्या वडिलांनी अखील कुरेशीला दुकाणसाठी एक रुम भाड्याने दिली होती. तेंव्हापासुन तो घरी आधुनमधुन येत होता. तो दोन तिन वेळा १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला बोलत असतांना निदर्शनास आला होता. फिर्यादी महिलेची पंधरा वर्षीय मुलगी ही २८ डिसेंबर शनीवार सकाळ पासून घरी दिसत नव्हती मुलीचा परिसरात नातेवाईक यांच्याकडे शोध घेतला असता ती मिळून आली नाही. अखिल कुरेशी ही कुठेही आढळून येत नाही. त्यानेच मुलीला फुस लावून पळून नेले.

या प्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीच्या आईने अर्धापूर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अखील कुरेशी राहणार अर्धापुर याच्या विरूध्द फुस लावून पळवून नेल्याच्या संशयावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली कांबळे हे करीत आहेत.

# भावी आशांची झाली निराशा !

## प्रतिक्षा यादीतील उमेदवार मारताहेत आरोग्य केंद्रासह मनपाचे खेटे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०३ जानेवारी**

नांदेड शहर वाघाळा महानगरपालिकेने जवळपास वर्षभरापूर्वी आशा स्वयंयसेविका भरती प्रक्रीया राबविली होती. या प्रक्रीयेत प्रतिक्षा यादीत असलेल्या उमेदवारांना रूजू होण्यासंदर्भात संबंधीत अधिकाऱ्यांचे फोन आले. परंतू अचानकपणे आचारसंहीता लागू झाल्याने ही प्रक्रीया थांबत गेली. त्यामुळे प्रतिक्षा यादीतील भावी आशा स्वयंसेविका संबंधीत शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र व मनपाला खेटे मारत असल्याचे दिसून येत आहे.

नांदेडवाघाळाशहरमहानगरपालिकेअंतर्गत असलेल्या शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आशा स्वंयसेविका पदासाठी जवळपास वर्षभरापूर्वी भरती प्रक्रीया राबविण्यात आली. या भरती प्रक्रीयेदरम्यान शैक्षणिक अर्हता व तोंडी परिक्षेच्या माध्यमातून आशा स्वंयसंविका निवडल्या गेल्या. यानंतर मार्च महिन्यात काही आरोग्य केंद्रात प्रतिक्षा यादीतील आशा स्वंयसेविकांचा निवड करण्यात आली. त्याच पद्धतीने कौठा येथील वैद्यकीय अधिकारी यांनीही प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना फोन करून त्यांनी उमेदवारांशी तयारी करून काम करण्याची हमी घेतली तसेच लवकरच नियुक्ती आदेश देण्यात येणार असलयाचे सांगितले.

परंतू दरम्यानच्या काळात लोकसभेची, विधानसभेची आचारसंहीता लागू झाल्याने मनपातील अधिकारी निवडणूक कामात व्यस्त झाले. त्यामुळे ही प्रक्रीया रखडल्याने प्रतिक्षा यादीतील आशांना पून्हा प्रतिक्षाच करावी लागत आहे. तर आज ना उद्या आपले काम होईल या आपेक्षेने भावी आशा स्वंयसेविका प्राथमिक आरोग्य केंद्र कौठा, जंगमवाडी येथील आरोग्य केंद्र तसेच मनपाचे खेटे मारत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मनपा आयूक्तांनी त्यांची ही प्रतिक्षा संपवावी अशी मागणी होत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### मुदखेडमध्ये सावीत्रीबाई फुले जयंती उत्साहात

**मुदखेड**-बहुजन समाज पार्टी मुदखेड शहरच्या वतीने मुदखेड येथील महात्मा ज्योतीबा फुले चौक या ठिकाणी माता सावित्रीबाई ज्योतीराव फुले यांची १९४ वी जयंती साजरी करण्यात आली. सर्व प्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांच्या फलकास पुष्पहार अर्पण करण्यात आले यानंतर सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेची पुष्पपूजा व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी त्यांच्या जिवनावर दोन शब्द व्यक्त करण्यात आले. ३ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील एका छोट्या गावात जन्मलेल्या सावित्रीबाई फुले सामाजिक कार्यकर्त्या, कवयित्री आणि शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात. स्त्री मुक्ती चळवळीत त्या सक्रिय सहभागी होत्या आणि नंतर त्या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका झाल्या बहुजनांच्या स्त्रिया शिकाव्यात म्हणुन सावित्री आई फुले यांनी स्वतःच्या अंगावर दगड शेण झेलले. म्हणुनच आजच्या महिला शिक्षित बनल्या आहेत कोणी एसपी, तर कोणी कलेक्टर, न्यायाधीश, व इतर मोठ मोठ्या पदावर कार्यरत आहेत. महिला म्हणजे फक्त चुल व मुल या पर्यंतच सिमीत होत्या त्यांना आज शिक्षणाचा जो अधिकार मिळाला तो सावित्रीबाई फुले यांच्या चळवळी मुळे आज महिला ड्झ व कलेक्टर तसेच न्यायाधीश झाल्या त्या सर्वांच्या वतीने माता सवित्रीआई यांना कोटी कोटी नमन असे ॲड कमलेश चौंदते यांनी त्यांच्या जयंती दिनानिमित्त विचार मांडले. यावेळी बसपाचे जेष्ठ नेते सुभाष चौदंते, माजी नगर सेवक ड कमलेश चौदंते, ड अमोल भुरे, विशाल कापसे, इड्झ शहर अध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, राजु चौदंते, दिगांबर कदम, किशोर वाघमारे, सारीपुत्र भक्ते,र सामाजीक कार्यकर्ता रमेश बोडके, किशोर मांडे, यासह आदींची उपस्थिती होती.

### क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना माहूरकरांची आदरांजली



**माहूर**-महिला मुक्ती दिन व बालिका दिनाच्या औचित्याने सावित्रीच्या लेकींना हार्दिक शुभेच्छा देत स्त्री-शिक्षणाच्या अग्रणी, आद्यशिक्षिका, थोर समाजसेविका, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४व्या जयंतीनिमीत्य आज शुक्रवार दिनांक ०३ जानेवारी रोजी विविध सामाजिक संघटनेच्या वतीने शहरातील क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले चौक येथील नामफलकावरील सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करत आदरांजली वाहण्यात आली.यावेळी स्त्री शिक्षणाच्या उद्धारक, क्रांतिज्योती सावित्री बाई फुले यांना समता परिषद जिल्हा अध्यक्ष सुनील बेहेरे, अ. भा. माळी महासंघ प्रदेश उपाध्यक्ष सुरेश गिऱ्हे, भाजप नेते अनिल वाघमारे, अ. भा. माळी महासंघ नांदेड जिल्हाध्यक्ष सचिन बेहेरे, विजय आमले, निरधारी जाधव,पद्मा गिऱ्हे, अर्चना दराडे, रवी बेहेरे, किसन राठोड, पंजाब शिंदे, संजय बनसोडे ,आनंद तुपदाळे, जयंत गिऱ्हे,राजू दराडे, ज्ञानेश्वर चौधरी, समाधान कांबळे, दीलेरसिंग चुंगडे, हिरामण वाघमारे, अनुदीप कोरटकर, विनोद पडलवार आदींची उपस्थिती होती.

# अतिवृष्टीच्या अनुदानासाठी शेतकऱ्यांनी तातडीने कागदपत्रे जमा करावीत : किशोर यादव

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ०३ जानेवारी**

खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये गतवर्षी सप्टेंबर महिन्यात माहूर तालुक्यात अतिवृष्टी सदृश्य पाऊस पडल्याने शेतातील उभी पिके जमीनदोस्त होऊन शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते. झालेली नुकसानभरपाई म्हणून शासनाकडून शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करण्यात आली होती.सदरील अनुदान रक्कम जमा झाली असून, पात्र शेतकऱ्यांनी अनुदान मिळण्यासाठी संबंधित गाव सज्जाचे तलाठी, पोलीस पाटील, कोतवाल यांच्याकडे आधार कार्ड व बँक पासबुकची झेरॉक्स आपल्या मोबाईल नंबरसह जमा करण्याचे आवाहन माहूरचे तहसीलदार किशोर यादव यांनी केले आहे.



माहूर तालुक्यातील ८४ महसुली गावांपैकी ३४ गावातील शेतकऱ्यांची आधार कार्ड, मोबाईल नंबर व पासबुक अपलोड करण्याचे काम पूर्ण झाली असून, ५० गावातील शेतकऱ्यांनी अद्याप आपली कागदपत्रे जमा केली नसल्याने शेतकऱ्यांसाठी आलेली अतिवृष्टी अनुदानाची रक्कम वाटपाअभावी तशीच पडून आहे. सप्टेंबर २०२४ च्या अतिवृष्टी अनुदानासाठी तालुक्यातील २६ हजार १७२ शेतकऱ्यांसाठी अनुदान म्हणून ३५ कोटी ११ लक्ष ६० हजार २०८ रुपये माहूर तहसील कार्यालयाकडे जमा झाले असून, यापैकी ५ हजार ९४४ शेतकऱ्यांची परिपूर्ण नोंद घेण्यात आली आहे. तर, २० हजार २८८ शेतकऱ्यांची माहिती जमा होणे अद्यापही बाकी आहे.

अनुदान वाटपाच्या मुदतीला जास्त वेळ नसल्याने तहसीलदार किशोर यादव यांनी दिनांक ३ जानेवारी रोजी तहसील कार्यालयात आढावा बैठक बोलावून तलाठी, कोतवाल व पोलीस पाटील यांचेसह सर्व कर्मचाऱ्यांना सक्त ताकीद देऊन येत्या तीन दिवसात सर्व शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याचे आदेश दिले आहे. या बैठकीत नायब तहसीलदार डॉ. राजकुमार राठोड.नायब तहसीलदार कैलास जेठे सह सह स म अ एस. व्ही. कुलदीपके यांचे सर्व तलाठी, पोलीस पाटील व कोतवाल उपस्थित होते.यावेळी शेतकऱ्यांनी तात्काळ कागदपत्रे जमा करून शासकीय अनुदानाचा लाभ घ्यावा!असे आवाहन तहसीलदार किशोर यादव यांनी केले आहे.

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद,दि. ०३ जानेवारी**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले याची १९४ वी जयंती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली . या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून छ.शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य एम.एम. जाधव तर प्रमुख वक्ते भूगोल विभाग प्रमुख डॉ. एम.एम. सय्यद होते.

डॉ.सय्यद यांनी आपल्या भाषणात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्याविषयी सविस्तर माहिती दिली तर प्रमुख अतिथी महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक संतोष पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक वाटचालीत महात्मा फुले यांचे असलेले योगदान याविषयी माहिती दिली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.आर.बी.बाविस्कर यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार प्रा. डॉ.आर.बी.मादळे यांनी मानले सदरील कार्यक्रमासाठी माजी प्राचार्य आर.एम.बिडवे,प्रा.संदीप गवते तसेच डॉ.बी. पी.खराबे, श्री. चंद्रकांत पाटील, प्रा.बस्वराज कपाळे, प्रा.जे.पी. काळे प्रा.ए.व्ही.शिंदे ग्रंथपाल प्रा.विलास पवार, डॉ.भींगोले ई.व्ही.,बालाजी सादगिरे व पिंटू शिंदे व तसेच महाविद्यालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रामीण पोलीसांनी केली गुन्हेगारांची तपासणी



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०३ जानेवारी**

शस्त्र बाळगणाऱ्या तसेच संशयितरित्या फिरणाऱ्या पाच जणांना ग्रामीण पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून दोन खंजर जप्त केले आहेत. हि कारवाई दि.३ जानेवारी रोजी करण्यात आली. जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या फ्लश आऊट ऑपरेशन अंतर्गत ग्रामीण पोलिसांनी उपविभागीय पोलीस अधिकारी सुशिलकुमार नायक व पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण हद्दीत सकाळी चार ते सात या वेळेत रेकॉर्डवर असलेल्या आरोपींच्या तपासणीसाठी विशेष मोहिम राबवली. या मोहिमेत दोन आरोपीकडे खंजर मिळून आले. तर तीन आरोपी हे वेगवेगळ्या भागात संशयितरित्या चोरी करण्याच्या उद्देशाने दबा धरुन बसलेले मिळून आले. या कारवाईत पोलिसांनी संतोष किशन कंधारे रा.नईआबादी विष्णूपुरी, संघर्ष सुनिल पवळे, सतीश बालाजी चव्हाण, ओमनाथ बालाजी चव्हाण तिघे रा.बळीरामपूर व संघरत्न माधव वाघमारे रा.शाहुनगर वाघाळा या पाच जणांना अटक केली आहे.

हि मोहिम पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे, विश्वदिप रोडे, पोहेकॉ. जाधव, वाकडे, सत्तार, माने, पचलिंग, कलंदर, कल्याणकर, शिरमलवार यांच्या पथकाने राबवली.

# सावित्रीबाई फुले जयंती 'उत्सव' म्हणून साजरी करा : रा न.काहाळेकर

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर ,दि. ०३ जानेवारी**



शहरातील सावित्रीबाई फुले प्राथमिक व माध्यमिक विद्यालय येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आल.क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती ३ जानेवारी रोजी उत्साहात साजरी करावी, असे आवाहन लोकहीत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रा न काहाळेकर यांनी केले आहे. सावित्रीबाई फुले यांनी शैक्षणिक, सामाजिक, काव्यलेखन आदी क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे. शिक्षणाची मुहूर्तमोढ त्यांनीच रोवली. जयंती दिनी त्यांचे स्मरण करताना जयंती 'उत्सव' म्हणून साजरा करावा. या दिवशी महिलांनी आडवी चिरी (सावित्रीबाई लावत तसे आडवे कुंकू) कपाळावर लावावे, घरावर गुढ्या उभाराव्यात, घराला तोरण बांधावे, सावित्रीबाईच्या काव्यरचना वाचाव्यात, महात्मा फुले यांच्या साहित्याचे वाचन करावे, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करावे, घरासमोर रांगोळी काढावी, महात्मा फुले - सावित्रीबाई फुले यांचे विचार आचरणात आणण्याची शपथ घ्यावी, असे आवाहन लोकहीत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रा. न काहाळेकर यांनी केले आहे.

यावेळी शाळेतील चिमुकल्यानी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकत जोरदार भाषण केल्या.त्याच बरोबर शाळेतील काही विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषा परिधान करून उपस्थित होते. यावेळी देगलूर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक मारोती मुंढे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास लोकहीत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रा.न.काहाळेकर,पोलीस निरीक्षक मारोती मुंढे, गटशिक्षणाधिकारी कृष्णा तोटावार, शिक्षण विस्तार अधिकारी शिवकुमार झंम्पलवाड, मुख्याध्यापक यशवंत गजभारे, संस्थेचे सदस्य तथा सहशिक्षक देवानंद कंधारकर,प्रा.विभागाचे मुख्याध्यापक किशन पाटील, बिट जमादार रियाना शेख , गुळवे मॅडम, पोलीस कर्मचारी विष्णू चामलवाड तसेच शाळेतील शिक्षक -शिक्षिका व शिक्षकोत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक किशन पाटील तसेच सूत्रसंचालन विनोद भुताळे यांनी केले तर समारोप देवानंद कंधारकर यांनी केले.

# पंढरीनाथ बोकारे यांना बाळशास्त्री जांभेकर दर्पणकार पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०३ जानेवारी**

मागील ३७ वर्षा पासून पत्रकारिता क्षेत्रात अग्रेसर असलेले नांदेड येथील ज्येष्ठ पत्रकार श्री पंढरीनाथ बोकारे यांना २०२४ चा 'बाळशास्त्री जांभेकर दर्पणकार' पुरस्कार जाहीर झाला असून पत्रकार दिनाच्या पूर्वसंध्येला ता.५ जानेवारी रोजी नासिक येथे प्रदान होणार आहे.



सक्षम टाइम्स मिडिया फाउंडेशन व सक्षम पोलीस टाइम्स वृत्तपत्र यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक येथे दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीमित्त मराठी पत्रकार दिवस साजरा होत असून पत्रकार दिनाचे औचित्य साधुन रविवार दि. ५ जाने. २०२५ रोजी नासिक येथे या पुरस्कारांचे वितरण केले जाणार आहे. सक्षम टाइम्स मिडिया फाउंडेशन चे अध्यक्ष विलास पाटील यांनी हि माहिती दिली आहे. श्री बोकारे हे पत्रकारितेतील अनुभवाच्या बाबतीत नांदेड मध्ये एक अग्रगण्य नाव आहे. श्री बोकारे यांनी नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत जनसंपर्क अधिकारी म्हणून १७ वर्ष सेवा बजावली आहे. श्री बोकारे याना पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील योगदाना बद्दल जवळपास ४० विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. बाळशास्त्री जांभेकर दर्पणकार' पुरस्कार जाहीर झाल्या बद्दल बोकारे यांना लंगर साहिब गुरुद्वारा चे प्रमुख संत बाबा नरेंद्रसिंघ जी,संत बाबा बलविंदर सिंघ जी आणि नांदेड चे खासदार प्रा रवींद्र चव्हाण, खासदार डॉ अजित गोपछडे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत

जिल्हा कार्यालय - पहिला माळा, जनता मार्केट, शिवाजीनगर, नांदेड.
Mail : tbnanded@gmail.com, Mob. No.: 9850952439

# आ.अर्जुनराव खोतकर यांनी घेतला जालना मतदार संघातील सा.बा. विभागाच्या कामाचा आढावा

## तातडीने सर्वेक्षण करून अंदाजपत्रके सादर करण्याच्या सूचना

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना विधानसभा मतदारसंघातील रस्ते व इतर विकासाचे कामे तातडीने हाती घेण्यासाठी मतदारसंघातील रस्त्याचे व इतर कामाचे सर्वेक्षण करून शासनाच्या विविध योजनेमधून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी शासनाकडे परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत अशा स्वरूपाच्या सूचना शिवसेना उपनेते तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना केल्या. आज दिनांक ३ जानेवारी २०२४ रोजी आमदार खोतकर यांनी त्यांच्या निवासस्थानी सार्वजनिक बांधकाम विभागाची आढावा बैठक घेतली या बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता श्रीनिवास कातकडे ,अधीक्षक अभियंता एस. एस. भगत ,उपाभियंता सूर्यवंशी, बांधकाम अभियंता चंद्रशेखर नागरे यांच्यासह जिल्हा परिषद माजी अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर ,संजय खोतकर,महानगर प्रमुख विष्णू पाचफुले, राहुल हिवराळे, यांची उपस्थिती होती.



बैठकीमध्ये आमदार खोतकर यांनी सांगितले की जालना मतदारसंघातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचे रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झालेली आहे गेल्या पाच वर्षात या रस्त्याची साधी दुरुस्ती करण्यात आलेली नाही यामध्ये प्रामुख्याने पोखरी-नाव्हा - बाजीउबरद -शेवली रस्ता ,भाटेपुरी -रामनगर -मानेगाव- मोतीगव्हाण रस्ता , वडगाव -सोमनाथ साळेगाव -वानडगाव रस्ता, गोलापांगरी बठाण- हिस्वन- माली पिंपळगाव कार्ला या प्रमुख रस्त्याचीत्याचीरुंदीकरण व सुधारणा ची कामे हाती घेण्यासाठी सीआरएफ मधुन प्रस्ताव तयार करावा व जालना -दरेगाव, जालना- सिरसवाडी रस्त्याचे तसेच मतदार संघातील प्रमुख जिल्हा मार्ग ,इतर जिल्हा मार्ग ,ग्रामीण रस्ते यांच्या देखील संरक्षण शासनाच्या नाबार्ड अर्थसंकल्प एस आर सारख्या विविध योजनांमधून मंजूर करून घेण्यासाठीप्रस्ताव तयार करून शासनाकडे सादर करावेत. तसेच जालना शहर महानगरपालिका देखील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचे परंतु महान-गरपालिकेला हस्तांतरित न झालेले रस्त्याची देखील तातडीने प्रस्ताव सादर करावेत यामध्ये प्रामुख्याने जिजामाता प्रवेशद्वार ते नावा चौफुली रिंग रोड पर्यंत रस्त्याचा चौपदरीकरणाचा प्रस्ताव तयार करण्यात यावा. तसेच जालना जिल्ह्यासाठी मंजूर असलेले शासकीय मनोरुग्णालयाचे काम तातडीने सुरू करण्याच्या सूचना देखील या बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांना करण्यात आल्या. तसेच जालना शहरांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने सुरू असलेल्या शासकीय कार्यालयाच्या नवीन इमारत बांधकामे अत्यंत संत गतीने सुरू आहेत ते तातडीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करण्यात आल्या.यामध्ये प्रामुख्याने अन्न औषधी प्रशासन इमारत बांधकाम ,उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय बांधकाम, कृषी विभागाची इमारत बांधकाम, वजन मापे बिल्डिंग बांधकाम ,दुय्यम निबंधक (रजिस्ट्री कार्यालय) बांधकाम इत्यादीचा समावेश आहे. त्याचप्रमाणे जालना शहरातील विविध पोलीस कॉर्टर व शासकीय कर्मचाऱ्यांचे निव-ासस्थानाची त्या विभागातील रस्ते नाल्यांची अवस्था अत्यंत दैनीय झालेली आहे ती तातडीने दुरुस्त होणे गरजेचे आहे या दृष्टीने पावले उचलावीत व त्वरित सर्वेक्षण करून अंदाजपत्रके मंजूरीसाठी शासनाकडे सादर करावीत. आपण या संदर्भात मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री यांची भेट घेऊन ही कामे मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्न करणार आहोत असेआ. अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले.

## संक्षिप्त

### श्री समर्थ विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बालिका दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

परतूर तालुक्यातील पाटोदा माव येथील श्री समर्थ माध्यमिक विद्यालयात क्रांती ज्योती सावित्री बाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हूणन साजरी करण्यात आली कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून शाळेतील शिक्षिक श्री पाराजी रोकडे तर प्रमुख पाहुणे म्हणून यू. व्ही. खवल यांची उपस्थिती होती. शाळेतर्फे सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. उपस्थितांच्या हस्ते प्रतिमापूजन झाल्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी ओव्या,गीत व मनोगत व्यक्त केले.तसेच बहुतांश विद्यार्थी-विद्यार्थिनी सावित्रीबाई व ज्योतिबा फुले यांच्या वेशभूषेत आलेले होते. विशेष म्हणजे कार्यक्रमात बहुसंख्य मनोगत ओव्या मुलींनी सादर केल्या आभार प्रदर्शन व संचलन सी. एन. खवल यांनी केले.कार्यक्रम यशवी करण्यासाठी व्ही. बी. सातपुते, भास्कर कुलकर्णी, ध. दे.जोशी पांडुरंग डवरे, शंकर खरात गणेश वखरे यांनी परिश्रम घेतले.

### चाचा नेहरु बाल महोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महिला व बाल विकास विभागामार्फत बालगृहातील बालकांसाठी दरवर्षी तीन दिवसीय चाचा नेहरु बाल महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत दि.६ ते ८ जानेवारी २०२५ या कालावधीत चाचा नेहरु बाल महोत्सवाचे जालना येथील जिल्हा पोलीस मैदानावर आयोजन करण्यात आले आहे. या बाल महोत्सवाचे उद्घाटन दि.६ जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते होणार आहे. या बाल महोत्सवात विविध क्रीडा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कोमल कोरे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. क्रांतीज्योती सावित्रीबाई यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष आण्णासाहेब चित्तेकर, महिला उपाध्यक्ष संगिता नागरगोजे, शहराध्यक्षा रिंकल तायड,युवती जिल्हाध्यक्षा शितल बारोटे, शहराध्यक्ष अंजली ढवळे,संगिता झाडीवाले, राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष रोहित अग्रवाल, कार्याध्यक्ष वैभव नालेगांवकर, जिल्हा युवक कार्याध्यक्ष किशोर सवडे, तालुकाध्यक्ष संतोष ढेंगळे, दिव्यांग सेल जिल्हाध्यक्ष सतिश फतपुरे,अनिल वानखेडे, शंकर मुळे युनाफ शेख यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# आ.बबनराव लोणीकर यांचा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांसह कंत्राटदाराला दणका

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

१७६ गाव वॉटर ग्रीड व ९५ गाव वॉटर ग्रीड मधील बरेचसे काम न करता कंत्राटदार व अधिकाऱ्यांनी संगणमताने आर्थिक व्यवहार करत पूर्ण बिल उचलले आहे त्या विरोधात आमदार बबनराव लोणीकर यांनी वारंवार घेण्यात आलेल्या बैठका व सातत्याने करण्यात आलेला पाठपुरावा या दणक्यामुळेच आज महाराष्ट्र जीवन प्राधिकरण च्या अधिकाऱ्यांसह कंत्राटदाराला वठणीवर आणले असून पुढील २ महिन्यात उर्वरित काम पूर्ण करून देण्याची हमी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे सदस्य सचिव यांनी घेतली असल्याची माहिती आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात दिली आहे.

माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या उपस्थितीत सदस्य सचिव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या दालनात आज बैठक संपन्न झाली या बैठकीदरम्यान आमदार बबनराव लोणीकर यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे अधिकारी व कंत्राटदार यांना धारेवर धरत परतुर विधानसभा मतदार संघातील १७६ गाव व ९५ गाव वॉटर ग्रीड योजनांचे काम न करता बिल उचललेच कसे असावा सदस्य सचिवांच्या समोर उपस्थित



केला. ७ डिसेंबर २०२३ रोजी १७६ गाव वॉटर ग्रीड चे बिल देण्यात आले त्या तारखेपर्यंत ५२ गावात पाणी पोहोचलेले नव्हते तर २७ डिसेंबर २०२३ रोजी ९५ गाव वॉटर ग्रीड मधील एकाही गावांमध्ये थेंब भर पाणी पोहोचलेले नसताना पूर्ण बिल देण्यात आले असल्याची तक्रार आमदार बबनराव लोणीकर यांनी सदस्य सचिव यांच्याकडे केली होती त्या तक्रारीनुसार आज सदस्य सचिवांच्या दालनात कंत्राटदार, अधिकारी यांच्यासह आमदार बबनराव लोणीकर यांच्या उप-स्थितीत बैठक पार पडली.

शासनाला खोटी माहिती देऊन या दोन्ही योजनेचे संपूर्ण बिल उचलण्यात आले असल्याची तक्रार आमदार लोणीकर यांनी दिली होती त्या संदर्भात तहसील कार्यालय मंठा तहसील कार्यालय परतुर मुख्य अभियंता कार्यालय छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी बैठका घेण्यात आल्या. २०२४ मध्ये मुंबईत संपन्न झालेल्या पावसाळी विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान लक्षवेधी तारांकित प्रश्न, अर्धा तास चर्चा यासह विविध आयुधांचा वापर करून हा प्रश्न शासन दरबारी मांडला होता.

परंतु अधिकारी व कंत्राटदारच्या काम न करण्याच्या मानसिकतेमुळे आमदार लोणीकरांनी सदस्य सचिवांकडे या सदर्भात बैठक आयोजित करून काम पूर्ण करून देण्याची मागणी केली होती. आमदार बबनराव लोणीकर यांनी सातत्याने केलेला पाठपुरावा व वारंवार घेतलेल्या बैठका यामुळे संबंधित कंत्राटदाराने तात्काळ काम पूर्ण करून देण्यात यावे असे आदेश सदस्य सचिवांनी दिले. १७ जेसीबी मशीन, ७ टीमसह ५० लोकांची टीम युद्ध पातळीवर काम पूर्ण करणार असून लवकरात लवकर या दोन्ही ग्रीड चे काम पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या वतीने बैठकीदरम्यान ग्वाही देण्यात आली आहे. या बैठकीला महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे सदस्य सचिव कृष्णा, मराठवाडा विभागाच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे, सदस्य सचिव कार्यालयाचे अधीक्षक अभियंता श्री अजयसिंग यांची उपस्थिती होती.

# पोषण आहाराच्या बारा मेनू ने वाढले शिक्षकांचे टेन्शन

**तभा वृत्तसेवा**
**माहोरा प्रतिनिधी**

देशभरातील मुलांना पोषक आणि दर्जेदार भोजन मिळावे यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घेतला असून प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेच्या अंतर्गत आठवडाभर विद्यार्थ्यांना पहिली फक्त खिचडी दिली जात होती.आता त्यात बदल करून विविध पाककृतींचा समावेश दररोजच्या आहारात केला आहे.हा निर्णय विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून चांगला असला तरी शिक्षकांच्या डोक्याला ताप दायकच आहे कारण विद्यार्थ्यांना दर दिवशी दिल्या जाणाऱ्या बारा मेनूंचा हिशोब कसा ठेवायचा?असा प्रश्न शिक्षकांना सतावत असून त्या पोषणाचे लेखी काम व दररोज शिजवलेल्या मेनू ऑनलाईन मध्येच विद्यार्थ्यांना शिकवण्याऐवजी बराच वेळ खर्च होत असल्याचे शिक्षक देवमन खुळे यांनी सांगितले.

केंद्रातील सर्व शाळांनी दररोजच्या मेनू नुसारच आहार वाटप करावा अशा सूचना मुख्याध्यापकांना दिल्या असून दररोजच्या खर्चाची बिले ही शिक्षण संचालक स्तरावरून दिली जाणार असल्याचे

केंद्रप्रमुख डी.के.सोनुने सांगितले तर विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पदार्थांचा रोजच्या आहारातला समावेश हा चांगला असला तरी शिक्षकांसाठी रेकॉर्ड ठेवायला मात्र किचकट असून बरेच पदार्थ हे बाजारातून मुख्याध्यापक किंवा शाळा व्यवस्थापन समितीने स्वतः खर्च करून आणावयाचे व नंतर त्याची बिले सादर करायची असल्याने ही बाब खर्चिक व एक प्रकारची डोकेदुखीच आहे असे शिक्षक संदीप पोटे यांनी सांगितले. दरमयान आठवड्यातील पाककृती ही दररोजच्या आहारामध्ये भाज्यांचा पुलाव, मसालेभात, मटर पुलाव ,मूग डाळ खिचडी ,चना पुलाव ,सोयाबीन पुलाव, मसूर पुलाव,गोड खिचडी, मटकी उसळ, तांदुळाची खीर ,नाचणी सत्व ,मोड आलेले कडधान्य ,अंडा पुलाव या पदार्थाचा समावेश आहे.

# अक्षरज्योती प्राथमिक विद्यालय व अक्षरज्योती इंग्लिश स्कूल येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**



शहरातील अक्षरज्योती प्राथमिक विद्यालय व अक्षरज्योती इंग्लिश स्कूल भोकरदन येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मा. जिल्हा परिषद सदस्या आशाताई पांडे, शोभाताई मतकर, मा. नगराध्यक्षा आशाताई माळी, बडगे सर, केंद्रप्रमुख .आर.एच. सोनावणे सर,केंद्रीय कन्याशाळा गवळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.मनीषा जोशी (दाणी) रेणुकामाता सेवाभावी संस्थेचे सचिव रवींद्र दाणी शाळेचे पर्यवेक्षक .राहुल परदेशी सहशिक्षक .सराफ , हिरेकर ,पालकवर्ग यांची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शहरातून जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आली होते. रॅलीस मान्यवऱ्यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून रॅलीस शाळेपासून सुरुवात झाली. शाळा, महात्मा फुले चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक,संत नरहरी चौक,सराफा मार्केट,पोस्ट ऑफिस,कन्या शाळा असा रॅलीचा मार्ग होता रॅलीतील लेझिम पथकाने सर्वांचे लक्ष्य वेधून घेतले.शाळेतील विद्यार्थी,मान्यवर यांनी सावित्रीबाई फुले यांच्याविषयीं आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.खिल्लारे मॅडम आणी सौ.पानसारिया मॅडम यांनी केले तर श्री. रवींद्र दाणी यांनी कार्यक्रमास उपस्थित राहिल्याबद्दल पालक,मान्यवर या सर्वांचे आभार व्यक्त केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत आयोजित रॅलीची जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांच्या हस्ते सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



जिल्ह्यात १ ते ३१ जानेवारी या काल-ावधीत 'रस्ता सुरक्षा अभियान' राबविण्यात येणार आहे. नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षा विषयक जनजागृती व्हावी यासाठी आयोजित करण्यात आलेल्या रॅलीला जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि पोलीस अधिक्षक अजयकुमार बंसल यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात केली.

यावेळी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन कृष्णा चिंतल यांच्यासह प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी, मोटार वाहन निरीक्षक, सहायक मोटार वाहन निरीक्षक आणि कर्मचारी यांची उपस्थिती होती. १ ते ३१ जानेवारी या कालावधीत रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत जिल्ह्यात उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलीस, शिक्षण आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहकार्याने विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यात प्रामुख्याने रस्ता सुरक्षाविषयक बॅनरद्वारे जनजागृती करणे, शाळा, महाविद्यालयात रस्ता सुरक्षाविषयक व्याख्यान आयोजित करणे, रस्त्यावरील बैलगाडी, ट्रॅक्टर आणि ट्रॉली वाहनांना परावर्तिका (रिफलेक्टर) लावणे, वाहन चालकांची आरोग्य तपासणी करणे, मोटार ड्रायव्हींग स्कूल कार्यशाळा आयोजित करणे तसेच जिल्ह्यातील रस्ते अपघातास कारणीभूत बाबींची तपासणी करणे आदी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे.

# शेतकरी, कष्टकरी यांना सुख समृद्धी लाभू दे; महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला भरभराटी मिळू दे -राहुलभैय्या लोणीकर

## भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी घेतले श्री विठ्ठलाचे सपत्नीक दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भगवान पांडुरंग परमात्मा हा सर्वसामान्य गोरगरीब लोकांचा तारणहार असणारा देव असून लाखोच्या संख्येने वारकरी भाविक विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरला येत असतात. पंढरपूर येथे आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात सहकुटुंब मनोभावे दर्शन घेतले. विठ्ठलाची प्रसन्न मूर्ती पाहिली की आपल्या अंतर्मनात असलेले सर्व विचार जागीच थांबतात, आणि फक्त त्यांच रूप आपल्या अस्तित्वावर ठसा उमटवतं हे प्रत्येकवेळी जाणवतं असेही श्री राहुल लोणीकर यांनी श्री विठ्ठलाच्या



दर्शनानंतर सांगितले.

भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सचिव श्री राहुल लोणीकर यांनी त्यांच्या सुविद्य पत्नी सौ दिव्या लोणीकर चिरंजीव हर्षवर्धन लोणीकर कन्या पंकजा लोणीकर, श्लोक पाटील व श्री सागर बर्दापूरकर, सपना बर्दापूरकर आणि त्यांच्या कन्या स्वरा आराध्या आणि चिरंजीव समर्थ यांनी सहकुटुंब पंढरपूर येथे पांडुरंगाचे दर्शन घेतले यावेळी मंदिर समितीच्या वतीने राहुल लोणीकर यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र हे कृषिप्रधान राज्य असून महाराष्ट्रातील शेतकरी कष्टकरी गोरगरिबांना समृद्धी लाभावी यासाठी श्री विठ्ठलाकडे आपण प्रार्थना केली असल्याचे यावेळी राहुल लोणीकर यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राची तर माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वात परतुर विधानसभा मतदारसंघाची भरभराट होवो. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला भरभराटी मिळो त्यासोबतच परतूर विधानसभा मतदारसंघाचा देखील सर्वांगीण विकास करण्यासाठी आवश्यक ताकत आणि कौशल्य आम्हाला मिळो यासाठी भगवान श्री विठ्ठलाकडे मनोभावे प्रार्थना केली असल्याचे देखील यावेळी श्री राहुल लोणीकर म्हणाले.

यावेळी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती ट्रस्ट समवेत पंढरपूर नगर परिषदेचे नगरसेवक श्री ज्ञानराज सर्वगोड, युवा नेते प्रतीक कुंभारे, विनोद धुमाळ, आदम बागवान, सुभाष काटे, संजय कबाडे, दुर्गेश आराध्य, विक्रम गायकवाड, तुकाराम चव्हाण यांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



# ९४ लाखांच्या मुद्देमालासह प्रतिबंधित गुटखा जप्त

## वाळूज एमआयडीसी पोलिसांची धडाकेबाज कारवाई

वाळूज महानगर, (प्रतिनिधी)- शासनाचा बंदी असलेल्या गुटख्यांचा ट्रक साजापूरकडे येत असल्याची माहिती पोलिस उपायुक्त नितीन बगाटे यांना खबऱ्यांकडून प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे वाळूज एमआयडीसी पोलिसांनी रात्री ११.३० ते पहाटे २ वाजेपर्यंत सापळा रचून ९४ लाखांच्या मुद्देमालांसह प्रतिबंधीत गुटखा जप्त करत तिघांच्या मुसक्या आवळल्या.

याविषयी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, पोलिस उपायुक्त नितीन बगाटे यांना गुप्त बातमीदारांकडून माहिती मिळाली की, धुळे-सोलापूर महामार्गावरुन काचबार-साजापूर मार्गावर गुटख्याने भरलेला ट्रक येत असल्याची माहिती मिळाली होती. या खात्रीलायक माहिती आधारे उपायुक्त बगाटे यांनी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्याचे दबंग पोलिस निरीक्षक कृष्णा शिंदे यांना प्राप्त होताच पोलिस निरीक्षक शिंदे यांनी या मार्गावर सहाय्यक पोलिस निरीक्षक मनोज शिंदे, पोलिस उपनिरीक्षक प्रविण पाथरकर, दिनेश बन या सहकाऱ्यांसह रात्री ११.३० ते पहाटे २ वाजेपर्यंत सापळा रचला होता. रात्री ११.३० वाजेच्या सुमारास साजापूर-काचबार मार्गावर संशयीत ट्रक क्रमांक एमएच १३ डी.क्यू. ८१२४ ला अडवून पाहणी केली असता, त्यामध्ये बाजीराव पान मसाला ६० लाख ६६० रु., मस्तानी पान मसाला १२ लाख १३२ २. १२ लाख रुपये किमतीचा ट्रक व कार, १५ हजार रुपयांचे तीन मोबाईल असा एकूण ९४ लाख



१५ हजार ७९२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करत मोहम्मद सादीक (४६) रा. नागपूर गेट अमरावती, ताहेर खान रईद खान (३७) रा. बडनेरा, अमरावती, अनिस रफीक शेख (३७) रा. किराडपुरा, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मुसक्या आवळल्या या धडाकेबाज कारवाईमुळे गुटखामाफियांचे धाबे दणाणले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त, प्रविण पवार, पोलीस उपआयुक्त, नितीन बगाटे, सहा. पोलीस आयुक्त, छावणी विभाग महेंद्र देशमुख एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक कृष्णचंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मनोज शिंदे, पोउपनि प्रविण पाथरकर, पोउपनि दिनेश बन, पोह. सुरेश कचे, पोह. जालीधर रंधे, पो. अं.विशाल पाटील, पो. अं. नितीन इनामे पो. अं. समाधान पाटील, पो. अं. योगेश शेळके, पो.अं. किशोर साबळे, पो. अं. शिवनारायण नागरे, पो. अं. बबलु थोरात यांनी पार पाडली.

## केंद्र पुरस्कृत नवभारत साक्षरता कार्यक्रम उत्साहात संपन्न



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३ जानेवारी

केंद्रपुरस्कृत नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत दि.३१ डिसेंबर २०२४ ला तालुकास्तरीय उल्लास मेळाव्याचे आयोजन गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे करण्यात आले होते.उल्लास मेळाव्यात एकूण आठ केंद्रांनी सहभाग घेतला.आठही केंद्राने दिलेल्या थीम नुसार अतिशय उत्कृष्टपणे असाक्षर व्यक्तीमध्ये पायाभूत साक्षरता म्हणजे वाचन, लेखन, संख्याज्ञान, महत्वपूर्ण जीवन कौशल्य विकसित करण्यासाठी विविध माध्यमाच्या आधारे अध्यापन करण्याकरीता लागणारे शैक्षणीक साहित्य तयार करून साहित्याची मांडणी करून आपले स्टॉल मांडले.

भजनी मंडळ ने विशेष लक्ष वेधून घेतले.मेळाव्यास प्रमुख उपस्थिती गटविकास अधिकारी पंचायत समिति सोयगाव यांची होती. त्याप्रसंगी तात्यासाहेब माळी सहाय्यक गटविकास अधिकारी सोयगाव, गटशिक्षणाधिकारी सोयगाव ह होते तसेच केंद्रप्रमुख फिरोज तडवी, अण्णा पोळ,जनार्दन साबळे, केंद्रीय मुख्याध्यापक मोतीराम जोहरे,प्रकाश माने,नाना मोरे,किरण पाटील,परमेश्वर कठोरे,सुनील बावचे,जगन्नाथ काकडे पंचायत समिती सोयगाव हे उपस्थित होते. मेळाव्यातील प्रत्येक स्टॉल उपस्थितांचे लक्ष वेधून घेणारे होते.अतिशय उत्स्फूर्त पणे सुंदर प्रकारे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

मेळाव्याच्या यशस्वीते करिता नवभारत साक्षरता कार्यक्रम तालुका समन्वयक फिरोज तडवी केंद्र प्रमुख सोयगाव,बिलाल बागवान,रामचद्र महाकाल सर्व सा.व्यक्ती वि तज्ञ,केंद्रप्रमुख सर्व शिक्षकवृंद, स्वयंसेवक मुख्याध्यापक यांनी मेहनत घेतली.

# वाळूज महानगरात खासगी सावकारांचा सुळसुळाट

**तक्रार द्याः खासगी सावकारी मोडून काढतो**

**आतापर्यंत कोणीही अशा स्वरुपाची तक्रार आलेली नाही. परंतु जर कोणी तक्रार देत असेल तर त्याचे नाव गुप्त ठेवत खासगी सावकारी करणाऱ्यांना ठेचून काढल्याशिवाय राहणार नाही. परिसरातील हिस्ट्रीसीटर भाईंचा डाटा जमा करण्याचे काम सुरू आहे. लवकरच मोठी कारवाई करणार**

**कृष्णकांत शिंदे, पोलिस निरीक्षक, एमआयडीसी वाळूज पोलिस ठाणे**

वाळूज महानगर, (प्रतिनिधी)- पोलिस आयुक्त प्रविण पवार यांनी आयुक्तालयाच्या हद्दीतून अवैध धंदे बंद करण्यासाठी कंबर कसली आहे, काही भागात अवैध धंदे काही अंशी कमीही झालेले आहेत, परंतु अवैध धंदे बंद होताच खासगी सावकारांचा मात्र सुळसुळाट सुरू असून, सामान्य जनतेकडून दिलेल्या रकमेच्या चारपट रक्कम वसूल करीत दहशत निर्माण करीत आहेत, याकडे मात्र पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने सर्वसामान्य नागरिक भरडला जात आहे.

वाळूज महानगर हा औद्योगिक परिसर असल्याने याठिकाणी १० टक्के कामगार व कष्टकरी वास्तव्यास आहेत. बरेचसे कामगार कारखान्यांच्या वेतनावर अवलंबून असल्याने त्यांना नेहमी आर्थिक तंगीला सामोरे जावे लागते. नेमके असे कामगार शोधून काढण्यासाठी परिसरातील खासगी सावकारांनी खबरे नेमलेले आहेत. हे खबरे अशा गरजू नागरिकांना, कामगारांना हेरून १५ ते ३० रुपये टक्के दराने पैसे देतात. गरज असल्याने नागरिकही घेतात इमाने इतबारे परतही करतात. मात्र एकदा या खासगी सावकारांच्या जाळ्यात व्यक्ती फसला म्हणजे त्याची सुटका सहजा सहजी होत नाही, दिलेल्या रकमेच्या तीन पट रक्कम वसूल करूनही गुंडगिरी, दादागिरी तसेच हिस्ट्रीसीटर हे सावकार 'पोलिस माझ्या खिशात आहे असे दम देत पोलिस ठाण्याच्या आवारातच धमकावतात. विशेष म्हणजे काही पोलिस कर्मचारीही अशा खासगी सावकारांना बळ देत त्यांची पाठराखण करतात.

कवडीचे काम नाही तरीही चारचाकी तून प्रवास

वाळूज महानगर परिसरात गेल्या काही वर्षापूर्वी दैनावस्थेत असलेले काही मोकाट छपरी तरुण या धंद्यांमध्ये उतरुन चालेच गब्बर झाले होत स्वतःला 'भाई' संबोधून घेत आहेत. आजच्या घडीता कोणतेही काम न करता चोवीस तास चारचाकी वाहनातून फिरत असल्याचे आढळून येत आहेत. त्यामुळे दिवस-रात्र कष्ट करूनही दुचाकींचे हप्ते न भरता येणारे कामगार या छपरी तरुणांकडे पाहून आपणही नशीब आजमावेत का? अशा विवंचनेत आहेत.


# दारू हद्दपार करण्यासाठी साजापूर ग्रामपंचायतचा ठराव



वाळूज महानगर, ( प्रतिनिधी) : साजापूर येथे गेल्या काही दिवसांपासून अवैध दारू विक्रीमुळे वादविवाद, भांडण-तंटे वाढले असून महिलावर्गही मोठ्या प्रमाणात त्रस्त झाला आहे. गावात हातावर पोट असलेल्या कामगारवर्गाची मोठी संख्या असून अनेकांना दारूचे व्यसन जडल्याने अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहेत. गावातून दारू हद्दपार करण्यासाठी पुढाकार घेतला असून त्या दृष्टीने साजापूर ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत ठराव मंजूर करण्यात आला.

ज्या भागात अवैध दारू विक्री केली जाते तेथून काही अंतरावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा, मशीद, लक्ष्मीमातेचे मंदिर तसेच जिल्हा परिषद शाळा आहे. यामुळे शाळेतील मुलांच्या शिक्षणावरही याचा परिणाम होत आहे. गावातील अवैध दारू विक्री बंद करण्यासाठी साजापूर येथे सरपंच जनार्दन बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा घेण्यात आली. ग्रामसभेत अवैध दारू बंद करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली. तसेच गावात अवैध दारू विकणाऱ्या आठ लोकांची व हिस्ट्रीसीटर नऊ गुन्हेगारांच्या नावांची यादी तयार करून ती एमआयडीसी वाळूज पोलिसांना देण्यात आली. ग्रामसभेला माजी जिल्हा परिषद सदस्य सय्यद कलीम, उपसरपंच शेख कैसर, जाफर पटेल, शेख अय्युब, सलीम पठाण, हाशम पटेल, किरण गंगावणे, शेख हबीब, अब्दुल रज्जाक, शेख नबीब, सय्यद सिकंदर, सचिन जाधव, शेख फेरोज आदींसह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## संतोष विनायकराव भाले यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर - PSI संतोष विनायकराव भाले रा. सदुरू हौसिंग सोसायटी एन ८, सिडको, यांचे दिनांक ३ जानेवारी २२०५ रोजी सकाळी ५ वाजता वयाच्या ५७ व्या वर्षी आजारपणामुळे राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुली आहेत. त्यांच्या पार्थिवावर दिनांक ३ जानेवारी २०२५ रोजी एन ६ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# मद्यधुंद तरुणांची वाहतूक शाखेच्या पोलिसांना मारहाण; गुन्हा दाखल

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) वाहतूक कोंडी सोडविण्याचे काम करीत असताना, दोन मद्यधुद तरुणांनी वाहतूक शाखेच्या पोलिस कर्मचाऱ्यास रस्त्यावर तोळवून हाता-बुक्क्यांनी मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी देत पोलिसांचा गणवेश फाडला. याप्रकरणी वाहतूक पोलिसांच्या फिर्यादीवरून विविध कलमान्वये गुन्हे दाखल करत दोघांना ताब्यात घेतले आहे.

याविषयी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, वाहतूक शाखेचे अशोक थोरात व पंडित कांदे हे एनआरबी चौकात कर्तव्य बजावत होते. दि. ०२ रोजी सायंकाळी ६.१० वाजेच्या सुमारास हॉटेल कार्तिक जवळ वाहतूक ठप्प झाती होती. त्यामुळे वाहतूक शाखेचे कर्मचारी अशोक थोरात हे त्यांच्या मोटारसायकल क्रमांक एमएच २० इ. क्यू. २५८८ ने वाहतूक ठप्प झाल्याच्या ठिकाणी हजर होत ठप्प झातेती वाहतूक सुरळीत करत असताना मोटारसायकत क्रमांक एमएच २० एफएच ९४२२ वर आलेल्या अंकुश रामदास आहेर, रा. शिवना, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर ह. मु. आयोध्यानगर, वडगाव को. व नामदेव लक्ष्मण खंबाट, रा. म्हसता टाकळी, ता.ता. सित्तोड, जि. छत्रपती संभाजीनगर ह.मु. गिरीराज हौसिंग सोसायटी पढरपूर या दोघांनी मद्यधुंद आवस्थेत वाहतूक शाखेचे कर्मचारी थोरात याना उद्देशून, 'ए भाड्या मागे काय होतंय माहित आहे का? असे म्हणत थोरात यांच्या डोक्यावरील हेल्मेट ओढून अश्लील भाषेत शिवीगाळ करत हाता-चापटाने मारहाण करायता सुरुवात केली. एवढ्यावर न थांबता थोरात यांचा गणवेश फाडत त्यांना खाली पाडत लाथा- बुक्क्यांनी मारहाण सुरू केली. यावेळी नागरिकांनी थोरात याना त्या मद्यधुंद तरुणांच्या तावडीतून सोडवते. थोरात यांचे सहकारी पंडित कांदे व वाळूज एमआयडीसी पोतिसाच्या मदतीने त्याना ठाण्यात आणत ताब्यात घेत विविध कलमान्वये गुन्हे दाखत केला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक कृष्णचंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक संजय गिते हे करीत आहेत.

ठाण्यातही धिंगाणा

दोघांना एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात आणल्यानंतर दारुच्या नशेत धुंद असलेल्या या दोघांनी पोलिस ठाण्यातही गोंधळ घालत ठाण्यातील लाईट फोडले, वायर तोडत जोरजोरात गोंधळ घालणे सुरूच ठेवले होते. मात्र पोलिसांनी खाक्या दाखवत त्यांना ताब्यात घेतले.

# खेळणा प्रकल्पाचे आ. अब्दुल सत्तार यांच्या हस्ते जलपूजन

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.३, : खेळणा मध्यम प्रकल्प तसेच केळगाव लघु प्रकल्पातून रब्बी हंगामासाठी आज माजी मंत्री आ. अब्दुल सत्तार यांचाहस्ते आवर्तन सोडण्यात आले. आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते पालोद ( ता. सिल्लोड ) येथील खेळणा मध्यम प्रकल्पात जलपूजन करून कालव्यातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. केळगाव व खेळणातुन आवर्तन सोडण्यात आल्याने रब्बी पिकांना याचा मोठा फायदा होणार आहे.

खेळणा मध्यम प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने यावर्षी ऑगस्ट अखेरच खेळणा मध्यम प्रकल्प ओव्हरफलो झाला होता. आज मितीला खेळणा धरणात ८१.७५ टक्के जलसाठा असून केळगाव धरणात ७६ टक्के जलसाठा आहे. त्याअनुषंगाने सिंचनासाठी आरक्षित पाण्याचा विसर्ग करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश आ. अब्दुल सत्तार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते.

खेळणा मध्यम प्रकल्पातून आवर्तन सोडण्यात आल्याने यामुळे २ हजार ५०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल. त्यासोबतच केळगाव प्रकल्पातून आवर्तन सोडण्यात आल्याने ४४० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येवून रब्बी पिकांना लाभ होणार आहे. शिवाय परिसरातील विहिरींनाही फायदा होणार असल्याने यंदा रब्बी चे क्षेत्र वाढेल असा विश्वास आ. अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केला.



या गावांना होणार फायदा

खेळणा मध्यम प्रकल्पातून आवर्तन सोडण्यात आल्याने तालुक्यातील ,पालोद, मंगरुळ, दहेगाव, अन्वी, डोंगरगाव, तर भोकरदन तालुक्यातील आव्हाणा, सुभानपुर, मालखेडा येथील शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. तसेच केळगाव लघु प्रकल्पातून आवर्तन सोडल्याने अंभई , पिंपळगाव, केळगाव, शेखपूर, जांभई गाव शिवराला याचा फायदा होतो.

शेतकऱ्यांना तीन आवर्तन सोडण्यासाठी उपाययोजना करा - आ. अब्दुल सत्तार

शेतकऱ्यांना किमान तीन वेळा आवर्तन सोडण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करा असे निर्देश आ. अब्दुल सत्तार यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा जेणेकरून धरणातील पाणी साठा वाढेल असे आ. अब्दुल सत्तार म्हणाले.

शेतकरी आत्महत्याग्रस्त हा तालुक्याला लागलेला कलंक असून हा कलंक पुसून टाकण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी शासकीय यंत्रणेने एक टीम म्हणून काम करावे, वन विभाग व डोंगर रांगेतून वाहून जाणारे पाणी आपल्या पाणलोट क्षेत्रात वळविणे, नदीजोड प्रकल्प अंतर्गत जुई नदीतून वाहून जाणारे पाणी खेळणा व इतर धरणाकडे वळवावे, धरण क्षेत्राची सीमा निश्चित करणे, धरणाच्या पाळू वरील झाडे झुडपे काढणे याबाबत आ. अब्दुल सत्तार यांनी अधिकाऱ्यांना निर्देशित केले.

शंभर दिवसाचा प्लॅन करा

खेळणा धरणाची उंची वाढविण्यासाठी शासनाने मान्यता दिली आहे. सदरील काम सुरू करणे तसेच खेळणा सह तालुक्यातील इतर लघु प्रकल्पात जलसाठा वाढविण्यासाठी व येत्या काळात शेतकऱ्यांना तीन वेळा आवर्तन सोडवण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून शासनास तातडीने प्रस्ताव सादर करावा यासाठी निधीची कमतरता भासू देणारा नाही, तसेच सिंचनाचे क्षेत्र वाढावे जेणेकरून शेतकरी १२ माहे बागायतदार होईल यासाठी १०० दिवसाची कामाची रूपरेषा ठरवून प्रभावी अंमलबजावणी करा असे आ. अब्दुल सत्तार म्हणाले.

याप्रसंगी माजी जी. प. अध्यक्ष श्रीराम महाजन, माजी सभापती रामदास पालोदकर, पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अभियंता दिगंबर रायबोले, शाखा अभियंता प्रीतम राठोड, खरेदी विक्री संघाचे चेअरमन रमेश साळवे, पालोदचे सरपंच नासेर पठाण, उपसरपंच मच्छिंद्र पालोदकर, ग्रा. पं. सदस्य रमेश पालोदकर, सुनील लांडगे, विनोद काटकर, निखिल पालोदकर, कॅनॉल निरीक्षक सोमनाथ ताठे, अमोल काकडे, विठ्ठल वाघ आदिंची उपस्थिती होती.



**सोयगाव,दि.३( प्रतिनिधी) : सिल्लोड-सोयगाव मतदार संघाचे आमदार अब्दुल सत्तार साहेब यांना छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा सांस्कृतिक क्रीडा मंडळ येथे वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना सामाजिक कार्यकर्ता श्रावण राठोड,रमेश चव्हाण,सागर राठोड,शाम राठोड आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.**


## गंगापूर तालुक्यातील दिव्यांगांनी रेल्वेत सवलत प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल करावेत : डॉ. सुदाम लगास



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.३ जानेवारी: दिव्यांगांना शासनाच्या विविध योजनेचा लाभ तसेच रेल्वेत सवलत मिळावी, यासाठी लागणारे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. गंगापूर तालुक्यातील दिव्यांग बांधवांसाठी रेल्वेत सवलत मिळावी यासाठी लागणाऱ्या दिव्यांग (प्रकार) प्रमाणपत्र मिळण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय येथे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर सुदाम लगास यांना अर्ज देऊन सदरील कामाची सुरुवात करण्यात आली. यावेळी , प्रहारचे रशीद शहा, संग्राम निकम,प्रहारचे दादासाहेब पाचपुते,रुग्ण कल्याण समिती सदस्य अतुल रासकर उपस्थित होते.

## जगप्रसिद्ध अजिंठा लेणी येथे मुख्य निवडणूक आयुक्त यांची सहपत्नी भेट



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि २ जगप्रसिद्ध अजिंठा लेणीस शुक्रवार दि.३ दुपारी १२ वाजेच्या सुमारास भारताचे निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू यांनी सहपत्नी भेट दिली.यावेळी भारतीय पुरातत्व विभागाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.टुरिस्ट गाईड राहुल निकम यांनी लेणी क्र.१,२,९,१०,१६,१७ व २६ या महत्वाच्या लेण्या मधील शिल्प व कलाकृती विषयी त्यांना सखोल माहिती दिली.लेण्या मधील शिल्प व कलाकृती पाहून ते भारावून गेले.यावेळी तहसीलदार मनीषा मेणे, सपोनि प्रदीप भिवसने,ना.तहसीलदार साळवे,गणेश फुकटे,भारतीय पुरातत्व विभागाचे भारत काकडे,सुरक्षारक्षक प्रमुख समाधान आगे उपस्थित होते.फर्दापूर पोलीस स्टेशनच्या वतीने सपोनि. प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.कॉ.प्रकाश कोळी,भरत कोळी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## एमजीएममध्ये विपश्यना परिचय सत्र संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.३ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठ आणि धम्म अजंता विपश्यना केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आज विद्यापीठाच्या आर्यभट्ट सभागृहात 'विपश्यना परिचय' या विषयावर आधारित सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी, धम्म अजंता विपश्यना केंद्राच्या वतीने एमजीएमच्या सर्व प्राध्यापकांना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी, अधिष्ठाता डॉ. एच. एच. शिंदे, धम्म अजंता विपश्यना केंद्राचे शिक्षक अविनाश चिंचोलीकर, विश्वस्त संदीप शेंडगे, विपश्यना बाल शिबीर शिक्षक किरण बनसोडे, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये विपश्यना आचार्य श्री. सत्यनारायण गोएंका यांचा विपश्यना परिचय हा संग्रहित मार्गदर्शनपर व्हिडिओ दाखवण्यात आला.

यावेळी बोलताना अविनाश चिंचोलीकर म्हणाले, विपश्यना काय आहे? आणि तिचा अभ्यास समकालीन काळामध्ये आपण का करायला हवा? असे प्रश्न आपणा सर्वांना पडणे साहजिक असून मनाची शक्ती वाढविण्यासाठी विपश्यना करणे आवश्यक आहे. भगवान बुध्दांनी २५०० वर्षापूर्वी विपश्यना ही ध्यान साधना शोधली. आज जगभरात विपश्यना केली जाते. सगळ्यांना वाटते की, माणसाने चांगले आयुष्य जगायला हवे. सदाचारी जीवन जगण्यासाठी आपल्या मनावर नियंत्रण प्राप्त करणे आवश्यक आहे. मन निर्मळ ठेवत राग, भय, चिंता, अहंकार,लोभ यापासून मुक्ती मिळविण्यासाठी आपण सर्वांनी १० दिवसाचा विपश्यना कोर्स करणे आवश्यक असल्याचे श्री. चिंचोलीकर यांनी यावेळी सांगितले. तसेच यावेळी विपश्यनाची पहिली पायरी असलेली आनापानसती ध्यानसाधना याचा १० मिनिटे प्रत्यक्ष अभ्यास करण्यात आला. दररोज जर दोन वेळा आनापानसती ध्यानसाधना केली तर आपली स्मरणशक्ती वाढते तसेच आपण चिंतामुक्त आयुष्य जगू शकतो, असे अविनाश चिंचोलीकर यांनी यावेळी सांगितले.

अधिष्ठाता डॉ. एच. एच. शिंदे म्हणाले, इगतपुरी येथील धम्मगिरी विपश्यना केंद्राची शाखा असलेल्या धम्म अजंता विपश्यना केंद्र येथे ही १० दिवसीय निःशुल्क शिबिर असते.

हे शिबिर सर्व प्राध्यापकांनी वेळ काढून करणे आवश्यक आहे. माणूस हा पृथ्वीतलावरील एकमेव असा प्राणी आहे, जो स्वत:कडे आंतरबाह्यपणे पाहू शकतो. आपण आपल्या जबाबदाऱ्यांमुळे स्वत: साठी वेळ काढण्यासाठी खूप विचार करत असतो मात्र, आपल्यावर कोणीही अवलंबून नसून आपण सर्वांनी १० दिवस वेळ काढत निवासी शिबिर करणे काळाची गरज आहे. प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांना यावेळी उत्तरे देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन अधिष्ठाता डॉ.एच.एच.शिंदे यांनी केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

# देशमुख हत्याकांडः खा.सोनवणेंनी ठोठावला मानव अधिकार आयोगाचा दरवाजा

### दिल्लीत प्रियांक क्रानूनगोंची घेतली भेट

बीड: मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येला २५ दिवस उलटले तरी अद्याप मुख्य आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. दरम्यान, संतोष देशमुख यांचा खून आणि त्यांच्या देहाची केलेली विटंबना ही शरमेची बाब आहे. यामुळे राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने यात स्वतंत्रपणे चौकशी करावी, असे निवेदन खा.बजरंग सोनवणे यांनी आयोगाचे सदस्य प्रियांक क्रानूनगो यांना भेटून दिले आहे.



दि.९ डिसेंबर रोजी संतोष देशमुख यांचे अपहरण झाल्याचे समजल्यानंतर सर्वात पहिल्यांदा संतोष देशमुख यांचा जीव वाचावा, यासाठी खा.सोनवणे यांनी पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ यांच्याशी संपर्क केला. दरम्यान, त्यांनी फोन घेणे टाळले. शिवाय केज पोलीसांनी देखील हे प्रकरण गांभिर्याने घेतले नाही. परिणामी, या कालावधीत संतोष देशमुख यांचा मानसिक व शारीरिक छळ करुन हत्या झाली. पोलीसांनी वेळेत सुत्र फिरविले असते तर कदाचित स्व. संतोष देशमुख यांचा जीव वाचलाही असता. दरम्यान, त्यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. संतोष देशमुख यांना इतक्या वाईटपध्दतीने मारहाण केली की शरिरावर जागा देखील शिल्लक नव्हती. त्यांच्या देहाला चटके देखील देण्यात आले. शिवाय शवाची विटंबना देखील करण्यात आली. इतक्या अमानुषपध्दतीने मारहाण झाल्याच्या घटनेने राज्यात खळबळ उडालेली आहे. दि.९ डिसेंबर रोजी हत्या झालेली असून यातील चार आरोपी अटक आहेत तर ३ अद्याप फरार आहेत. सदरील प्रकरणात राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाने दखल घेऊन स्वतंत्र चौकशी समिती स्थापन करून तपास करावा, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी आज दि.३ जानेवारी रोजी दिल्ली येथे मानव अधिकार आयोगाचे प्रियांक क्रानूनगो यांच्याकडे केली आहे. संतोष देशमुख यांच्या खुन्यांना शिक्षा देऊन देशमुख कुटूंबियांना न्याय देण्यासाठी खा.सोनवणे यांनी पहिल्या दिवसांपासून ठोस भुमिका घेतलेली आहे. यासाठी संसदेत आवाज उठविणे, संसदेबाहेर आवाज उठविणे, पोलीस यंत्रणेशी बोलणे आणि कायद्याच्या कसोटीवर तपास करून घेण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

---

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-८२७**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**दिनांक १९/१२/२०२४**

अर्जदार ०:- सुनील धोंडीबा घोरपडे रा चिखलठाण ता कनड जि छ संभाजीनगर

गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय चिखलठाण ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

बिषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगा मोहित सुनील घोरपडेच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलगा मोहित सुनील घोरपडेचा जन्म दिनांक ०५-०५-२०१९ रोजी चिखलठाण ता. केन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगा मोहित सुनील घोरपडेचा जन्म दिनांक ०५-०५-२०१९ रोजी चिखलठाण ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाब्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगा मोहित सुनील घोरपडेचा जन्म दिनांक ०५-०५-२०१९ रोजी चिखलठाण येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १४-०१-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०५-०५-२०१९ रोजी चिखलठाण येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

---

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/ जन्म-मृत्यु नोंद/सिआर-११५**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**दिनांक ११/०३/२०२४**

१. अर्जदार ०:- इब्राहिम सांडु शेख रा. धामणगाव ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

१. गैरअर्जदार ०:- ग्रामपंचायत कार्यालय चिकलठाण ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी ॲड एम. एच सयद यांच्या मार्फत अर्ज सादर करून स्वः ताहाचे चे जन्माचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा जन्म दिनांक ०१/०८/१९५७ रोजी चिकलठाण ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांची स्वःतहाची जन्म दिनांक दिनांक ०१/०८/१९५७ रोजी चिकलठाण ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांची स्वःतहाची जन्म दिनांक ०१/०८/१९५७ रोजी चिकलठाण ता. कन्नड येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०६/०१/२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर ओल्यास अर्जदारास दिनांक ०१/०८/१९५७ रोजी चिकलठाण येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक ११/०३/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझया सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड

---

## जाहिर प्रगटन

**माननिय दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर गंगापुर यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज कं. ०९/२०२५

अर्जदार – १. मिनाबाई काकासाहेब पाठे, रा. भोयगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर २. रेखा प्रकाश डुबे, रा. चिंचखेडा, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर ३. रेवती संदिप गायकवाड रा. पानवी ता. वैजापुर, जि. छत्रपती संभाजीनगर ४. द्वारकाबाई अनिल बाराहाते रा. पिंप्री, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर ५. श्रीकांत काकासाहेब पाठे रा. भोयगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर ६. रीमाबाई बाळासाहेब गायकवाड रा. बोलेगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर ७. कावेरी प्रशांत पारदे रा. तळपिंप्री, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार –

निरंक

विषय – कलम २ बॉम्बे रेगूलेशन कायदयाप्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी ॲड. भगवान एस. शिंदे यांच्या मार्फत या मा. न्यायालयात अर्जदार यांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे, सदरील अर्जात अर्जदार यांनी म्हटले आहे की, असे की, अर्जदार कं. १ हि मयत काकासाहेब हरीभाऊ पाठे यांची पत्नी आहे, अर्जदार कं २ ते ७ हे मुले व मुली आहे. काकासाहेब हरीभाऊ पाठे हे दिनांक २०/०९/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार अर्जासोबत मयताचे मुत्युप्रमाणपत्र व अर्जदार यांचे आधार कार्ड जोडत आहे. अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी ते मयत काकासाहेब हरीभाऊ पाठे यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे वारसाचे प्रमाणपत्राची अवश्यकता असल्यामुळे, त्याकामी त्यांनी मा. न्यायालयातुन कायदेशीर वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. मयत काकासाहेब हरीभाऊ पाठे यांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार यांनी या अर्जा व्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयात ते मयत काकासाहेब हरीभाऊ पाठे यांचे वारसदार आसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला नाही.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांना ते मयताचे कायदेशीर वारसदार आसल्याचे प्रमाणपत्र देण्यास ज्या कोणाचा उजर व आक्षेप आसेल अशानी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत त्यांचा उजर व आक्षेप या न्यायालयात नोंदवावा. मुदतीमध्ये कोणाचा उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल, मुदतीनतंर आलेला उजर व आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

पुढील तारीख २१/०२/२०२५.

आज दिनांक ०३/०१/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपिक — सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर गंगापूर

---

## जाहिर प्रगटन

**माननिय दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर गंगापुर यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज कं. १३/२०२५

अर्जदार – १. गणेश भाऊसाहेब मनवरे वय ३२ वर्ष, धंदा शेती, रा. भोयगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर २. विनोद उर्फ बाळु भाऊसाहेब मनचरे वय २८ वर्ष, धंदा शेती, रा. भोयगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार – निरंक

विषय – कलम २ बॉम्बे रेगुलेशन कायदयाप्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी ॲड. भगवान एस. शिंदे यांच्या मार्फत या मा. न्यायालयात अर्जदार यांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे, सदरील अर्जात अर्जदार यांनी म्हटले आहे की, असे की, मयत भागुबाई बंडु मंचरे हया अर्जदार कं. १ व २ यांच्या आत्या होत्या, त्या दिनांक २२/०४/२०२४ रोजी मौजे भोयगांव, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेल्या आहेत. मयत भागुबाई बंडु मंचरे यांचे लग्न झालेले नव्हते त्या अविवाहीत होत्या. अर्जदार कं. १ व २ यांचे वडिल नामे भाऊसाहेब बंडु मनचरे हे दिनांक २०/०८/२०१६ रोजी व आई नामे शोभाबाई भाऊसाहेब मनचरे हया दिनांक ०६/०६/२०२० रोजी मयत झालेल्या आहेत. अर्जदार अर्जासोबत मयताचे मुत्युप्रमाणपत्र व अर्जदार यांचे आधार कार्ड जोडत आहे. असे की, अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी ते मयत भागुबाई बंडु मंचरे यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे वारसाचे प्रमाणपत्राची अवश्यकता असल्यामुळे, त्याकामी त्यांनी मा. न्यायालयातुन कायदेशीर वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. असे की, मयत भागुबाई बंडु मंचरे यांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार यांनी या अर्जा व्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयात ते मयत भागुबाई बंडु मंचरे यांचे वारसदार आसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला नाही.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांना ते मयताचे कायदेशीर वारसदार आसल्याचे प्रमाणपत्र देण्यास ज्या कोणाचा उजर व आक्षेप आसेल अशानी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत त्यांचा उजर व आक्षेप या न्यायालयात नोंदवावा. मुदतीमध्ये कोणाचा उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल, मुदतीनतंर आलेला उजर व आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. पुढील तारीख २४/०२/२०२५.

आज दिनांक ०३/०१/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपिक — सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर गंगापूर

---

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/मिआर-८०७**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक १९/१२/२०२४**

अर्जदार ०:- शेख रफिक शेख निजाम रा मेहताब नगर कन्नड ता कन्नड जि छ संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार ०:- नगर परिषद कार्यालय कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या आई दिलशाद बी शेख निजामच्या मृत्यू प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या आई दिलशाद बी शेख निजामचा मृत्यू दिनांक २५-१०-२००८ रोजी कन्नड ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या आई दिलशाद बी शेख निजामचा मृत्यू दिनांक २५-१०-२००८ रोजी कन्नड ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या आई दिलशाद बी शेख निजामचा मृत्यू दिनांक २५-१०-२००८ रोजी कन्नड येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २०-०१-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २५-१०-२००८ रोजी कन्नड येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरलाजाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

---

## जाहीर नोटीस

**सोयगांव येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर सोयगांव, यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.०८/२०२५

अर्जदार- १) श्री. शिवाजी साहेबराव खैरनार वय : ६८ वर्षे, धंदा : शेती, २) सौ. उषाबाई वना सोनवणे वय : ५६ वर्षे, धंदा : शेती व गृहिणी, ३) सौ. योगिता जगदीश पाटील. वय : ४५ वर्षे, धंदा : शेती व गृहिणी, सर्व रा. आज मुक्काम शिवाजी चौक, मु.पो. बनोटी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर- ४३११५०.

-: विरुध्द :-

सामनेवाले – कोणीही नाही

ज्याअर्थी कै. साहेबराव रामराव खैरनार यांचे दि.१०/०३/२०१७ रोजी निधन झाले व कै. वैजंताबाई साहेबराव खैरनार यांचे १०/०५/२०१९ रोजी निधन झाले त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून दाखला मिळणेसाठी अर्जदार यांनी मे. कोर्टामध्ये बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे अर्ज केलेला आहे. सदर अर्ज हा कै. साहेबराव रामराव खैरनार व कै. वैजंताबाई साहेबराव खैरनार यांचे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकामी केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना वारस दाखला देणेस कोणाची हरकत असल्यास त्यांनी मे. कोर्टात स्वतः अगर त्यांचे वकिलांमार्फत दि. १६ /०२/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता हजर होवून आपले म्हणणे मांडावे अन्यथा कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल.

प्रस्तुतची जाहिर नोटीस मे. कोर्टाच्या आदेशान्वये प्रसिद्ध केली असे.

ही जाहिर नोटीस ता. ०३/०१/२०२५

लिपिक — अधिक्षक

सि.ज.ज्य.डि.सो., सोयगांव.

---

## जाहीर नोटीस

**सोयगांव येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर सोयगांव, यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.१०/२०२५

अर्जदार – १) श्रीमती वानुबाई सुपडू जाधव वय : ७५ वर्षे, धंदा : शेती व गृहिणी, २) श्री. संजय सुपडू जाधव वय : ४२ वर्षे, धंदा : शेती, ३) श्री. परशराम सुपडू जाधव. वय : ३६ वर्षे, धंदा : शेती, ४) सौ. रेखाबई शिवाजी कोळी वय : ४१, धंदा : शेती व गृहिणी, सर्व रा. आज मुक्काम इंदिरा नगर, बनोटी सर्कल, मु.पो.बनोटी, ता.सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर – ४३११५०.

-: विरुध्द :-

सामनेवाले – कोणीही नाही

ज्याअर्थी कै. सुपडू वना जाधव यांचे दि. १६/०८/२०२२ रोजी निधन झाले त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून दाखला मिळणेसाठी अर्जदार यांनी मे. कोर्टामध्ये बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे अर्ज केलेला आहे. सदर अर्ज हा कै. सुपडू वना जाधव यांचे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकामी केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना वारस दाखला देणेस कोणाची हरकत असल्यास त्यांनी मे. कोर्टात स्वतः अगर त्यांचे वकिलांमार्फत दि. १६/०२/२०२५. रोजी सकाळी ११:०० वाजता हजर होवून आपले म्हणणे मांडावे अन्यथा कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल.

प्रस्तुतची जाहिर नोटीस मे. कोर्टाच्या आदेशान्वये प्रसिद्ध केली असे.

ही जाहिर नोटीस ता.०३/०१/२०२५

लिपिक — अधिक्षक

सि.ज.ज्य.डि.सो., सोयगांव.

---

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**जा.क्र. २०२४/मशाकन/जमाबंदी-१/जन्म-मृत्यू नोंद/गिआर-८१०**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**दिनांक १९/१२/२०२८**

अर्जदार : जिजाबाई सुखदेव यादव रा गोपाळवाडी ता वैजापूर जि छ संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय आडगाव जे ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतः जिजाबाई सुखदेव यादवच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या स्वतः जिजाबाई सुखदेव यादवचा जन्म दिनांक १०-०८-१९६४ रोजी आडगाव जे ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतः जिजाबाई सुखदेव यादवचा जन्म दिनांक १०-०८-१९६४ रोजी आडगाव जे ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या स्वतः जिजाबाई सुखदेव यादवचा जन्म दिनांक १०-०८-१९६४ रोजी आडगाव जे येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १४-०१-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १०-०८-१९६४ रोजी आडगाव जे येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

---

## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी- १/ जन्म-मृत्यु नोंद/गिआर-८१२**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**दिनांक १९/१२/२०२४**

अर्जदार : संतोष सोनाजी शिंदे रा पळसखेडा ता कन्नड जि छ संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय पळसखेडा / खापरखेडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगी अनुराधा संतोष शिंदेच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलगी अनुराधा संतोष शिंदेचा जन्म दिनांक ०४-०१-२०१२ रोजी मुगंसापुर ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांच्या मुलगी अनुराधा संतोष शिंदेचा जन्म दिनांक ०४-०१-२०१२ रोजी मुंगसापुर ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगी अनुराधा संतोष शिंदेचा जन्म दिनांक ०४-०१-२०१२ रोजी मुगंसापुर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १४-०१-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०४-०१-२०१२ रोजी मुर्गसापुर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

---

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**जा.क. २०२४/मशाका/जमाबंदी- १/ जन्म-मृत्यू नोंद/गि आर-८०९**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**
**दिनांक १९/१२/२०२४**

अर्जदार : हबीबा बाबू शहा रा चिखलठाण ता कन्नड जि छ संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय चिखलठाण ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतः हबीबा बाबू शहाच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या स्वतः हवीवा बाबू शहाचा जन्म दिनांक ०६-०७-१९८८ रोजी चिखलठाण ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतः हबीबा बाबू शहाचा जन्म दिनांक ०६-०७-१९८८ रोजी चिखलठाण ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या स्वतः हवीवा बाबू शहाचा जन्म दिनांक ०६-०७-१९८८ रोजी चिखलठाण येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १४-०१-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०६-०७-१९८८ रोजी चिखलठाण येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

---

## जाहिर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २०२/२०२४

निशाणी क्र.

१/- सुनिल भवरलाल जैन (चोपडा), वय ५३ वर्ष, धंदा खाजगी नोकरी, रा. वार्ड क्र. १५, राम नगर, दोंडी लोहारा, जिल्हा बालोद, छत्तीसगढ. ह मु. पळासखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर. २/- अनिल कुमार भवरलाल जैन (चोपडा), वय ५१ वर्ष, धंदा वकीली, रा. वरीलप्रमाणे. ३/- मुलचंद भवरलाल जैन (चोपडा), वय ४७ वर्ष, धंदा सरकारी नोकरी, रा. वरीलप्रमाणे. ४/- राधाबाई भवरलाल जैन (चोपडा), वय ६९ वर्ष, धंदा घरकाम रा. वरीलप्रमाणे.

विरूद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत भवरलाल मुलचंद जैन (चोपडा), यांचा दि. ११.०४.२०२३ रोजी मौजे राम नगर, दोंडी लोहारा, जिल्हा बालोद, छत्तीसगढ येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ हे एकमेव वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत भवरलाल मुलचंद जैन (चोपडा), यांचे वारस असुन त्यांना मयत भवरलाल मुलचंद जैन (चोपडा), यांना शासकीय व निमशासकिय कामासाठी वारस प्रमाणपत्र करिता आवश्यक आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आजरोजी दि.३/१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता.१४/२/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ५९९/२०२४

पु.ता. २७/०२/२०२५

अर्जदार: १. संगिता सुभाष पडघन, वय. ४७ वर्ष धंदा. शेती २. राहूल सुभाष पडघन, वय.२७ वर्ष धंदा. शेती ३. गणेश सुभाष पडघन, वय.२२ वर्ष धंदा. शेती १ व ३ रा. फुलेनगर, गंगापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ४. कल्याणी नवनाथ तेलंगे वय.२९ वर्ष धंदा. शेती रा. भेंडाळा, ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर

-: विरूद्ध:-

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण – कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री.आर.जि. पवार यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, अर्जदार नं. १ यांचे पति तसेच अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडिल नामे सुभाष तुकाराम पडघन हे दि. २०/१०/२०२३ रोजी मौजे गंगापूर ता. गंगापूर येथे मयत झाले आहे. अर्जदार हे मयत सुभाष तुकाराम पडघन यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत सुभाष तुकाराम पडघन यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याकामी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत सुभाष तुकाराम पडघन यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्धीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत सुभाष तुकाराम पडघन यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुट्टी नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक — सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालत्य गंगापुर

---

## जाहीर नोटीस

**सोयगांव येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर सोयगांव, यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं.०९/२०२५

अर्जदार : १) श्रीमती लक्ष्मीबाई पिरन पाटील वय : ८३ वर्षे, धंदा : शेती व गृहिणी, २) श्री. चैत्राम पिरन पाटील वय : ७८ वर्षे, धंदा : शेती, ३) श्री. भाऊसाहेब पिरन पाटील. वय : ५० वर्षे, धंदा : शेती, ४) श्री. पंढरीनाथ पिरन पाटील वय : ४९ वर्षे, धंदा : शेती, सर्व रा. आज मुक्काम शिवाजी चौक, मु.पो. बनोटी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर ४३११५०.

-: विरुध्द :-

सामनेवाले – कोणीही नाही

ज्याअर्थी कै. पिरन रामराव पाटील यांचे दि. १४/०४/२०१६ रोजी निधन झाले त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून दाखला मिळणेसाठी अर्जदारयांनी मे. कोर्टामध्ये बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे अर्ज केलेला आहे. सदर अर्ज हा कै. पिरन रामराव पाटील यांचे कायदेशीर वारस ठरवून मिळणेकामी केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना वारस दाखला देणेस कोणाची हरकत असल्यास त्यांनी मे. कोर्टात स्वतः अगर त्यांचे वकिलांमार्फत दि. १६/०२/२०२५रोजी सकाळी ११:०० वाजता हजर होवून आपले म्हणणे मांडावे अन्यथा कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल.

प्रस्तुतची जाहिर नोटीस मे. कोर्टाच्या आदेशान्वये प्रसिद्ध केली असे.

ही जाहिर नोटीस ता.०३/०१/२०२५

लिपिक — अधिक्षक

सि.ज.ज्य.डि.सो., सोयगांव.

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २२९/२०२४.

१. विमलबाई त्रंबक रामकोर, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. पोहरी ब. ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर. २. साधना संभाजी रामकोर, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा वरीलप्रमाणे. ३. ऋषीकेश संभाजी रामकोर, वय २५ वर्षे, धंदा नोकरी, रा. वरीलप्रमाणे. ४. अभय संभाजी रामकोर, वय २१ वर्षे, धंदा नोकरी, रा. प्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अशोक आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत संभाजी त्रंबक रामकोर यांचा दिनांक ०८/०७/२०२१ रोजी पाचोरा, ता. पाचोरा. जि. जळगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ४ वारस आहे असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २४/१२/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. २९/०१/२०२५

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव

लातूर
# जिल्हा
**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## वैष्णवी श्रीकांत पाटील हिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ जानेवारी -**



युवक व क्रीडा सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय पीपीटी चॅलेंज स्पर्धेतून शिवाजी महाविद्यालय, उदगीरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाची विद्यार्थीनी वैष्णवी श्रीकांत पाटील हिची केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयाच्या वतीने विकसित भारत यंग लीडरर्स डायलॉग २०२५ अंतर्गत दिल्ली येथे होणाऱ्या केंद्रीय युवक महोत्सवांतर्गत राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या राष्ट्रीय महोत्सवामध्ये ती महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. स्त्री सबलीकरण या विषयावर महाराष्ट्रातील ज्या तीन विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. त्यामध्ये वैष्णवीचा समावेश असून मराठवाड्यातून निवड झालेली ती एकमेव आहे. वैष्णवीच्या या यशाबद्दल किसान शिक्षण प्रसारक मंडळ व शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्रीरंगराव पाटील, पांडुरंग शिंदे, हिरागीर गिरी, गुंडेराव पाटील, रामराव एकंबे, प्राचार्य डॉ. मांजरे आदि उपस्थित होते.

### संक्षिप्त वृत्त...



#### लातूर कॉलेज ऑफ फार्मसीत सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**औसा, दि.३ जानेवारी -**

भारतातील पहिल्या शिक्षिका, मुख्याध्यापिका, स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या विद्येची जननी व समस्त स्त्रियांना उजेडाची वाट दाखवणाऱ्या क्रांतीसुर्य ज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, माधुरी बावगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला, प्राचार्या योगिता बावगे, प्राचार्य संतोष मेदगे, प्रा. अतुल कदम, प्रा. राजशेखर चौधरी, प्रा. माधुरी पोळकर, प्रा. शुभम वैरागकर आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.



#### शिवाजी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**उदगीर, दि.३ जानेवारी -**

शिवाजी महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी केली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.एम. मांजरे होते. त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन केले. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाशझोत टाकताना डॉ. मांजरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.व्ही.के. भालेराव, डॉ.एस.डी. सावंत, डॉ.ए.एच. पाटील, प्रबंधक बी.के.पाटील, व्ही. डी. गुरनाळे, आर.एम. लाडके, देवनाळे, शेडोळे, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ.डी.बी. मुळे यांनी तर आभार डॉ.ए.एस. टेकाळे यांनी मानले.



#### दैठणा येथे अंगणवाडीत सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**शिरूर अनंतपाळ, दि.३ जानेवारी -**

दैठणा (ता. शिरूर अनंतपाळ) येथे अंगणवाडी क्र.२ मध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी अंगणवाडी क्रमांक दोन मधील शिक्षिका म्हणून जयश्री बिरादार व सहाय्यक मदतनीस संगीता शिंदे आणि सुरेखा पाटील यांच्याकडून उपस्थिती लावण्यात आली. यावेळी जयश्री बिरादार यांनी या दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.

### लातूर-धाराशिव सीमेवर पारंपरिक वेशभूषेत पदयात्रेचे स्वागत...

## आ. अभिमन्यू पवारांची पदयात्रा धाराशिव जिल्ह्यात दाखल

#### वॉटर ग्रीड प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी केला होता नवस...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.३ जानेवारी -**

मराठवाड्याचा सर्वात महत्त्वाचा प्रोजेक्ट म्हणून मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाकडे पाहिले जाते. हा प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस असावेत. अशी माझी इच्छा होती. यामुळे आई तुळजाभवानीला मी नवस केला होता. याचबरोबर महाराष्ट्राच्या कल्याणासाठी पुन्हा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले आणि माझा नवस पूर्ण झाला. म्हणून मी नवसाची पुर्तता करण्यासाठी पायी औसा ते तुळजापूर जात आहे.अशी स्पष्टोक्ती आ. अभिमन्यू पवार यांनी दोन



जिल्ह्याच्या सिमेवर उजनी येथे पारंपरिक वेशभुषेत गावकऱ्यांनी पदयात्रेचे स्वागत केले. त्यावेळी ते बोलत होते.

आमदार अभिमन्यू पवार यांची तीन दिवशीय पदयात्रा गुरुवार दि.२ रोजी धाराशिव जिल्ह्यात दाखल झाली. लातूर-धाराशिव जिल्ह्याच्या सिमेवर असलेल्या उजनी येथे ग्रामस्थांनी पारंपारिक वेशभूषेत पदयात्रेचे स्वागत केले. तर धाराशिव जिल्ह्यात अनेक ठिकाणी आमदार अभिमन्यू पवारांचे हार पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले आहे. पदयात्रा गुरूवारी ताकविकी येथील तुळजाभवानी अन्नछत्र येथे थांबून शुक्रवारी सकाळी तुळजापूर च्या दिशेने रवाना होणार आहे. राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर यावे व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व्हावे यासाठी आमदार अभिमन्यू पवारांनी नवस बोलला होता. तो पुर्ण झाल्याने आमदार अभिमन्यू पवार यांच्यासोबत शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह बुधवारी सकाळी औसा येथून पदयात्रेला रवाना झाले आहेत. गुरुवारी सकाळी पदयात्रा धाराशिव जिल्ह्यात दाखल झाली आहे. यावेळी धाराशिव जिल्ह्यात पदयात्रेचे स्वागतासाठी ठिकठिकाणी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शुक्रवारी सकाळी पदयात्रा तुळजापूरच्या दिशेने निघाली असून दुपारी ३ वा. नंतर पदयात्रा तुळजापूर मध्ये दाखल झाली.

या पदयात्रेत आमदार अभिमन्यू पवार यांच्यासह भाजपाचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता,बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, उपसभापती प्रा. भिमाशंकर राचट्टे, ॲड. परिक्षीत अभिमन्यू पवार, कासारसिरसी मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर वाकडे, औसा शहर अध्यक्ष सुनिल उटगे, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुधीर पोतदार, बाजार समितीचे संचालक युवराज बिराजदार, प्रवीण कोपरकर, विष्णू कोळी, प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी रविशंकर केंद्रे, भाजप युवा मोर्चाचे प्रदेश सचिव दत्ता चेवले, गिरीराज सोमाणी, प्रा. शिव मुरगे, लहू कांबळे, बंकट पाटील, अक्रम खान, बालाजी निकम, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष नितीन कवठाळे, सचिन आनसरवाडे आदीसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

#### सिंचन, औद्योगिक विकास साधणार...

औसा मतदार संघात सिंचनक्षेत्रात वाढ करुन औद्योगिक विकासातून रोजगार निर्मिती करणार आहे.य ामध्ये अनेक कामे पुर्ण झाली आहेत. उर्वरीत या पाच वर्षात पुर्ण करणार असल्याचा विश्वास आ. अभिमन्यू पवार यांनी पदयात्रे दरम्यान व्यक्त केला.

## शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीबाबत माने यांची पदाधिकाऱ्यांशी चर्चा



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३ जानेवारी -**

शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी शुक्रवार दि.३ जानेवारी रोजी निलंगा येथे लातूर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणी बाबत शिवसेना पक्ष पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.

याप्रसंगी जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी लातूर जिल्ह्यातील निलंगा, देवणी, शिरूर अनंतपाळ व औसा या तालुक्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावून या बैठकीमध्ये संघटनात्मक बांधणी येणाऱ्या सर्व निवडणुका सध्याची राजकीय परिस्थिती यासंदर्भात सविस्तर असा आढावा घेऊन मार्गदर्शन केले.

येणाऱ्या निवडणुकीसाठी सर्व पदाधिकाऱ्याने तत्पर राहावे तसेच गाव तिथे शाखा सर्व पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या सर्व अंगीकृत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन शिवसेना मजबूत करावे, असे आव्हान शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी केले.

यावेळी माने म्हणाले की शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना केलेली कामे हेच खऱ्या अर्थाने आपल्यासाठी मोठी शिदोरी असून जनमाणसात पक्षाची प्रतिमा उंचावण्याची योग्य वेळ आलेली आहे आणि पुन्हा शिवसेनेचे ताकद वाढवून एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी कामाला लागावे अशा सूचना केल्या.

यावेळी युवा सेना जिल्हाप्रमुख युवराज वंजारे, उपजिल्हाप्रमुख सुधीर पाटील, महिला आघाडी जिल्हाप्रमुख अर्चनाताई बिरादार, शिरूर आनंदपाल तालुकाप्रमुख विकास शिंदे, देवणी तालुकाप्रमुख धनंजय बिरादार, निलंगा तालुका प्रमुख भगवान जाधव, महिला आघाडी तालुकाप्रमुख विधीज्ञ शिंदे तसेच शिवसेनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## श्रीराम विद्यालयात नेहरू युवा केंद्रातर्फे तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धा



**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.३ जानेवारी -**

श्रीराम विद्यालय रेणापूर येथे आज दि. जाने रोजी नेहरू युवा केंद्र लातूर तर्फे कबड्डी, खो-खो, धावणे, गोळाफेक इ. स्पर्धाचे तालूका स्तरावर आयोजन करण्यात आले होते. जिल्हा युवा अधिकारी साक्षी समैया. लेखपाल संजय ममदापूर यांच्या मार्गदर्शना खाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्राचार्य सिध्देश्वर मामडगे. तर प्रमूख अतिथी म्हणून श्रीराम प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सतिष मोरे, पर्यवेक्षक अनिल कुटवाड, प्रा. भरत धायगुडे, क्रिडाविभागप्रमूख विवेक भातीकरे, सांस्कृतिक विभागप्रमूख अमृतेश्वर स्वामी, प्रा.एल.आर. शेवाळेख प्रा. चंद्रशेखर मोटे, तालुका समन्वयक अविनाश दुमपल्ले यांची उपस्थिती होती.

धावणे (मुली) स्पर्धेत प्रथम सोनिया पांचाळ, द्वितीय भक्ती येमले, तृतीय मानवी पांचाळ. धावणे मुले प्रथम रमन पांचळ, द्वितीय पवन मदने, तृतीय आरुष झुल्फे. गोळाफेक स्पर्धेत मुली प्रथम गायत्री राजे, द्वितीय अमृता निकम, तृतीय सोनिया पांचाळ. गोळाफेक (मुले) प्रथम उमर शेख, द्वितीय रमन पांचाळ, तृतीय अखिलेश काळे. कबडी प्रथम श्रीराम विद्यालय रेणापूर, द्वितीय वीर हनूमान क्रिडा मंडळ रेणापूर. खो-खो प्रथम श्रीराम विद्यालय रेणापूर., द्वितीय प्रभात क्रिडामंडळ रेणापूर यांनी पारितोषिक पटकावले.

विजेत्या खेळाडूंना ट्रॉफी व प्रमाणपत्र असे देण्यात आले आणि विजेता संघास पुढील स्पर्धा आहे जिल्हास्तरीय होणार आहेत आहे. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी क्रिडाविभाग प्रमूख विवेक भातीकरे, निलेश उगीले, सूरज अकनगिरे यांनी परिश्रम घेतले.

## कानेगावात बालिका दिन उत्साहात साजरा

#### बालिका दिनानिमित्त बालसभेतून मुलींनी मोकळ्या केल्या आपल्या भावना

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.३ जानेवारी -**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील कानेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत दि.३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती 'बालिका दिन' म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी बाल सभेचे आयोजन करण्यात आले होते.



बाल सभेतून मुलींनी आपल्या शिक्षणाविषयी व शिक्षणात येत असलेल्या अडचणी विषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राधाबाई येडले तर प्रमुख पाहुणे म्हणून पद्मावती बने, पायल स्वामी, सायली शिवणगे, श्रद्धा आटरगे, प्रिया लांडगे यांनी भूमिका वठवली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यपुरस्कार प्राप्त शिक्षक सुशीलकुमार पांचाळ यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर बोरुळकर, आदर्श शिक्षिका राधाबाई येडले, पद्मावती बने यांनी आपली मनोगत व्यक्त केले.

यावेळी राधा सुर्यवंशी, प्रशांत जाधव, चंद्रसेन ढगे, विश्वनाथ लांडगे आदी उपस्थित होते. यावेळी शाळेतील सर्व चिमुकल्या विद्यार्थिनींनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारली होती. यावेळी शाळेच्या वतीने सर्व सावित्रीच्या लेकींचा पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. तसेच, सावित्रीबाईंच्या प्रतिमेचे पूजनही विद्यार्थिनींनीच्या हस्तेच करण्यात आले.


बालिका दिनानिमित्त सावित्रीबाईंच्या जीवनपटाविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकिता सुरवसे व स्वरांजली लांडगे हिने तर आभार शरद येडले यांनी मानले.

## सावित्रीचा वसा आणि वारसा जपणे हे आजच्या मुलींचे कर्तव्य आहे : प्रा. सुरेखा दहिफळे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ जानेवारी -**

भारतीय संस्कार आणि संस्कृतीचे जतन करतच सावित्रीचा वसा आणि वारसा जपणे हे आजच्या मुलींचे कर्तव्य आहे असे मत राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सुरेखा दहिफळे यांनी व्यक्त केले. त्या वाढवणा येथील श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्याल व राजे संभाजी माध्यमिक विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती निमित्त बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजे संभाजी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद आमगे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य युसूफ मुंजेवार, मच्छिंद्र गडीकर, नरसिंग कांबळे उपस्थित होते. परीपाठाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांनी सय्यद शबाहद वहाब यांनी मनोगत व्यक्त केले. सावित्रीच्या पाठीशी खंबीरपणे ज्योतिबा उभे होते. जेव्हा महिलांवर संकटे येतात तेंव्हा आजच्या पुरुषांने ज्योतिबा सारखे खंबीरपणे उभे राहिले पाहिजे, असे मत अध्यक्षीय भाषणात शरद आमगे म्हणाले.



कार्यक्रम यशस्वी पडण्यासाठी प्रा. रामदास केदार, प्रा. महादेव इंद्राळे, प्रा. दत्तात्रय मुधाळे, प्रा. विष्णू केंद्रे, प्रा. मनोज मुळे, प्रा. रहीम पठाण, स्मिता हाळणे, गुरुलिंग स्वामी यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचलन प्रा. अनिल मगर तर आभार प्रा. दत्तात्रय मुधाळे यांनी मांडले.

## पशुसखीनी शाश्वत उत्पन्नासाठी मूल्यवर्धनाकडे वळावे : प्रा.डॉ. अनिल भिकाणे



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ जानेवारी -**

पशुसखींमध्ये उद्यमिता रूजली पाहिजे. शेळीच्या दुधापासून चीज, पनीर इत्यादी मुल्यवर्धित पदार्थ पशुसखींनी बनविले पाहिजे. अधिक अर्थार्जनासाठी शेळीपालक पशुसखींनी लेंडीखत आणि गांडूळखत निर्मितीचे मार्ग चोखंदळावेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक प्रा.डॉ. अनिल भिकाणे यांनी उदगीर पशुवैद्यक महाविद्यालयात माविम पुरस्कृत पहिल्या पशुसखी प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी आभासी पद्धतीने प्रमुख अतिथी म्हणून केले.

पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता प्रा.डॉ. नंदकुमार गायकवाड हे अध्यक्षस्थानी होते. प्रा.डॉ. भिकाणे पुढे म्हणाले की, शेळीपालकांना मुल्यवर्धनातून अधिक अर्थप्राप्ती होऊ शकते. त्याकरिता पारंपरिक दृष्टिकोण सोडून उद्यमितेच्या दृष्टीने शेळीपालन केल्यास पशुसखींना उत्पन्नाचा एक शाश्वत मार्ग प्राप्त होऊ शकतो असा विश्वास प्रकट केला.

समारोपप्रसंगी पशुसखींसोबत चर्चा करून क्षेत्रातील त्यांचे कार्यानुभव आणि प्रशिक्षणाचा त्यांनी आढावा घेतला. अध्यक्षीय भाषणात प्रा.डॉ. गायकवाड म्हणाले की, नवतंत्राच्या यशस्वी प्रयोगाचे समाजात वेगाने अनुकरण होत असते. त्यामुळे प्रशिक्षित पशुसखींनी आत्मसात केलेले ज्ञान आणि कौशल्य स्वतः च्या गोठ्यात प्रथम उपयोगात आणावे. पशुवैद्यकीय क्षेत्रात उपलब्ध संशोधन आणि या संशोधनाचा पशुपालकांच्या गोठयातील प्रत्यक्ष उपयोग यात फार मोठी तफावत आहे.

ही दरी कमी करण्यासाठी अशा तंत्रज्ञानाच्या प्रसाराला गती मिळणे आवश्यक आहे. प्रशिक्षणातून आत्मसात केलेल्या ज्ञानाचा उपयोग पशुसखीने स्वतः आपल्या गोठ्यात करून इतरांना त्याबाबत प्रेरित करावे असे आवाहन केले.

समारोप प्रसंगी मंचावर माविम लातूरचे सहाय्यक जिल्हा समन्वय अधिकारी श्री. दीपक टेकाळे आणि प्रकल्प सह-समन्वयक डॉ. नरेंद्र खोडे हे उपस्थित होते. डॉ. धनंजय देशमुख, प्रकल्प समन्वयक यांनी आभासी पद्धतीने तसेच सहाय्यक जिल्हा समन्वय अधिकारी दीपक टेकाळे यांनी पशुसखींना यथोचित मार्गदर्शन केले. दि.२३ ते २७ डिसेंबर २०२४ दरम्यान घेण्यात आलेल्या श्रुंखलेतील या पहिल्या पाच दिवसीय प्रशिक्षणात लातूर जिल्ह्यातील २६ पशुसखी महिलांनी हिरीरीने सहभाग घेतला.

प्रकल्प सह-समन्वयक डॉ. नरेंद्र खोडे यांनी प्रास्ताविक केले. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या पशुसखींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. मंगल कलढोणे, अश्विनी मस्के, रत्नमाला देडे, मुक्ता कांबळे, रुक्मिणी बैकरे, सुलताना शेख, आणि माया गायकवाड या पशुसखी महिलांनी प्रशिक्षणाबाबत अभिप्राय व्यक्त केला.

सूत्रसंचालन डॉ. राम कुलकर्णी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. मत्स्यगंधा पाटील यांनी केले. प्रशिक्षणाच्या आयोजनासाठी प्रशिक्षण समन्वयक डॉ. शरद आव्हाड समवेत आयोजन समिती सदस्य, पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. संकेत नरवाडे, डॉ. अयान पाटील, डॉ. वेदान्त पांडे, डॉ. सुहासिनी हजारे, आणि डॉ. विनोद जाधव यांनी अथक परिश्रम घेतले.

यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, कर्मचारी गण, आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# हिमायतनगर येथील नवीन वाईन शॉप केले सील; राज्य उत्पादन शुल्कची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,दि. ०३ जानेवारी**

हिमायतनगर येथे नव्याने सुरू झालेल्या वाईन शॉप ला राज्य उत्पादन शुल्क विभागांच्या वतीने सील ठोकण्यात आले आहे. हि कारवाई दि. ३ जानेवारी रोजी आली. हिमायतनगर शहरातील मुख्य रस्ता किनवट-नांदेड महामार्गावर नव्याने वाईन शॉप दारूचे देशी, विदेशीचे दुकान थाटण्यात आले आहे. जवळपास एक ते दिड महिन्याचा कालावधी सदरचे दुकान थाटून झाला आहे.




तर दि. ३ जानेवारी शुक्रवारी दुपारी उत्पादन शुल्क विभागाचे एक पथक येथे आले आणि त्यांनी या शॉप ला सील ठोकले. या बाबतीत अधिक माहीती घेण्यासाठी संबंधित अधिकारी यांना भ्रमणध्वनीवरून संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी भ्रमणध्वनी उचलला नाही. त्यामुळे याबाबतची अधिक माहीती मिळू शकली नाही. अचानक दुकान बंद झाल्याने मद्यपिंचा चांगलाच हिरमोड झाला आहे. हिमायतनगर येथै परवानाधारक देशी दारूची चार दुकाने असून, बियर बार चार पाच दुकाने आहेत. देशी व विदेशी दारू विक्रेते हे चढ्या भावाने दारूची विक्री करीत असलेल्या अनेक तक्रारी मागील काळात झाल्या आणी सातत्यानं होत आहेत. . परंतू गेल्या दिड दोन महिन्यापासून येथे वाईन शॉप उघडल्याने मद्दपीना वाजवी भावात दारू मिळेल अशी आशा होती. परंतू येथेही ग्राहकांची अर्थिक लूट होत असल्याचे बोलल्या जात होते. हि चर्चा शहरात जोरदार पणे होत असतानाच दि. ३ रोजी उत्पादन शुल्क विभागाने या दुकानाला सील केले. त्यामुळे शहरात चर्चे ला उधाण आले असून, राज्य उत्पादन शुल्क विभागांच्या कारवाईचा अहवाल मात्र थंड बस्त्यात असून इन्स्पेक्शन असे रूप या कारवाईला देण्यात येत असले तरी दिड दोन महिन्यातच इन्स्पेक्शन कसे काय? होवू शकते असा सवाल ही सुजाण नागरीकातून उपस्थित केला जात आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी मात्र सध्या नॉटरिचेबल आहेत. त्यामुळे मॅनेजचा प्रकार आहे की, काय? अश्या चर्चेलाही तोंड फूटले आहे.

# यात्रेकरुंच्या आरोग्यासाठी आरोग्य विभागाचा पुढाकार; जनजागृतीसह मोफत उपचार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०३ जानेवारी**

माळेगाव येथे सुरू असलेल्या यात्रा कालावधीत जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत २४ तास आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या उपक्रमाचे नेतृत्व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख करत असून यात्रेकरूंच्या आरोग्याच्या काळजीसाठी व्यापक नियोजन त्यांनी केले आहे.

यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राशिवाय तीन रुग्णवाहिका व आणीबाणी वैद्यकीय सेवांसाठी १० रुग्णवाहिका तसेच ५ मोबाईल बाईक हेल्थ टीम तैनात करण्यात आल्या आहेत. एकूण १४४ अधिकारी आणि कर्मचारी या सेवेसाठी नेमण्यात आले असून यात १३ वैद्यकीय अधिकारी, ५ औषध निर्माण अधिकारी, १० आरोग्य सहाय्यक, २७ आरोग्य सेवक तर ६ परिचारिकांचा समावेश आहे.यात्रा परिसरात ६ ठिकाणी औषधसाठ्यासह वैद्यकीय पथके कार्यरत असून आजपर्यंत ३ हजार ५३५ यात्रेकरूंची तपासणी करून त्यांना मोफत औषधी वितरण करण्यात आले आहे. शुद्ध पाणी पुरवठ्याची देखील विशेष काळजी घेण्यात येत असून T.C.L. व्दारे पाणी शुद्ध करून त्याचा पुरवठा केला जात आहे.



आरोग्य विषयक जनजागृतीसाठी भव्य आरोग्य प्रदर्शन उभारले असून त्यात कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया, लसीकरण, विविध रोगांविषयी जनजागृती, तसेच प्रधानमंत्री मातृवंदना योजना, आभा कार्ड, जननी सुरक्षा योजना यासारख्या योजनांची माहिती दिली जात आहे. या उपक्रमामुळे यात्रेकरूंना आरोग्यविषयक उत्तम सुविधा मिळत आहेत.

# गुणवंत कामगारांची राज्यातील विविध महामंडळे व स्थानिक स्तरावर शासकिय समित्यावर नियुक्ती करावी-गुणवंत मिसलवाड

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०३ जानेवारी**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे सन १९७९ पासून मंडळाच्या नोंदीत अस्थापनेतील, समाजामध्ये व अस्थापनेमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या कामगारांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्रदान करण्यात येतो. सदर गुणवंत कामगारांची राज्यातील विविध महामंडळे, जिल्हा व स्थानिक तालुका पातळीवरील शासकिय कमिटी तसेच समित्यावरती नियुक्ती करावी, अशी आग्रही मागणी राज्य गुणवंत कामगार असोसिएशनच्यावतीने लेखी स्वरूपात राज्य सरकारकडे करण्यात आली असल्याचे राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचे विभागीय संचालक मा.श्री.गुणवंत एच.मिसलवाड यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.




हे पुरस्कार प्राप्त कामगार, विविध संस्था तसेच संघटनांच्या माध्यमातून तन-मन-धनाने समाजातील सर्व घटकासाठी अविरतपणे कार्य करीत असतात. शासनाने देखील त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेवून जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत त्यांना वयाच्या ७० वर्षापर्यंत विशेष कार्यकारी अधिकारी या पदावर नियुक्ती करण्यास मान्यता दिलेली आहे.

गुणवंत कामगारांच्या वैशिष्ट्यपूर्ण तसेच उल्लेखनिय कार्याची दखल घेवून राज्यातील विविध महामंडळे, जिल्हा व स्थानिक तालुका पातळीवरील शासकिय कमिटी तसेच समित्यांवर नियुक्ती द्यावी. जेणे करून त्यांच्या अनुभवाचा लाभ संबंधीत महामंडळे, विविध कमिटी, समितीला होवू शकतो. पर्यायाने राज्य सरकारला देखील होवू शकतो व त्या अनुषंगाने भरीव समाजसेवा होवू शकते. यासाठी गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त कामगारांची राज्यातील विविध महामंडळे, जिल्हा व स्थानिक तालुका पातळीवरील विविध कमिटी, समितीत्यावर नियुक्ती करण्याबाबतचे लेखी निवेदन राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कामगारमंत्री, कामगार राज्यमंत्री, मुख्य सचिव तसेच प्रधान सचिव यांना मेलद्वारे तसेच टपालाद्वारे पाठविले असल्याचेही मा.श्री.गुणवंत एच.मिसलवाड यांनी शेवटी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# महाधम्मध्वज महापदयात्रेत लाखोच्या संख्येने सहभागी व्हा : दीपक कदम

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०३ जानेवारी**

नवीन वर्षाच्यानिमित्ताने आणि महाधम्मध्वज महापदयात्रा नियोजनाच्या पार्श्वभूमीवर आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रास भेट देऊन चालू असलेल्या धम्मसंकल्प इमारत म्हणजेच श्रामणेरांच्या दीक्षाभूमीच्या बांधकामांची पाहणी केली. यावेळी अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष भदंत पंयाबोधी थेरो यांच्यासह भिक्खू संघाची उपस्थिती होती. यावेळी श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महाधम्मध्वज महापदयात्रेत



बुधवारी ८ जानेवारी २०२५ रोजी तमाम बौद्ध उपासक उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कदम यांनी केले.

ऋषिपठण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अंतर्गत श्रामणेर प्रशिक्षण केंद्र परिसरात विपश्यना केंद्र, पुस्तकालय तथा वाचनालय, भिक्खू निवास, भव्य भोजन कक्ष आदींचे बांधकाम सुरू आहे. या ठिकाणी सुरू असलेल्या बांधकामाची पाहणी दीपक कदम यांनी केली. अल्पावधीमध्ये बेसमेंट लेव्हलपर्यंत काम करण्यात आले आहे, लवकरच पहिल्या स्लॅब चे काम करण्यात येईल असे यावेळी भदंत पंयाबोधी थेरो यांनी सांगितले. हे काम भव्य दिव्य असून खर्चाचा विचार करता समाजातील बांधवांनी योगदान देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन दीपक कदम यांनी केले. यावेळी आंबेडकरवादी मिशनच्या माध्यमातून होत असलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल कदम यांचा श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला.

**८ जानेवारीला घरावर पंचरंगी धम्मध्वज उभारावा - भदंत पंय्याबोधी थेरो**

८ जानेवारी हा 'विश्व बौद्ध धम्मध्वज दिन' म्हणून जगभरात साजरा केला जातो. बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसारासाठी संपूर्ण जगातील बौद्धांचे एकच प्रतिक असावे यासाठी सन १८८० मध्ये 'विश्व बौद्ध धम्म ध्वजाची' निर्मिती करण्यात आली.

विश्व बौद्ध धम्मध्वज दिन समस्त भारतीय बौद्धांचा सण, उत्सव, सोहळा व्हावा यासाठी जागतिक धम्मध्वज दिनानिमित्त ८ जानेवारी २०२५ रोजी बौद्ध उपासक किंवा उपासिकांनी आपल्या घरांवर पंचशील धम्मध्वज उभारुन विश्व धम्मध्वज दिन साजरा करावा असे आवाहन तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक तथा अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष, संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांनी केले आहे.

# सिडको गुरुवार बाजार येथील उद्यानास डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क नाव देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ०३ जानेवारी**

सिडको येथील मध्यवर्ती उद्यान हे मागील अनेक वर्षापासून पडीक असून त्यात घाणीचे साम्राज्य व झाडे झुडपे मोठ्या प्रमाणात वाढल्याने याठिकाणी अवैद्य धंद्याचे मुख्य केंद्र बनले होते. ही बाब विचारात घेऊन सिडकोतील बहुजन समाज बांधवांनी या उद्यानात महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा बसून येथील उद्यानाचा कायापालट करण्यात आला आहे. त्यामुळे या मध्यवर्ती



उद्यानास डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क हे नाव देण्यात यावे अशी मागणी मनपाचे आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांच्याकडे निवेदनाद्वारे दिनांक ३ जानेवारी रोजी करण्यात आली. सिडको नवीन नांदेड येथील मध्यवर्ती उद्यान हे अवैध धंद्याचे प्रमुख केंद्र बनले होते.

या गोष्टीचा परिसरातील नागरिकासह महिला, युती व ज्येष्ठ नागरिकांना अनेक त्रासाला समोर जावे लागत असे. या गोष्टी लक्षात येतात सिडको परिसरातील आंबेडकरवादी बहुजन बांधवांनी सर्वांच्या सहकार्याने येथील घाण, कचरा काढून अवैध धंदे बंद करण्यात आली. त्या ठिकाणी मनोभावे सेवा करून चार महिन्यापासून साफसफाई सह या ठिकाणी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा बसून त्या ठिकाणी प्रत्येक पौर्णेमेस महापुरुषांच्या जयंती व इतर समाज उपयोगी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक उपक्रम साजरी करण्यात येत आहेत. त्या ठिकाणावरून बहुजन समाजातील महापुरुषांचे विचार समाजात रुजविण्याचा सर्व समाजसेवकांनी वसा घेतला आहे. तरी वरील सर्व बाबींचा विचार करता येथे जागतिक कीर्तीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारून त्या सर्व उद्यान परिसरास डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क असे नाव देण्यात यावे अशी मागणी एका निवेदनाद्वारे मनपाचे आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांच्या कक्षेत देऊन सदरील निवेदन प्रत्यक्षरीत्या अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांना देण्यात आले. यावेळी सिडकोतील सामाजिक कार्यकर्ते विलास गजभारे, राजू लांडगे, प्रसेनजीत वाघमारे, सम्राट आढाव, एकनाथ वाघमारे, आनंदराव पवार, प्रदीप हनमंते, राहुल तारू, आकाश गजभारे, राजेश लांडगे, बालाजी गायकवाड, आकाश सोनकांबळे, चंद्रकांत डोंम्ले, अनुराग पवळे, सुनील वडगावकर, शामराव कांबळे यांची उपस्थिती होती.

# तरुणांनी व्यसनापासून दूर राहावे
## ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज यांचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. ०३ जानेवारी**

चांगला समाज घडविण्यासाठी आजच्या तरुणांकडून शिस्तीची गरज आहे. तरुणांनी कोणतेही व्यसन करू नये. व्यसनाच्या आहारी जाऊ नये. व्यसनाच्या आहारी गेलेली तरुणाई उद्ध्वस्त होत आहे. म्हणून तरुणांनो व्यसन करू नका. व्यसनापासून दूर रहा. चांगले विचार अंगीकारा. आई-वडिलांची सेवा करा देव प्राप्त होतो, असे प्रतिपादन ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज यांनी केले

**हे वारकरी संप्रदायाचे व्यासपीठ आहे हे पृथ्वीतलावरती एकच व्यासपीठ असे आहे की सर्व जाती धरतील लोक एकत्र येतात व गुण्या गोविंदाने नांदतात या व्यासपीठावरून जातिवाद करायचा नाही.या ठिकाणी मानवी संस्कार मिळतात हिंदु धर्माचे हे कुटुंब आहे. हिंदू धर्मात अठरापगड जाती आहेत आम्ही जातिवाद करणार नाहीत आमचा लढा आरक्षणाचा आहे आमची लढाई जातीवादाची नाही आरक्षणाची आहे.**

दि.१ जानेवारी रोजी जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी दिवंगत डॉ.भाई केशव धोंडगे यांच्या व्दितीय पुण्यतिथी निमित्त क्रांतिभुवन बहादरपुरा येथे हरी कीर्तनाचा कार्यक्रम सोहळा आयोजित केला होता. याप्रसंगी ते बोलत होते. भाई केशवराव धोंडगे यांनी कधीच जाती व्यवस्था मानली नाही. सामाजिक कार्याबरोबरच ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी शैक्षणिक क्रांति निर्माण केली. गोरगरीबांच्या हजारो मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले. म्हणून त्यांचे कार्य आजही समाजासाठी उपयोगी आहे.

अशी माणसं समाजातील गोरगरीब, सामान्य, कष्टकरी, कुणबी,नाहिरेवाल्याच्या उद्धारासाठी जन्माला येतात. समाज उपयोगी कार्य करा म्हणजे मानवी जीवन समृद्ध आणि सफल होईल असेही ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज यांनी आपल्या मधुर वाणीने कीर्तनाच्या माध्यमातून उपस्थितांना संबोधित केले. जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी माजी आमदार व खासदार डॉ.भाई केशवराव धोंडगे यांनी आयुष्यभर गोरगरीब,सामान्य आठरा पगड जातीसाठी गाव,वाडी,तांडयावरील जनतेसाठी सामाजिक कार्य केले. म्हणुन डॉ.भाई केशवराव धोंडगे यांच्या कार्याचा आदर्श आजच्या तरुणांनी घेणे गरजेचे आहे.

यावेळी डॉ.भाई धोंडगेंच्या अर्धांगिनी चंद्रप्रभावतीबाई धोंडगे. माजी आमदार भाई गुरुनाथराव कुरुडे, मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील ड.मुक्तेश्वर धोंडगे, प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे, प्रा.डॉ.चित्राताई लुंगारे, प्राचार्य डॉ.अशोक गवते यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिक व संस्थेतील कर्मचारी उपस्थित होते. भाई केशवराव धोंडगे यांच्या समाधीस्थळी माजी आमदार ज्ञानोबा गायकवाड, माजी आमदार रोहिदास चव्हाण, माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे, जेष्ठ विधीज्ञ अड. बी. के. पांचाळ यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी,विविध विभागांचे अधिकारी कंधार लोहा तालुक्यातील नागरीक हजारो संख्येने उपस्थित राहून दिवंगत भाई धोंडगे यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

# माध्यमिक आश्रम शाळेत सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. ०३ जानेवारी :** मरवाळी तांडा येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक पोष्ट बेसिक ज्यूनियर कॉलेज मध्ये प्राचार्य विजयकुमार देशमुख यांच्या उपस्थितीमध्ये स्त्री शिक्षणाची जननी सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. ालुक्यातील बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक,उच्च माध्यमिक पोष्ट बेसिक ज्यू .कॉलेजचे प्राचार्य विजयकुमार देशमुख यांच्या उपस्थितीत दिनांक. ३/०१/२०२५ रोजी रोज शुक्रवार सकाळी प्रार्थने नंतर प्राचार्य विजयकुमार देशमुख



व प्राध्यापक दिलीप गोरे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करु न अभिवादन करण्यात आले.तद्नंतर पोष्ट बेसिक माध्यमिक व उच्च माध्यमिक ज्यू कॉलेज मधील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ही सामुहिकपणे पुजन करुन अभिवादन केले.तर प्राध्यापिका भारती बन यांनी आज भारतीय देशातील महिलेला समाजामध्ये मान सन्मान जो मिळत आहे ते फक्त शिक्षण क्षेत्रातील क्रांती ज्योती सावित्री बाई फुले या महान स्त्रीच्या पुण्याई मुळे अशी भावना उपस्थित विद्यार्थी विद्यार्थ्यां नी समोर मनोगत व्यक्त केले आहे.

यावेळी प्राचार्य विजयकुमार देशमुख,प्रा.नामदेव राठोड, दिलीप गोरे, सुर्यकांत जाधव, धोंडिबा तेलंग, संभाजी मेहेत्रे, महेंद्र सारवले, देविदास राठोड,नागनाथ येल्लूरे, आनंदराव सूर्यवंशी, गणेश मारताळेकर,शंकर राठोड,आकाश सुर्यवंशी, माधवराव वाघमारे ,प्रदिप लाभशेटवार ,दिलीप माने, शिव शंकर कोरे,बालाजी माळगे,यादवराव कोरनुळे,काशीनाथ बन,पांडुरंग येवले,विश्वनाथ स्वामी,प्राथमिक मुख्याध्यापिका कुसुमताई राठोड, उषाताई राठोड, एकनाथ मुनगीलवार, नागोराव चव्हाण, सतिश हाणमंते, साहेब राव येवरे, शेख फिरोज , दिपक बि-हाडे, वस्तीगृह अधिक्षक राजू कांबळे सह शिक्षकेतर कर्मचारी उत्तम राठोड,बालाजी राठोड सह आदि कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आश्रम शाळेतील गणपत कोत्तेवार चा सेवापूर्ती सत्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. ०३ जानेवारी**

तालुक्यातील मरवाळी तांडा येथील पोष्ट बेसिक माध्यमिक आश्रमशाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदाच्या वतीने. संकुलातील सेवक गणपत किशनराव कोत्तेवार यांचा सेवा पूर्ती पर निरोप समारंभ सोहळा संपन्न झाला. नायगांव तालुक्यातील मरवाळी तांडा येथील बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित प्राथमिक,पोष्ट बेसिक माध्यमिक व उच्चमाध्यमिक ज्यू.कॉलेज,या संकुलातील सेवक पदावरून गणपत किशनराव कोत्तेवार हे नियत वयोमानानुसार ३४ वर्ष ६ महीने २० दिवस प्रामाणिक पणे सेवेतून आपले कर्तव्य बजावून दिनांक ३१ डिसेंबर २०२४




रोज मंगळवारी यांची सेवा पूर्ती होत असुन.त्या अनुषंगाने संकुलाचे प्राचार्य विजयकुमार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांच्या वतीने संस्थेचे संस्थापकअध्यक्ष श्री.रतन लक्ष्मण राठोड, संस्थेचे कार्यवाहक डॉ.मधुकर राठोड,मा.प्राचार्य किशन राठोड यांच्या उपस्थितीमध्ये सोहळा आयोजित केला असून.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा शिक्षण सभापती शिवराज पाटील.होटाळकर तर प्रमुख वक्ते प्रा. शंकर राठोड यांची उपस्थिती होती. या वेळी कार्यक्रमाची सुरुवात प्राध्यापक माधव वाघमारे ह्यांच्या संचाच्या सुगम संगीताने अध्यक्ष रतन लक्ष्मण राठोड यांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेच्या पुजनाने करण्यात.तद्नंतर प्रमुख मान्यवरांचा शालश्रीफळ देऊन यथोचित सत्कार केला. प्राथमिक,माध्यमिक उच्च माध्यमिक ,पोष्ट बेसीक ज्यू कॉलेज.मधील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या समन्वयातून संस्थेचेअध्यक्ष रतन राठोड यांच्या हस्ते सेवापूर्तीचे सत्कार मूर्ती गणपत किशनराव कोत्तेवार चा सापत्निक कपडे रुपी आहेर करून पुढील भावीआयुष्यातील वाटचालीस शुभेच्छा देत पुढील कार्य क्रमास सुरुवात केली.उपस्थिती मंचावरुन माजी शिक्षण सभापती शिवराज पा.होटाळकरांनी आपल्या भाषणातू न सेवक पदावरून प्रामाणिकपणे कर्तव्य बजावलेल्या गणपत किशनराव कोत्तेवार च्या कार्याचे गोडावे गात प्रमाणिक पणाची गुणवत्ता ही श्रीमंतांच्या घरी जन्माला येत नाही तर ती रक्तातच असावी लागते असे यावेळी मोठ्या मनाने भावना व्यक्त केली आहे तर प्रसिध्द कवी प्राध्यापक शंकर राठोड यांनी खरं बोलायचं आणि बर बोलायचं ह्या कवितेचे उत्कृष्ट सादरीकरण करीत विद्यार्थ्यां व उपस्थित पाहुणे मंडळीची मने जिंकत सेवा पूर्ती सोहळ्याची सांगता केली.

या सेवा पूर्तीच्या सोहळ्याला जि.प.माजी शिक्षण सभापती शिवराज पा.होटाळकर,संस्थेचे कार्यवाहक डॉ मधुकर राठोड , सेवानिवृत्त माजी प्राचार्य भारत बेटकर, श्रीराम राठोड ,शेषेराव बोईवार, सेवानिवृत्त शिक्षक किशन चामे,संभाजी पवार,दिगांबर पाचपिपळे, खंडगांवचे मुख्या ध्यापक पंढरी कोत्तेवार,पो.पा.दशरथ राठोड ,गंगाधर कोत्तेवार चंद्रकांत पवार,संजू महाराज सह माजी सेवानिवृत्त कर्मचारी मंडळी व मरवाळी तांडा सह परिसरा तील अनेक मान्यवर उपस्थित होते. तर सेवा पूर्ती सोहळा यशस्वी करण्यासाठी संकुलातील प्राचार्य विजयकुमार देशमुख,कुसुम राठोड, प्रा.दिलीप माने,बालाजी माळगे, दिलीप गोरे,विश्वनाथ स्वामी, काशीनाथ बन,प्रदिप लाभशेटवार,भारती बन,नागोराव चव्हाण, एकनाथ मुनगीलवार, साहेबराव येवरे ,फेरोज शेख,सतिश हाणमंते,नागोराव गबाळे,धोंडिबा तेलंग, संभाजी मेहेत्रे,सुर्यकांत जाधव, आनंदा सूर्यवंशी, सुभाष कदम,दिपक बिऱ्हाडे,सुभाष राठोड,देविदास राठोड,राम पांचाळ, वस्तीगृह अधिक्षक राजू,शिवाजी नारे,हाणमंत सिंगवाड,बालाजी राठोड सह आदि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सेवा पूर्ती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत बावणे केले तर आभार प्रदर्शन प्राध्यापक शंकर राठोड यांनी केले.

# उमरी शहरातील जेष्ट आंबेडकर चळवळीचे नेते गंगाधर सवई यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. ०३ जानेवारी :** उमरी तालुक्यातील आंबेडकर चळवळीचे जेष्ट नेते तथा पत्रकार गंगाधर मानिकराव सवई रा उमरी रापतवार नेते यांचे हृदय विकाराच्या तिव्र झटक्याने निधन



दि २ जानेवारी २०२५ रोजी रेल्वेस्टेशन उमरी येथे ६:३० वाजता झाले आहे मृत्यू समयी त्यांचे वय ७२ वर्ष होते.

त्यांचा अंत्यविधी उमरी शहरातील सरकारी दवाखाना नजीक वैकुंठात दि ३ जानेवारी २०२५ रोजी ठिक २ : ०० वाजता करण्यात आला आहे . त्यांच्या पश्च्यात पत्नी , तीन मुले , एक मुलगी नातवंड असा मोठा परिवार आहे . आंबेडकर चळवळीचे नांदेड जिल्हा नेते सुरेश गायकवाड यांचे मावश भाऊ तर पत्रकार त्रिशरण सवई , ड भिमराव सवई , प्राध्यापक सुदिप सवई यांचे ते वडिल होत